15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

DGS/ 12:00

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

DGS/ MHM/ KGS/ 12:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहातील कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याबाबत
माननीय सभापतींनी केलेली घोषणा

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी घोषणा करीत आहे की, आज दिनांक 15 मार्च , 2007 रोजी पासून "Z News 24" या मराठी दूरचित्रवाहिनीस सभागृहातील प्रश्नोत्तराच्या तासाचे व अर्थसंकल्प सादर करतानाचे थेट प्रक्षेपण करण्यास तसेच "ई मराठी टी.व्ही." या दूरचित्रवाहिनीस प्रश्नोत्तराच्या तासाचे तसेच लक्षवेधी, ठराव, प्रस्ताव इत्यादी चर्चेच्या कार्यवाहीचे चित्रीकरण करुन ते बातमीपत्राव्दारे प्रक्षेपित करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर, विनाशुल्क विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुमती देण्यात आली आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**राज्यातील भूभाग पाण्याखाली जाऊ नये यासाठी अलमट्टी धरणामध्ये ५०९.०१६ मी. तलांकाचे वर पाणी साठा करु नये यासाठी नवीन कृष्णा पाणी तंटा लवादाकडे केलेल्या मागणीवर अंतिम निर्णय घेण्याबाबत**

**(१) * २४३९० प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील तारांकित प्रश्न क्रमांक २३५२० ला दिनांक १२ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००५ व २००६ या दोन वर्षी पावसाळ्यात कृष्णा व पंचगंगा या नद्यांना कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणात वाजवीपेक्षा अधिक पाण्याचा साठा केल्यामुळे महापूर येऊन नदीकाठी असलेली गावे मोठ्या प्रमाणात बाधित झाली हे खरे आहे काय,

(२) तसेच आता कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी अलमट्टी धरणात ५२५ मी. उंची पर्यंन्त पाणी साठविण्याची घोषणा केलेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलमट्टी धरणातील पाणी साठी वाढविल्यास केंद्र शासनाने प्रतिबंध करावा यासाठी माराष्ट्र शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री.रामराजे नाईक-निंबाळकर** : (१) सन २००५ व २००६ मध्ये कृष्णा व पंचगंगा नद्यांना आलेल्या पुराशी अलमट्टी धरणातील पाणीसाठ्याचा संबंध आहे किंवा कसे ही बाब कृष्णा पाणी तंटा लवादापुढे न्यायप्रविष्ठ आहे.

(२) अशी घोषणा केल्याचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरुन दिसते.

(३) कृष्णा पाणी तंटा लवादाने परवानगी दिल्याखेरीज कर्नाटक अधिक पाणीसाठा करु शकत नाही. लवादापुढे महाराष्ट्राचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सन २००५ व २००६ या सलग दोन वर्षामध्ये कृष्णा नदीच्या काठावर असलेल्या कोल्हापूर व सांगली जिल्हयातील गावांना महापूराचा प्रचंड तडाखा बसला. या दोन वर्षामध्ये महापूराचा प्रचंड तडाखा बसण्याचे कारण असे की, कर्नाटक सरकारने कृष्णा नदीवर अलमट्टी धरण बांधले, त्या धरणामध्ये २००५ च्या पावसाळयामध्ये पाण्याचा साठा करण्यास सुरुवात केली. कर्नाटक सरकारने त्या धरणामध्ये पाण्याचा प्रचंड साठा केला. लवादाने

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २४३९०...

प्रा. शरद पाटील...

५०९ मीटर उंचीपर्यंत पाण्याचा साठा करण्यास परवानगी दिली असतांना कर्नाटक सरकारने ५१९ मीटर उंचीपर्यंत पाण्याचा साठा केला. इतकेच नव्हेतर यावर्षी ५२४ मीटर उंचीपर्यंत पाण्याचा साठा वाढविण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला असल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. त्यासंबंधी सर्वत्र चर्चा सुरु आहे. गेली दोन वर्षे पावसाळयामध्ये सांगली, कोल्हापूर जिल्हयातील आणि मिरज व शिरोळ तालुक्यातील शेकडो गावांमधील हजारो शेतकऱ्यांची शेती मालमत्ता व घरे यांना फार मोठा धोका पोहोचला आहे. या धरणाची उंची आणखी वाढविल्यामुळे आणि त्यामध्ये पाण्याचा साठा वाढविल्यामुळे याही पेक्षा अधिक धोका सीमा भागातील गावांना निर्माण होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील या दोन्ही जिल्हयातील जनतेमध्ये प्रचंड असंतोष आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आणि म्हणून या संदर्भातील शंकेचे आणि भीतीचे निरसन करण्याची महाराष्ट्र सरकारची जबाबदारी आहे. कर्नाटक सरकारने धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, तो अंमलात आणू नये याकरिता केंद्र सरकारकडे आपला विरोध नोंदविण्याकरीता आणि त्याचबरोबर महापूराच्या पाण्याचा फटका नदीकाठच्या गावांना, नागरिकांना व शेतीला बसू नये याकरिता महाराष्ट्र शासन कोणती उपाययोजना करणार आहे?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 12:05

ता.प्र.क्र.24390 (पुढे सुरू.....

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या नाजूक आणि संवेदनशील प्रश्नाला सन्माननीय सदस्यांनी हात घातलेला आहे. सन 2005-06 मध्ये सह्याद्री रेंजमध्ये पडलेल्या अति पावसामुळे फक्त कोल्हापूर आणि सांगलीमध्ये पूर आला आहे अशी परिस्थिती नाही तर भीमा खोऱ्यापासून पुढे पंढरपूरपर्यन्त दोन्ही वर्षी पूर येऊन गेलेला आहे. पूर येण्याअगोदर म्हणजे सन 1997-98 आणि 1999 मध्ये कर्नाटक न्यायालयामध्ये रिट पिटीशन ओएस-1 आणि ओएस-2 होता. या संदर्भात शासनाने इंटरव्हीन केले. अलमट्टी धरण आपल्या सीमेपासून साधारणत: 200 कि.मी.अंतरावरील विजापूर जिल्ह्यामध्ये आहे. 507 ते 509 मीटरपेक्षा वर धरणाची उंची जाऊ नये अशी त्या काळापासून महाराष्ट्र शासनाने भूमिका घेतलेली आहे. परंतु सुप्रीम कोर्टाचा निकाल वेगळा लागला. सुप्रीम कोर्टाने 519 मीटरपर्यन्त धरणामध्ये पाणी साठविण्यास कर्नाटक राज्याला परवानगी दिलेली आहे. तसेच 519 ते 524 मीटर मीटरपर्यन्त पाणी साठविण्याचा निर्णय कृष्णा लवाद स्थापन झालेला आहे, त्यांनी निर्णय करावा असा सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. सन 2005 साली जेव्हा सांगलीमध्ये पूर आला. विशेष करून कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ आणि पंचगंगा नदीकाठी पुराने प्रचंड थैमान घातले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे तक्रार केली की, सन 2002 पासून जेव्हा प्रत्यक्षात अलमट्टी धरणामध्ये पाणी साठविण्यास सुरुवात केली त्यावेळेस त्यांनी 519 मीटरपर्यन्त पाणी साठविले. धरणाच्या लाभक्षेत्रात सरासरीपेक्ष जास्त पाऊस पडला. विशेषत: फ्री कॅचमेंट एरियामध्ये तिप्पटीने पाऊस पडला. कोल्हापूर जिल्ह्यातील तुळशी धरण आणि राधानगरी धरण या दोन्ही धरणाचा विसर्ग 16000 क्युसेस एवढा आहे. प्रत्यक्षात सन 2005 साली राजाराम पूलाच्या ठिकाणी 65000 क्युसेसने पाणी पुढे गेले. म्हणजे 17000 क्युसेस पाणी धरणातून जास्तीचे सुटले. महाराष्ट्र शासनाने केंद्रीय जल आयोगाकडे, मिनिट्री ऑफ वॉटर रिसोर्सेसकडे 2006 साली तक्रार केली. प्रत्यक्षात पूर आल्यानंतर लवादाची स्थापना झाली असल्यामुळे लवादाकडे 2005 साली इंटरिम ॲप्लीकेशन केला की, ऑक्टोबरपर्यन्त 519 मीटरपर्यन्त धरणामध्ये पाणी रहावे. सह्याद्रीच्या रेंजमध्ये पडलेल्या अतिप्रचंड आणि असाधारण पावसामुळे पूर आलेला आहे असे कोर्टाने सांगितले आणि आपला अर्ज फेटाळला. परंतु महाराष्ट्र शासनाने लवादासमोर इंटरीम ॲप्लीकेशन केलेला आहे. त्यामुळे आता सुप्रीम कोर्टाचा प्रश्न आलेला नाही. सुप्रीम कोर्टाने 519 ते 524 मीटर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर....

पर्यन्तच्या परवानगीच्या संबंधात लवादाने निर्णय घ्यावा असा निर्णय दिलेला आहे. आता आपण संपूर्ण ताकदीने लवादासमोर भूमिका धेतलेली आहे की, ऑक्टोबर पर्यन्त 509 मीटरपर्यन्त पाणी रहावे. आता बाब तांत्रिक झालेली आहे. या बाजूच्या आणि त्या बाजूच्या एक्सपर्टचे असे मत आहे की गाळ आला तर बॅक वॉर्टरपर्यन्त जाऊ शकेल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24390......... श्री. रामराजे नाईक-निंबाळकर....

अशा प्रकारचा पाऊस पडला तर पश्चिम महाराष्ट्रातील कोयनेपासून जी काही धरणे आहेत ती जुलै अखेरपर्यंत क्रॅश लेव्हलपर्यंत भरलेली असतात. याबाबत जे रिझरवायर रिशेड्युलींग असते त्याचा फेरविचार करण्यासाठी शासनाने माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. एप्रिल, 2007 मध्ये जेव्हा या कमिटीचा रिपोर्ट येईल त्यावेळी वाटले तर रिशेड्युलींग ऑपरेशन करुन घेता येईल. सन 2005-06 मध्ये जे पूर आले त्याची फ्लड लाईन रिकंसिडर करता येईल. पावसाची शक्यता वाढली तर डिझास्टर मॅनेजमेंट सिस्टिम या चार पाच जिल्हयांमध्ये परिणामकारकपणे राबविता येईल. नदीकाठापर्यंतची जी लागवडीखालील शेतजमीन गेलेली आहे या सगळ्या गोष्टींचा फेरविचार करुन एक ब्ल्यू प्रिंट तयार करता येईल. त्यामुळे जनतेमध्ये कोणतीही भीतीची भावना राहणार नाही.

श्री. दिवाकर रावते : या पुराच्या संदर्भात मी त्या भागामध्ये गेलो होतो. मी आपल्याही गावाकडे गेलो होतो. त्या ठिकाणी रेल्वेची पटरी पाहिली. त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी श्रीमती मनिषा म्हैसकर यांनी अप्रतिम कामगिरी केली. या प्रश्नाच्या उत्तराच्या संदर्भात शासन कितपत जागे आहे ? आपण सरकार चालवित आहात की सरकार निष्क्रिय आहे याचे उत्तर आले पाहिजे. प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "अशी घोषणा केल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांवरुन दिसते." ही या सरकारची भूमिका आहे काय ? आम्ही गंमत म्हणून 45 दिवस अगोदर प्रश्न पाठवतो काय ? तुमच्या सचिवांनी त्यांच्या सचिवांशी बोलून नक्की काय परिस्थिती आहे ती या ठिकाणी द्यावयास पाहिजे. सरकारने जे वृत्तपत्रात वाचले, ते आम्हीही वाचले. शासनाने या ठिकाणी ज्या पध्दतीचे उत्तर दिले आहे ते सरकारचे शहाणपण आहे काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : या ठिकाणी प्रश्न असा विचारला आहे की, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी अलमट्टी धरणात 525 मीटर उंचीपर्यंत पाणी साठविण्याची घोषणा केलेली आहे हे खरे आहे काय ? मी मघाशी उत्तर दिले की, 519 मीटरच्या पुढे 525 मीटरपर्यंत जाण्याचा निर्णय लवादासमोर आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री काय म्हणाले ते वर्तमानपत्रात आले. म्हणून तसे उत्तर दिलेले आहे.

.....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM

ता.प्र.क्र. 24390 ......

श्री. दिवाकर रावते : ज्यावेळी शासन या ठिकाणी उत्तर देते त्यावेळी आम्ही वर्तमानपत्रात वाचले असे उत्तर शासन देऊ शकते काय ? आम्ही खात्याला सांगून त्या सरकारला कळविले की, हा निर्णय योग्य नाही, ते असे करु शकत नाहीत, अशा प्रकारचे उत्तर द्यावयास पाहिजे होते. वर्तमानपत्रात वाचले असे उत्तर या ठिकाणी दिले आहे. असे उत्तर देण्याची सवय झाली तर ते बरोबर होणार नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला जे सांगितले ते चुकीचे आहे. आपण सांगितले की, धरण बांधताना 519 मीटरपर्यंतची व्यवस्था केली होती. त्यावेळी ऑब्जेक्शन का घेतले नाही ? त्या ठिकाणी 509 मीटर उंचीपर्यंत बांधण्याचे ठरविले होते. सुरुवातीला कर्नाटकने दादागिरी केली आणि 519 मीटर पर्यंतची उंची पदरात पाडून घेतली. आता पुढच्या 524 मीटरकरिता लवादाकडे भांडत आहेत. आपण 508 मीटर उंचीपासूनच भांडण्यास सुरुवात करावयास पाहिजे होती. हा कोर्टाचा निर्णय असेल पण आपण आपल्या निवेदनामध्ये माहिती सांगितली की, कर्नाटकने दादागिरीने 519 मीटरपर्यंतची व्यवस्था केली. त्यावेळी शासन गप्प बसून राहिले. आता पुढच्यासाठी भांडत आहोत.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, 519 मीटर बाबतचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे. 519 ते 525 मीटर करावयाचे की नाही याचा निर्णय लवादासमोर करावयाचा आहे. हा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. आपण लवादासमोर भूमिका घेतली. कर्नाटकचे मुख्यमंत्री काय बोलले ते ऑफिशियली महाराष्ट्र शासनाकडे कळविलेले नाही. लवादाचा निर्णय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कर्नाटकला 525 मीटरपर्यंत जाण्याची मुभा मिळू शकत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : महाराष्ट्र शासनाकडून लवादाकडे आक्षेप केव्हा नोंदविले आणि त्या आक्षेपांचे स्वरुप काय आहे ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, पूर 2005 च्या आसपास आला त्यानंतर जुलैच्या आसपास लवादासमोर आक्षेप नोंदविले होते. मी आधी सांगितल्याप्रमाणे आपली अंतरिम मागणी अशी होती की, ऑक्टोबरपर्यंत किंवा इरिगेशन सिझनमध्ये अलमट्टी धरण 509 मीटरपर्यंत भरले जावे, 519 मीटरपर्यंत भरले जाऊ नये. त्यावर हा निर्णय झाला.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 24390....

श्री. नितीन गडकरी : खरे म्हणजे 508 मीटर वरुन 519 मीटर उंची पर्यन्त पाणी साठविण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला. त्यानंतर 525 मीटर उंची पर्यन्त पाणी साठविण्यासंबंधीचा प्रश्न लवादाकडे सोपविलेला आहे. लवादाच्या निर्णयामुळे सुप्रीम कोर्टात जावे लागेल अशी परिस्थिती आहे. केवळ अलमट्टी धरण हेच सांगली-कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पूर येण्याचे एकमेव कारण नाही. राज्यामध्ये अचानक खूप मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यानंतर कोयना धरणातून अनेक क्युसेक्स पाणी सोडण्यात आले. कोयना धरणातून इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी सोडल्यामुळे सांगली, कोल्हापूर हे जिल्हे उद्‌ध्वस्त झाले. कर्नाटक सरकार हे 525 मी. उंची पर्यन्त पाणी साठविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. दुसरे असे की, त्या ठिकाणच्या 6-7 नद्या पुढे एकत्र मिळत जातात. कोयना धरणाचे पाणी सोडल्यानंतर त्या नद्याच्या पाण्याची पातळी वाढते. कोयना धरणाचे गेट उघडून पाणी सोडण्याची सिस्टिम कॉम्प्युटराईज्ड केली पाहिजे. तसेच कोयना धरण हे पूर्ण भरे पर्यन्त वाट न पाहता त्यामधील पाण्याची कनेक्टीव्हीटी, डायव्हर्शन शक्य आहे काय हे देखील पाहिले पाहिजे. पाणी सोडण्याच्या बाबतीत नवीन नॉर्म्स काय वापरता येतील यासंदर्भात आपण एक कमिटी नेमलेली आहे. त्या कमिटीचा अहवाल येण्यास अजून वर्ष लागेल. आता या पावसाळ्यात पुन्हा जोरदार पाऊस झाला की, शासन हेच उत्तर देईल की, "अजून कमिटीचा रिपोर्ट आलेला नाही". तेव्हा अशा परिस्थितीमध्ये आपण कोणते प्रिव्हेन्टिव्ह मेझर्स घेणार आहात ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : माजी सचिव श्री. वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली जी कमिटी नेमलेली आहे तिचा अहवाल एप्रिल 2007 मध्ये प्राप्त होईल. सदरहू अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : या वर्षी जून महिन्यामध्ये पुन्हा जोरदार पाऊस झाला तर मागील वर्षाप्रमाणे तीन जिल्हे पुन्हा उद्‌ध्वस्त होतील. कमिटी नेमून 8 महिने झाले. डिझास्टर मॅनेजमेंट कसले करता ? माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांच्या जिल्ह्यामध्ये डिझास्टर मॅनेजमेंटचा कसा बोजवारा उडाला हे मला माहीत आहे. या पावसाळ्यापूर्वी शासनाने ताबडतोबीने उपाययोजना केली पाहिजे. तश्‍ी ती शासन करील काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 24390....

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : एप्रिल 2007 मध्ये म्हणजे अधिवेशन काळातच त्या कमिटीचा अहवाल् प्राप्त होईल. तो अहवाल चर्चेला घेण्यात येईल किंवा पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा. बी.टी. देशमुख : 519 ते् 525 मी. उंची पर्यन्त पाणी साठविण्यासंबंधीचा निर्णय लवादाने करावयाचा आहे. लवादामध्ये निर्णय झालेला नाही असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. पश्चिम घाटातून पाणी येत असल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होते असे मत व्यक्त केले गेले. 509 किंवा 519 मी. उंची पर्यन्त पाणी साठविल्यामुळे गावे बुडत असतील तर ती तांत्रिक गोष्ट आहे असे मत व्यक्त करुन कर्नाटक सरकारने मोकळे व्हावे आणि आपण त्यासंदर्भात काहीही मांडू नये ही गोष्ट उचित नाही. शेवटी पाण्याच्या लेव्हलचा प्रश्न आहे. केवळ हा तांत्रिक मुद्दा आहे अशा प्रकारचा अभिप्राय देण्याचा हा विषय नाही. तेव्हा या प्रश्नासंदर्भातील तांत्रिक मुद्दे आपण लवादासमोर मांडलेले आहेत काय ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : इंटेरिम ॲप्लिकेशनच्या संदर्भात आपण लवादासमोर गेलो आहोत. इंटेरिम ॲप्लिकेशनचा निर्णय आपल्या विरुध्द गेलेला आहे. इंटेरिम ॲप्लिकेशनमध्ये लवादाने असे मत व्यक्त केले की, सह्याद्री रांगामध्ये टोरॅन्शल रेन पडल्यामुळे हे घडले. मी आधी सांगितल्याप्रमाणे इंटेरिम ॲप्लिकेशनवरील निकाल हा अंतिम निकाल असू शकत नाही. मॉडर्न टेक्नॉलॉजीचा आधार घेऊन महाराष्ट्र शासन सुप्रीम कोर्टात रिट पिटिशन दाखल करील आणि जेव्हा मेरिटवर हिंअरिंग होईल त्यावेळी हे तांत्रिक मुद्दे मांडले जातील.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ KGS/ 12:20

ता.प्र.क्र.24390..........

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, धरणातील पाण्याची ऊंची आणि त्यासंबंधात निर्माण होणाऱ्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली असून त्या समितीचा अहवाल एप्रिल, 2007 मध्ये प्राप्त होईल. आता अलमट्टी धरणामुळे पाणीसाठा वाढल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे की, आपल्या धरणातून पाणी सोडण्याचे जे नियोजन आहे त्यामध्ये काही बिघाड झाला आहे यासंबंधीचा निर्णय होईपर्यंत किती कालावधी जाणार आहे हे सांगता येणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे महापुराचे पाणी कृष्णा व इतर नद्यांच्या काठावर असलेल्या गावांमध्ये जाऊन तेथे नुकसान होण्याची शक्यता असल्यामुळे ते पाणी दुसरीकडे वळविण्याचा पर्याय शासनासमोर असू शकतो. हे पाणी दुसरीकडे म्हणजे दुष्काळी भागामध्ये वळविण्याचा प्रयत्न केला जाईल का? त्याचबरोबर नद्यांच्या काठावर जी अतिक्रमणे झाली आहेत त्या अतिक्रमणांमुळे देखील पुराचा धोका मोठया प्रमाणात त्या भागातील वसाहतींना पोहोचतो. पूर रेषेत येणाऱ्या वसाहतींचे पुनर्वसन करण्यासंबंधी महाराष्ट्र शासन विचार करणार आहे का? महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या या प्रश्नासंबंधी माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये उच्चस्तरीय बैठक घेऊन निरनिराळया तज्ञांची मते आणि शासनाचे धोरण यासंबंधी निर्णय किंवा विचारविनिमय होईल का?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, वडनेरे समितीच्या अहवालामध्ये माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना अपेक्षित असलेले टर्म्स आणि रेफरन्सेस आलेले आहेत. अतिक्रमणे आणि केलेला पाणी साठा ही पूर ओसरण्यामध्ये अडचण आहे. पूर का येतो यादृष्टीने उपाय करणे शक्य आहे. त्यासंबंधी वडनेरे समिती प्रयत्न करणार आहे. मी सदनाला आणि जनतेला दिलासा देऊ इच्छितो की, या वर्षी जर अधिक पाऊस झाला तर लोकांच्या मालमत्तेची व जीविताची हानी होऊ नये, नुकसान कमीत कमी कसे होईल यादृष्टीने शासन सतर्क आहे. त्यामुळे पावसाळा येण्यापूर्वीच यादृष्टीने सर्वंकष योजना करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24390..........

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी शेवटचा जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, विशेषत: सांगली शहर किंवा सांगली जिल्हा, कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ तालुक्याचा संपूर्ण भाग मागील दोन पावसाळ्यात सतत 15-15 दिवस जलमय झाल्याने लोकांवर सातत्याने टांगती तलवार होती. एका बाजूला अलमट्टी धरणाचे बॅकवॉटर आणि दुसऱ्या बाजूला कोयना, वारणा, काळम्मावाडी या तीन धरणातून अतिरिक्त पाणी सोडले गेले. या संदर्भात मी माझ्या दालनात संबंधित भागातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आणि या विषयाशी संबंधित जाणकार आहेत त्या तज्ञांना एकत्र बोलावून अत्यंत चांगले उपाय कसे करता येतील यादृष्टीने एकत्रित चर्चा करु.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : शासनाची तयारी आहे.

--------------

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विडणी (ता. फलटण जि. सातारा) येथील नीरा उजवा कालवा जलसेतूची भिंत कोसळल्यामुळे पाणी वाहून जात असल्याबाबत**

**(२) * २७७२२ श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. संजय केळकर :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १९ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या सुमारास विडणी (ता. फलटण, जि. सातारा) गावाच्या उत्तरेला असलेल्या नीरा उजव्या कालव्याच्या जलसेतूची सुमारे १०० फूट लांबीची भिंत कोसळून कालव्यातील लाखो क्युसेस पाणी वाहून गेले, हे खरे आहे काय,

(२) कालव्याची भिंत फुटून वाहून गेलेल्या पाण्यामुळे त्या भागातील शेकडो एकर जमिनीवरील शेती, घरे, गुरे-ढोरे इ. मालमत्ता वाहून गेल्याने नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले हे खरे आहे काय,

(३) सदर नुकसानीची पाहणी व पंचनामे करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, सदर कालव्याची भिंत फुटल्याची कारणे काय व ज्यांचे नुकसान झाले त्यांना किती नुकसान भरपाई देण्यात आली वा येत आहे ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) कालव्याची सा.क्र.५२/७४० येथील जलसेतूची निरीक्षण पथाकडील ६० मीटर लांबीची भिंत पडून सुमारे ५० दलघफू पाणी वाहून गेले,

(२) नाही,

(३) प्रश्न उद्भवत नाही,

(४) सदर बांधकाम ८० वर्षापूवीचे असून क्षतिग्रस्त झाल्यामुळे पडले. तथापि कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

----------

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सदर घटना घडल्याचे शासनाने मान्य केले आहे. झ ाालेल्या नुकसानाची पाहणी व पंचनामा करण्यात आला आहे का? या संदर्भात उत्तरामध्ये म्हटले आहे की, सदर बांधकाम 80 वर्षापूर्वीचे असून क्षतिग्रस्त झाल्यामुळे पडले. पाटबंधारे विभागाला त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जो अहवाल दिला त्यामध्ये म्हटले आहे की, जलसेतूचे बांधकाम 80 वर्षापूर्वीचे होते. त्यातून कित्येक वर्षे पाण्याचा पाझर सुरु होता. हे खरे असेल तर योग्य ती उपाययोजना व खबरदारी का घेण्यात आली नाही? 48 लाख क्युसेक्स पाणी कालव्यातून वाहून गेले. परिणामी विडणी व फलटण विभागात आगामी काळात पाणी देता येणार नाही. 80 वर्षापूर्वीचे व क्षतिग्रस्त असलेल्या बांधकामामुळे कालव्यातून पाण्याचा पाझर होत असताना.........

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 27722** .........

श्री. मधुकर चव्हाण ......

यासंदर्भात ज्या संबधित अधिका-याने दुर्लक्ष केलेले आहे त्याच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, हा जल सेतू 75 ते 80 वर्षाचा जुना आहे ही गोष्ट खरी आहे. हा जलसेतू क्षतीग्रस्त झाल्यामुळे त्यातून जे पाणी वाहून गेले ते पुढील कोल्हापुरी बंधा-यामध्ये अडलेले आहे. त्यामुळे या जलसेतूमधून जे पाणी वाहून गेले ते समुद्राला मिळाले असे म्हणणे योग्य होणार नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या कालव्याच्या दुरुस्तीवर पाच वर्षात किती खर्च झाला आहे ? या कालव्याच्या दुरुस्तीवर खर्च झाला नसेल तर, हा खर्च का झाला नाही?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या जलसेतूवर 30.32 लक्ष रुपये खर्च झालेले असून या कालव्यातील एकूण 23 जलसेतू 75 ते 80 वर्षाचे जुने आहेत. या कालव्यातून बारमाही पाणी वाहत असल्यामुळे या कालव्याच्या दुरुस्तीचे काम होऊ शकले नाही परंतु आता 18 कोटी रुपये खर्च करुन जलसेतू दुरुस्त करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, सहयाद्री पर्वताच्या पट्टयात मोठया प्रमाणात पाऊस पडत असतो व या ठिकाणी पडलेल्या पावसाचे सर्व पाणी समुद्रात वाहून जात असते. त्यामुळे ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात पाऊस पडतो व तेथील सर्व पाणी समुद्रात वाहून जात असेल तर अशा ठिकाणचे समुद्रात वाहून जाणारे पाणी नगर, नाशिक, धुळे, उस्मनाबाद अशा ठिकाणी उपलब्ध करुन दिले किंवा ज्या ठिकाणी कमी पावसाचे प्रमाण कमी आहे किंवा जे दुष्काळी भाग आहेत अशा ठिकाणी हे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने काही सर्व्हे केलेला आहे काय किंवा यासंदर्भात शासन काही विचार करणार आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सजेशन फॉर ॲक्शन.

------------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या**

**(३) * २४४०५ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. रामनाथ मोते , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री.परशुराम उपरकर , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री.भास्कर जाधव , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , प्रा. फौजीया खान , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.सय्यद जामा :** सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या शेकडो कुटुंबियांनी आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दोन वेळा उपोषण व त्यानंतर एप्रिल, २००६ मध्ये त्यांच्या मागण्यांबाबत पुनर्वसन मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर निधी येऊनही तेथील नागरी सुविधा पुरविण्यास अद्याप सुरुवात न झाल्याने तसाच पडून आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड येथील पुनर्वसित प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या नागरी सुविधा हया शासनाच्या निकषानुसार नाही हे खरे काय,

(४) असल्यास, कोयना धरणग्रस्तांच्या रायगड जिल्हयातील पुनर्वसन व सुविधा पुरविण्याबाबत १० कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला होता हे खरे आहे काय,

(५) कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या सर्व कुटुंबियांच्या पुनर्वसनाबाबतची आता सद्य:स्थिती काय आहे व याबाबत अंतिम कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे?

**डॉ. राजेंद्र शिंगणे ,डॉ. पतंगराव कदम, यांच्याकरिता** : (१) जुन्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांची, पुनर्वसनांची व अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात दिनांक २०/०४/२००६ रोजी प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांचेकडे बैठक झाली. त्यामध्ये रायगड जिल्हयात कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व नागरी सुविधा पुरविण्यासाठी रुपये ८,१७,६८,०००/- इतका निधी २४ नोव्हेंबर, २००६ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

(२) रक्कम रुपये ८,१७,६८,०००/- इतका निधी मंजूर झाल्यानंतर सदर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हापरिषद व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नविन पनवेल, रायगड यांच्याकडे अनुक्रमे प्रत्येकी रुपये ६,२६,४३,०००/- व रुपये १,९१,२५,०००/- प्रमाणे वितरीत करण्यात आला असून नागरी सुविधांची कामे चालू केली आहेत.

(३) कोयना प्रकल्पग्रस्त वस्त्यांमधील दिलेल्या नागरी सुविधा शासकीय निकषानुसार नसल्याचे आढळून आल्याने रायगड जिल्ह्यातील एकूण ३५ वस्त्यांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटी देवून शासकीय निकषानुसार कोयना प्रकल्पग्रस्तांची नागरी सुविधांची कामे चालू केली आहेत,

(४) शासनास रुपये १०.०० कोटी निधी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, सन २००६-२००७ मध्ये राज्यातील जुन्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व नागरी सुविधा पुरविण्यासाठी रुपये ८०५०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यामधून प्रकल्पनिहाय निधी मंजूर करताना रायगड जिल्हयातील कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी रुपये ८,१७,६८,०००/- इतका निधी मंजूर केला आहे.

(५) कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्यापैकी काहीनी रायगड जिल्हयात येवून स्वत: जागा घेवून गावठाणे तयार केली अशा ३५ वस्त्यांना नागरी वसाहतीचा दर्जा देण्यात आला असून त्यानुसार तेथे नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत. ....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, राज्यातील पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी 1907 मध्ये कोयना धरणाची निर्मिती करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर 50 वर्षे उलटून गेले तरी या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांचे नशीब अजून काही उघडलेले नाही. अजूनही या ठिकाणच्या प्रकल्प ग्रस्तांना उपेक्षितांचेच जीवन जगावे लागत आहे. गेल्या 50 वर्षात 75 टक्के प्रकल्पग्रस्तांना अजून जमिनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना आतापर्यंत किती एकर जमीन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व किती प्रकल्पग्रस्तांना अजूनपर्यंत जमिनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत यांची माहिती शासन सभागृहाला देणार आहे काय? या ठिकाणच्या प्रत्येक कुटुंबातील दोन व्यक्तींना नोकरी देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते परंतु तीन पिढया होऊन गेल्या तरी त्यांना शासनाने नोक-या उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे आता तरी तिस-या पिढीला नोक-या देऊन शासन आपल्या आश्वासनाची पूर्ती करणार आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पुनर्वसनाचा कायदा अस्तित्वात आल्यापासून कोयना प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना रायगड जिल्हयातील 35 वस्त्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकल्पग्रस्तांना जमिनी, नोकरी, नागरीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. या प्रकल्पग्रस्तांना आता पर्यंत किती जमिनी देण्यात आलेल्या आहेत याची आकडेवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु 65 टक्के रक्कम भरुन दोन एकर जमीन उपलब्ध करुन जमीन देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. उरलेल्या खातेदारांचे निकष पाहून जमिनी देण्यात येतील. जवळपास 35 गावामध्ये नागरी सुविधा पूर्ण करण्यासाठी 8.17 कोटी रुपये इतका निधी मंजूर करण्यात आलेला असून नागरी सुविधांची कामे प्रगतिपथावर आहेत. ही कामे लवकर पूर्ण करण्यात येतील.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24405.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कितव्या पिढीत ही कामे पूर्ण होणार आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे अखेरपर्यंत नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात येतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा रायगड जिल्ह्याचा प्रश्न असला तरी कोयना धरणामुळे माझ्या चिपळूण तालुक्यातील विस्थापितांचा हा प्रश्न आहे. त्यांना नागरी सुविधा देण्यासाठी शासनाने एक रकमी रक्कम देण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने शासनाने आजतागायत 8 कोटी 17 लाख 68 हजार इतकी रक्कम संबंधित यंत्रणेकडे वर्ग केलेली आहे ही गोष्ट खरी आहे काय ? गेल्या महिन्यात त्या जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.सुनील तटकरे यांच्या दालनात एक बैठक झाली होती. त्यास बैठकीस मी उपस्थित होतो. त्या बैठकीत असे सांगण्यात आले की, "कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे." त्यानंतर या विभागाच्या सचिवांनी ही कामे जुनी आहेत असे कारण दाखवून हा खर्च करता येणार नाही असे आदेश काढले. त्यामुळे त्या भागातील कामे बंद आहेत. ही गोष्ट शासनास माहीत आहे काय ? असल्यास, त्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ? दुसरे असे की, किती शेतकऱ्यांना जमिनी देण्यात आल्या याची माहिती मंत्रिमहोयांकडे नाही. परंतु शासनाने काही विस्थापित शेतकऱ्यांना जमिनी दिलेल्या आहेत, परंतु त्या शेतकऱ्यांची नावे 7/12 उताऱ्यावर नाहीत. 7/12 उताऱ्यावर नाव नसल्यामुळे त्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेता येत नाही. तेव्हा शेतकऱ्यांची नावे 7/12 उताऱ्यावर केव्हा लावण्यात येतील ? तसेच ज्या विस्थापितांना अजूनही जमिनी मिळालेल्या नाहीत त्यांना केव्हा जमिनी देण्यात येतील ? याठिकाणी माननीय महसूल मंत्री आणि माननीय पुनर्वसन मंत्री उपस्थित आहेत, तेव्हा या प्रश्नांच्या संदर्भात ठोस उत्तर मिळणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24405.....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, नागरी सुविधांची कामे बंद नाहीत, ती प्रगतिपथावर आहेत. नागरी सुविधांची 80 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. मे अखेरपर्यंत ही कामे पूर्ण होतील. नळ योजनांची कामे सुरु आहेत, इतर नागरी सुविधा म्हणजे रस्ता, पिण्याचे पाणी, समाज मंदिर, शाळा, चावडी, सिमेंट गटारे वगैरे ज्या 13 नागरी सुविधा आहेत त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण केली जातील. सन्माननीय सदस्यांनी जमिनी संदर्भात प्रश्न उपस्थित केला, त्या संदर्भात सांगू इच्छितो की, 7/12 उताऱ्यावर शेतकऱ्यांची नावे नसतील त्यांची नावे घालण्यासंदर्भात आदेश दिले जातील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, विभागाच्या सचिवांनी कामे बंद करण्यासंदर्भात जो आदेश काढलेला आहे तो रद्द करणार का ?

डॉ.राजेंद्र शिंगण : सभापती महोदय, विभागाच्या सचिवांनी कामे बंद करण्यासंदर्भात आदेश काढला असेल तर तो रद्द केला जाईल. मी सदस्यांना पुन: सांगू इच्छितो की, नागरी सुविधांची कोणत्याही कामे बंद करण्यात आलेली नाहीत. ही सर्व कामे प्रगतिपथावर आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 1960 साली बांधलेल्या कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्यांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही ही शोकांतिका आहे. अगोदर श्री.रामराजे निंबाळकर या खात्याचें मंत्री होते. ते एक चांगले मंत्री आहेत. परंतु ते सचिवांभोवती फिरत असतात. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, एका वर्षाच्या आत पुनर्वसन संदर्भातील सर्व प्रश्न सोडविले जातील आणि त्या संदर्भात कोणताही प्रश्न पुन्हा या सभागृहात उपस्थित करण्याची वेळ येणार नाही असे ठोस आश्वासन मंत्रिमहोदय देतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे पुनर्वसन कायदा होण्या अगोदरचा हा प्रश्न आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे एक वर्षाच्या आत सर्व प्रश्न निकालात काढले जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

ता.प्र.क्र.24405.....

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोयना धरणात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्यांनी रायगड जिल्ह्यात जमिनी घेतल्या, परंतु त्यांच्या जमिनी पुन्हा प्रकल्पासाठी ॲक्वायर करण्यात आल्या हे खरे आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा की, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व नागरी सुविधा पुरविण्यासाठी 8 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 12:35

ता.प्र.क्र.24405....

श्री.जयंत प्र. पाटील...

प्रत्यक्षात या वर्षीच्या बजेटमध्ये जो निधी दिला होता तो केव्हा वर्ग झाला ? कारण, निधी लॅप्स होत असतो, हे आम्ही अनेकवर्षे पाहत आलेलो आहोत. त्यामुळे प्रत्यक्षात निधी केव्हा वर्ग झ ाला ? याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 8 कोटी 17 लाख 68 हजार रुपये निधीपैकी 6 कोटी 26 लाख 43 हजार रुपये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड आणि 1 कोटी 91 लाख रुपये अधीक्षक अभियंता, जीवन प्राधिकरण, ता.पनवेल, जि.रायगड यांना वितरित करण्यात आलेले आहेत. सन 2006-2007 मध्ये हा निधी मंजूर करण्यात आला होता. जवळपास 6 महिन्यांपूर्वी हा निधी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आमच्याकडील पनवेलच्या परिसरामध्ये ज्या जमिनी दिल्या होत्या, त्या पुन्हा ॲक्विझिशन झाल्या आहेत. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना आपण पुन्हा आजच्या बाजार भावाने मोफत जमिनी देणार का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्या जमिनी ॲक्विझिशन झाल्या असतील तर निश्चितपणे शेतकऱ्यांना जमिनी देण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न अतिशय गांभीर्याने पुढे आणला असून तो अतिशय महत्वाचा आहे. याबाबतीत अर्थसंकल्पामध्ये तरतूद असेल, पुनर्वसनाची गरज असेल व हा प्रश्न जर 50 वर्षांपासून रखडत असेल तर असा कोणता मोठा अधिकारी आहे की त्याने सरकारचा निर्णय थांबवला ? तो अधिकारी सरकारचा निर्णय थांबवून तेथील लोकांना सोयी सुविधेपासून वंचित ठेवत असेल तर त्या अधिकाऱ्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे, काम बंद करण्याच्या आदेशाचे पत्र निघून कामे बंद झाली, अशी आजची परिस्थिती नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, जर अशा पध्दतीचे पत्र एखाद्या अधिकाऱ्याने काढले असेल तर त्याची ताबडतोबीने दखल घेतली जाईल व योग्य ती कारवाई केली जाईल.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24405....

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, 75 टक्के लोकांना जमिनीचे वाटप झालेले नाही. त्याचप्रमाणे एका कुटुंबातील दोन जणांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. जमिनी वाटपाचे व नोकरी देण्याच्या आश्वासनांची पूर्तता एक वर्षाच्या आत केली जाईल, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. परंतु उर्वरित लोकांचे पुनर्वसन आपण कधी करणार आहात ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे आश्वासन दिले की, एक वर्षाच्या आतमध्ये कोयना धरणातील जे प्रकल्पग्रस्त आहेत, ज्यांची कामे अपूर्ण असतील किंवा ज्यांच्या जमिनीचा, नोकरीचा, नागरी सुविधांचे प्रश्न असतील त्यासंदर्भात एक वर्षाच्या आत कार्यवाही करुन प्रस्थापितांना न्याय दिला जाईल.

---------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विदर्भ व खानदेशात गारपिटीमुळे झालेले नुकसान**

**(४) * २७३९३ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा तारांकित प्रश्न क्रमांक २२४११ ला दिनांक १२ डिसेंबर २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व खानदेशात गारपिटीमुळे झालेल्या नुकसानाबाबत अमरावती, अकोला, बुलढाणा व नागपूर या ४ जिल्हयांतील शेतकऱ्यांना मदत वाटपासाठी रुपये १३७२.९१ लाख अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) व (२) होय, मार्च, २००६ मध्ये वादळी पाऊस व गारपीट यामुळे अमरावती, अकोला, बुलढाणा व नागपूर या ४ जिल्हयातील शेतीपिके आणि फळपिके यांचे ५० टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या ८१,४६०.२८ हेक्टर क्षेत्राकरिता आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटपासाठी आवश्यक एकूण रुपये ३६४६.३४ लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अगोदरच्या मूळ उत्तरामध्ये व सुधारित उत्तरामध्ये फार विसंगती दिसून येते. अगोदरच्या उत्तरामध्ये शेतीपिके आणि फळपिके यांचे ५० टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या ५१,१३८.१३ हेक्टर क्षेत्र दिले असून, सुधारित उत्तरामध्ये हाच आकडा "८१,४६०.२८ हेक्टर" असा दिला आहे. याठिकाणी जून्या उत्तरामध्ये व सुधारित उत्तरामध्ये ३० हजार हेक्टरचा फरक दिसून येतो. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदय याठिकाणी उत्तराच्या माध्यमातून सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. परंतु याठिकाणी लोकांना अजूनही पैसे मिळालेले नाहीत. आपण याठिकाणी लेखी उत्तराच्या माध्यमातून सांगता की, ३,६४६.३४ लाख रुपये एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतु प्रत्यक्षात पैसे मिळालेले नाहीत. तसेच, मी माझ्या मूळ प्रश्नामध्ये विलंबाची कारणे विचारली होती, त्यास आपण प्रश्न उद्भवत नाही, असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे याठिकाणी माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांना नक्की कधी पैसे मिळणार आहेत ?

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र.27393 पुढे सुरु..............**</u>

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जानेवारी महिन्यातच निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, परंतु आचारसंहितेमुळे निधीचे वाटप करता आले नव्हते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय सदनाची दिशाभूल करीत आहेत. नैसर्गिक आपत्तीमधील आपद्ग्रस्तांना मदत करण्यास आचारसंहितेची कोणतीही अडचण नसते. माननीय मंत्रीमहोदयांनी आता जे स्टेटमेंट केले आहे ते त्यांनी पुन्हा एकदा करावे म्हणजे मी निवडणुक आयोगाकडून रितसर खुलासा प्राप्त करुन घेऊन मंत्रीमहोदयांवर हक्कभंग दाखल करु शकेन.

**सभापती** : माननीय कृषिमंत्र्यांच्या मी लक्षात आणून देतो की, हे सार्वभौम सदन आहे. या ठिकाणी धोरणात्मक घोषणा करावयाची असेल तर त्याला कोणतीही अडचण असण्याचे कारण नाही. कारण, जिल्हा परिषद किंवा पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, विदर्भ आणि खानदेश या भागाशी संबंधित हा प्रश्न आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा व नागपूर या जिल्हयांची माहिती उत्तरात देण्यात आलेली आहे. जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्हयांमध्ये किती हेक्टरसाठी, किती मदत उपलब्ध करुन देण्यात आली, या मदतीचे प्रत्यक्षात किती वाटप झाले, अद्याप किती रक्कम देय आहे ? याबाबतची माहिती कृपया मंत्रीमहोदयांनी द्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मार्च 2006 मध्ये सर्व राज्यभर गारपीट झाली होती. खानदेश विभागातील आपद्ग्रस्तांना करावयाच्या मदतीसाठी 5 कोटी 72 लक्ष रुपयांची आवश्यकता होती. हा सर्व निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता व त्याचे वाटपही झालेले आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, संपूर्ण रक्कमेचे वाटप झालेले आहे, असे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले आहे. परंतु, या जिल्हयातील अनेक तालुक्यांमध्ये अद्याप रक्कमेचे वाटप झ ालेले नाही. त्यामुळे माझी शासनाला अशी विनंती आहे की, ही बाब तपासून घ्यावी व देय रक्कम तातडीने वाटप करण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत.

...2........

**<u>ता.प्र.क्र.27393 पुढे सुरु.............</u>**

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 31 मार्च 2007 पर्यन्त पूर्ण वाटप होईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न या ठिकाणी विचारला आहे त्याच अनुषंगाने माझा प्रश्न आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा व नागपूर या जिल्हयांमध्ये आपद्ग्रस्तांना मदतीचे वाटप झालेले आहे, असे मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे. किती शेतक-यांना प्रत्यक्षात मदत पोहोचली आहे, याची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, किती शेतक-यांना मदत पोहोचली, याबाबतची आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु, या जिल्हयांना 36 कोटी 44 लक्ष रुपयांची आवश्यकता होती, त्यापैकी 24 कोटी 77 लक्ष रुपये यापूर्वीच दिलेले आहेत व जानेवारी महिन्यामध्ये 11 कोटी 67 लक्ष रुपये उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचे वाटप 31 मार्च 2007 पर्यन्त पूर्ण करीत आहोत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 31 मार्च 2007 पर्यन्त वाटप पूर्ण करण्यात येईल, असे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. याबद्दल मी प्रश्न विचारीत नाही. महत्वाची गोष्ट ही आहे की, हा निधी वाटप केला जात असतांना शेतक-यांना त्रास दिला जातो, अधिका-यांकडून आपद्ग्रस्तांचा छळ होतो, अनेक व्यवहार होतात. जी गोष्ट सहज होण्यासारखी आहे त्याबाबत मी येथे विनंती करणार आहे. आतापर्यन्त ज्या आपद्ग्रस्तांना मदतीचे वाटप झालेले आहे, त्यांचा प्रश्न नाही. परंतु, ज्या आपद्ग्रस्तांना मदतीचे वाटप व्हावयाचे आहे त्यांना क्रॉस चेकच्या माध्यमातून मदतीचे वाटप व्हावे, अशा प्रकारचे आदेश शासन संबंधित अधिका-यांना देणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मदतीची संपूर्ण रक्कम बँकेकडे देण्यात येते. चेकव्दारा किंवा बँकेकडे यादी देऊन ॲडव्हाईसव्दारा मदतीचे वाटप करणे अशा दोन पद्धतीने मदतीचे वाटप होते. आता आपण बँकेमार्फत चेकव्दाराच मदत करीत आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपद्ग्रस्तांना मदतीचे वाटप करण्यापूर्वी पटवा-यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पंचनामा करणे आवश्यक असते. परंतु, अनेक ठिकाणी पटवा-यांनी कार्यालयात बसून किंवा पोलिटिकल प्रेशरखाली पंचनामे तयार केलेले आहेत. त्यामुळे

..3..........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.27393 पुढे सुरु..............</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर...............

ज्यांचे खरोखर नुकसान झाले आहे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे व ज्यांचे नुकसानच झालेले नाही त्यांना मदतीचे वाटप झाल्यामुळे पक्षपात झाला आहे, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी जिल्हा स्तरावर जिल्हाधिका-यांकडे प्राप्त झालेल्या असतांना कुठल्याही प्रकारची चौकशी न करता वाटप झालेले आहे. तेव्हा, ज्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्यांची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, गारपीटीची घटना ही मार्च 2006 मध्ये घडलेली आहे. तलाठी, कृषि सहाय्यक व ग्रामसेवक यांची समिती प्रत्यक्ष पाहणी करीत असते व 50 टक्क्यांखाली ज्यांची आणेवारी आहे त्यांना मदत करण्यात येत असते. 50 टक्क्यांवर आणेवारी असलेल्या क्षेत्रासाठी देखील मदत द्यावी, अशा प्रकारचे प्रेशर निश्चित येत असते. मार्च 2006 मध्ये हे सर्व पंचनामे झालेले आहेत त्यामुळे त्याची चौकशी करणे ही एवढी सोपी गोष्ट नाही. तरी देखील यासंदर्भात जिल्हाधिका-यांना चौकशी करण्याबाबत सांगण्यात येईल.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.27393** .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यावेळी सुध्दा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मी सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. परंतु कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नाही. तसेच आम्ही दिलेल्या पत्रावर देखील कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जिल्हाधिका-यांना यासंदर्भात चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येतील.

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर ..... 12:45

**नागपूर विणकर सहकारी सुत गिरणी मर्यादित**
**येथील कामगारांना न्याय मिळणेबाबत**

**(5) * 24454 श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर विणकर सहकारी सुतगिरणी मर्यादित येथील कामगारांना औद्योगिक न्यायालयाच्या दिनांक 23 मार्च, 2006 च्या निर्णयाप्रमाणे 108 महिन्यांचे वेतन व्हि.आर.एस.ची रक्कम आणि ग्रॅच्युटी तसेच इतर देयके देण्याबाबतची अंमलबजावणी अद्यापपावेतो झालेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,

(3) उक्त प्रश्नी भाग (1) व (2) मधील प्रकरणी अद्यापपावेतो कारवाई झाली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सतीश चतुर्वेदी** : (1) होय,

(2) नागपूर विणकर सहकारी सुतगिरणी मर्यादित, नागपूर या सूत गिरणीचे अवसायक तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका हिंगणा, जिल्हा नागपूर यांनी मा. औद्यागिक न्यायालयाच्या दिनांक 23 मार्च, 2006 च्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे याचिका क्रमांक 3234/2006 दाखल केली असून, सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी बंद होऊन बरेच दिवस झालेले आहेत. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे या सूतगिरणीतील कामगारांना 108 महिन्यांचे वेतन, व्हि.आर.एस.ची रक्कम आणि ग्रॅच्युटी दिली नाही तर उद्योजकावर क्रिमीनल केस होऊ शकते. या वैधानिक जबाबदा-या आहेत. औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा कामगारांना देय रक्कमा देण्यात आलेल्या नाहीत. सरकारने हायकोर्टामध्ये अपिल केले आहे. हायकोर्टाने स्थगनादेश दिलेला नाही. याचा अर्थ औद्योगिक न्यायालयाचा निर्णय जीवंत आहे. एकतर शासनाने स्थगिती मिळवावी नाही तर औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी सरकार का करीत नाही ? न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करणे हे गैरकायदेशीर आहे. शासन औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणार काय ?

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24454** .......

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, औद्योगिक न्यायालय के निर्णय के खिलाफ लिक्वीडेटर ने हाईकोर्ट में अपील दायर की है और यह मामला सब-ज्युडिश है. इस अपील में जो भी निर्णय होगा, वह शासन मान्य करेगा. औद्योगिक न्यायालय ने 50 प्रतिशत पेमेन्ट का निर्णय दिया है. इसमें धोरणात्मक बात यह है कि महाराष्ट्र में 21 सूत गिरणी लिक्वीडेशन में हैं. उनके ऊपर भी यह निर्णय लागू होगा. पिछले 10 साल की पगार देने का निर्णय पहली बार औद्योगिक न्यायालय ने दिया है. इस गिरणी को बेचने पर 28 करोड़ रुपए से ज्यादा की निधि प्राप्त नहीं होगी और जिस दिन आखिरी कार्यवाही होगी तो गिरणी की मालमत्ता बेचकर भी कामगारों को पिछले 10 साल का पगार नहीं दे सकते हैं. औद्योगिक न्यायालय के निर्णय के अनुसार लिक्वीडेशन पीरियड का पगार देना है. इस निर्णय के दूरगामी परिणाम होंगे. लिक्वीडेटर ने हाईकोर्ट में अपील दायर की है और हाईकोर्ट का निर्णय हमें मान्य होगा. 21 सूत गिरणियों के ऊपर इस निर्णय का परिणाम होने वाला है.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कायद्याप्रमाणे आपण औद्योगिक न्यायालये निर्माण केलेली आहेत. औद्योगिक न्यायालयांना लिगल स्टेटस आहे. औद्योगिक न्यायालयांना ज्युडिशिअरी स्टेटस आहेत. औद्योगिक न्यायालयाने दिलेला निर्णय कामगारांवर, उद्योजकांवर बंधनकारक असतो. विणकर सहकारी सूतगिरणीची मालकी महाराष्ट्र सरकारकडे आहे. ही सहकारी तत्वावरल सूतगिरणी असली तरी शासनाने या गिरणीवर लिक्विडेटर नियुक्त करुन ही गिरणी आपल्या ताब्यात घेतली आहे. गिरणीवर नियुक्त केलेला लिक्विडेटर महाराष्ट्र शासनाचा प्रतिनिधी आहे. या गिरणीचा मालकी हक्क सरकारकडे आहे. या केसमध्ये औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द हायकोर्टामध्ये जाण्याचा सरकारला अधिकार आहे. हायकोर्टाने अद्याप स्थगिती दिलेली नाही. औद्योगिक न्यायालयाचा निर्णय न पाळणे हे कायदेशीर आहे काय ? असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा असा प्रश्न आहे की, औद्योगिक न्यायालयाने दिलेला निर्णय शासनावर बंधनकारक आहे काय ?

यानंतर कु.खर्चे .....

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

JPK/ KTG/ KGS यापूर्वी श्री.बोरले.... 12:50

श्री.नितीन गडकरी....... ता.प्र.क्र.24454.....

औद्योगिक न्यायालयाचा निर्णय शासनावर बंधनकारक असेल आणि त्या निर्णयाला जर हायकोर्टाने स्थगिती दिलीच नसेल तर औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाचे इम्प्लिमेंटेशन करा असे आदेश सरकार देईल का ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, औद्योगिक न्यायालय का निर्णय हम लागू नहीं कर रहे है, इसके खिलाफ माननीय सदस्य को लीगल लड़ाई लड़नी है तो उनके पास लीगल एवेन्यू मौजूद हैं.

श्री.नितीन गडकरी : सभापति महोदय, इस बारे में इस सभागृह ने कायदा पास किया है.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, इस मामले में हाईकोर्ट में अपील दायर की गई है. माननीय सदस्य श्री. गडकरी के पास लीगल एवेन्यू मौजूद हैं, मै उनसे मना नहीं कर रहा हूँ.

श्री.नितीन गडकरी : सभापति महोदय, इस बारे में इस सभागृह ने कायदा पास किया है

**सभापती** : हरकतीच्या मुद्दयांवर मला निर्णयाप्रत येण्याकरिता आपण आपले जे म्हणणे आहे ते मांडावे.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, यह मामला हाईकोर्ट में सब-ज्युडिश है. माननीय सदस्य ने मुद्दा उठाया है कि औद्योगिक न्यायालय का निर्णय हो गया है और सरकार उसका पालन क्यों नहीं कर रही है. मैं आपके माध्यम से सम्माननीय सदस्य से विनंती करना चाहता हूँ कि औद्योगिक न्यायालय के निर्णय के खिलाफ लिक्वीडेटर हाईकोर्ट में गया है और हाईकोर्ट में केस दाखिल हुआ है. महाराष्ट्र में 21 सूत गिरणी लिक्वीडेशन में है और औद्योगिक न्यायालय के निर्णय के अनुसार कामगारों को लिक्वीडेशन के पीरियड का पगार देना है. गिरणी की पूरी सम्पत्ति बेचकर भी पगार नहीं दे सकते हैं. इसलिए लिक्वीडेटर ने हाईकोर्ट में अपील की है. मैं माननीय सदस्य को बताना चाहता हूँ कि 275 कामगारों को पगार देने के लिए औद्योगिक न्यायालय का निर्णय नहीं था, फिर भी शासन ने उनको पगार दिया है. कामगारों के बारे में शासन का सहानुभूति का दृष्टिकोण है, उनको मदद करने की सरकार की भूमिका है. अभी औद्योगिक न्यायालय का निर्णय है कि लिक्वीडेशन पीरियड की ग्रॅच्युटी और पगार देना है तो गिरणी की पूरी सम्पत्ति बेचकर भी पगार नहीं दे सकते है, ऐसा मत सरकार ने हाईकोर्ट में रखा है. हाईकोर्ट का निर्णय सरकार को मान्य होगा. फिर भी माननीय सदस्य को अगर ऐसा लगता

. . . K2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री सतीश चतुर्वेदी                                                ता.प्र.क्र. 24454.....

है कि औद्योगिक न्यायालय का निर्णय सरकार लागू क्यों नहीं कर रही है तो उनके पास लीगल ऐवेन्यू मौजूद हैं.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपल्यासमोर जे मुद्दे आहेत, त्याच्याविषयी मी फक्त दोन  तीन बाबी मांडतो, निर्णय आपल्याला द्यावयाचा आहे. यामध्ये क्लासिकल केस म्हणून आता ही चौथी केस आहे. मी मुद्दाम त्याचे संकलन करीत आहे. कोर्टामध्ये जे आर्ग्यूमेंट करावयाचे राहून गेले आहे ते करण्यासाठी सभागृहाचा वापर करणे असे एक संकलन मी करीत आहे त्यामधील हे चौथे प्रकरण आहे. सभापती महोदय, या देशाच्या घटनेप्रमाणे असे करता येत नाही. सदर निर्णय 21 तारखेपासून लागू होईल वगैरे हे कोर्टामध्ये सांगावयाला पाहिजे होते. जी आर्ग्यूमेंट कोर्टामध्ये करावयाची राहून गेली ती आर्ग्यूमेंट सभागृहामध्ये करणे ही स्टाईल चुकीची आहे. ही पध्दत कायदेशीर नाही आणि घटनेला धरुनही नाही. औद्योगिक न्यायालयाचा निर्णय झ ााला ही एक गोष्ट आणि औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाला अद्यापही हायकोर्टाने स्टे दिलेला नाही ही दुसरी गोष्ट, हायकोर्टाने स्टे दिला असेल तर तसे सांगा आणि जर हायकोर्टाने औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयला स्टे दिला नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. जर आपल्याला स्टे मागावयाचा असेल तर तसा रीतसर अर्ज करा नाही तर मग औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे की नाही ? हा कायदेशीर प्रश्न आपल्यासमोर आहे. या सभागृहाचा वापर तुमच्या वकिलांचा राहिलेला युक्तिवाद करण्यासाठी करणे ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, 1996 में यह गिरणी बंद हो गई और 2007 में औद्योगिक न्यायालय ने निर्णय दिया है और इस निर्णय के खिलाफ लिक्वीडेटर ने हाईकोर्ट में अपील की है. यह टेक्नीकल मॅटर है कि लिक्वीडेशन पीरियड का पेमेन्ट देना है या नहीं देना है. हाईकोर्ट ने औद्योगिक न्यायालय के आदेश को स्टे नहीं दिया है. मेरी जानकारी के अनुसार कई कामगार मर गए हैं और उनके ड्यूज का पेमेंट नहीं हुआ है, उनको ग्रॅच्युटी और पी.एफ. का पैसा भी नहीं मिला है. इस लोगों के पास कोर्ट में जाने के लिए पैसे नहीं है. मेरी माननीय मंत्री महोदय से गुजारिश है कि सभी संबंधित विभाग के लोगों की बैठक बुलाकर निर्णय करने की कोशिश करेंगे तो बेहतर होगा. महाराष्ट्र में 21 गिरणियों की हालत खराब है. हमारी

. . . K3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री सय्यद जामा                                                                                      ता.प्र.क्र. 24454......

सरकार की नीति कामगारों के हित के लिए है. सरकार बहुत सी कोपरेटिव सोसायटीज और साखर कारखानों को अनुदार देकर रिवाइव कर रही है, उसी प्रकार से यहां पर पिछले 10 साल का पेमेन्ट मजदूरों को करना है. इसके लिए सरकार को आगे आकर मजदूरों के पेमेन्ट के लिए बजट में प्रोवीजन करना चाहिए. यह मेरा माननीय मंत्री महोदय से निवेदन है.

. . . नंतर श्री. सुंबरे.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/SBT/KTG/MAP. कु. खर्चे नंतर --- 12:55

ता. प्र. क्र. 24454 .....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अतिशय तांत्रिक मुद्यावर ही सर्व चर्चा चालली आहे. आता या ठिकाणी माननीय कामगार मंत्री देखील आहेत आणि त्यांना कामगारांबद्दल किती प्रेम आहे हे त्यांच्या बोलण्यातून दिसते आहे. औद्योगिक न्यायालयाने जो निर्णय दिला आहे तो लिक्विडेटरला मान्य नाही म्हणून तो त्या विरोधात हायकोर्टामध्ये गेला आणि त्याने औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर स्थगिती मागितली. हायकोर्टाने जर ती स्थगिती दिली नसेल तर औद्योगिक कोर्टाचा निर्णय आहे तसाच चालू राहतो आणि म्हणूनशासनाने हे प्रकरण हायकोर्टात आहे, न्यायप्रविष्ठ आहे म्हणून त्यानुसारची कारवाई थांबविणे बेकायदेशीर आहे. म्हणून सभापती महोदय, माझी या निमित्ताने या समस्त कामगार वर्गातर्फे विनंती आहे की, आपण या संबंधात सरकारला योग्य त्या सूचना, डायरेक्शन्स द्याव्यात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, लिक्विडेटरच्या वकिलांनी औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात हायकोर्टामध्ये जाऊन स्थगिती मागितली होती परंतु हायकोर्टाने त्यासाठी नकार दिला आहे अशी माझी माहिती आहे. दुसरे असे की, उद्या हायकोर्टाने असा निर्णय दिला की, तुमच्या सव्वीसही गिरण्यांच्याबाबतीत हा निर्णय लागू करावा तर त्यामुळे सरकारवर बोजा येणार आहे असे सरकारला म्हणता येणार नाही. तेव्हा या संदर्भात जी काही पद्धती आपण घालून दिलेली आहे त्यानुसारच आपण चालले पाहिजे. अन्यथा हे लिक्विडेटर कशासाठी नेमले ? कशासाठी आपल्याकडे यांचा मालकी हक्क घेतला ? तेव्हा हे जे काही चालले आहे ते बरोबर होणार नाही. यामध्ये औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर स्थगनादेश देण्यास हायकोर्टाने नकार दिलेला आहे. हे प्रकरण जरूर न्यायप्रविष्ठ आहे पण स्थगनादेश मात्र हायकोर्टाने नाकारलेला आहे. म्हणजे judgement is over, but argument is continued. तेव्हा आता औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर वा हायकोर्टाच्या निर्णयावर मंत्री महोदयांनी आर्ग्युमेंट करणार असतील तर ते बरोबर नाही. तरी सभापती महोदय, या बाबतीत आपण वैधानिक पोझिशन लक्षात घेऊन, हायकोर्टाने या प्रकरणी स्थगनादेश दिलेला नाही हे लक्षात घेऊन औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अमलबजावणी केली गेली पाहिजे असे सांगून या कामगारांना न्याय द्यावा. आता या ठिकाणी नागपूरचे सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केले आहे. ते कामगार क्षेत्रातील आहेत आणि ते इंटक युनियनमध्येही होते. या गिरणी कामगारांची स्थिती आज अत्यंत

..... एल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी (पुढे चालू...)     ता. प्र. क्र. 24454 .....

वाईट आहे, कामगारांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळेच याबाबतीत आपण या कामगारांना न्याय द्यावा अशी माझी या निमित्ताने आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी या संदर्भात तीन मुद्दे येथे मांडलेले आहेत. त्याबाबत सभापती म्हणून मी माझे अभिप्राय व निर्णय द्यावा आणि या अनुषंगाने शासनाला सूचित करावे असे त्यांनी सांगितले आहे. ....

( यानंतर श्री. गागरे .... एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/ 13:00

..... पूर्वी श्री.सुंबरे

तारांकित प्रश्न क्र.24454 (पुढे सुरु)

**सभापती** : (पुढे सुरु)

प्रा.बी.टी.देशमुख, श्री.मधुकर सरपोतदार, श्री.सय्यद जामा व सन्माननीय मंत्री महोदय यांनी या हरकतीच्या मुद्दयाच्या अनुषंगाने आपापले मत सभागृहात व्यक्त केले आहे. मला असे वाटते की, सभागृहात सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्या मध्ये कायदेशीर तरतुदींचाही उहापोह केलेला आहे. याबाबत अजूनही काही माहिती मिळावयाची राहिली आहे, त्यामुळे मी याबाबतचा निर्णय स्थगित ठेवत आहे. मी माझा निर्णय या सदनामध्ये लवकरात लवकर देईन.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला न्याय मिळण्यासाठी हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-2

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**सभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करीत आहे :-

1) श्री.उल्हास पवार

2) श्री.भास्कर जाधव

3) श्री.रामनाथ मोते

4) श्री.अरविंद सावंत

--------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते वि.प.स. यांनी "मुंबईतील सायन येथील प्रतिक्षानगर तसेच दिंडोशी येथील म्हाडाच्या सदनिकांची बोगस वितरणाची एकूण 14 प्रकरणे उघडकीस येऊन त्यात गृहनिर्माण मंडळाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्रीमती डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील वि.प.स. यांनी "सध्या चालू असलेल्या दहावीच्या इतिहास नागरिकशास्त्रांच्या प्रश्नपत्रिकेवर अडीच तासांऐवजी दोन तासाचा वेळ छापल्यामुळे परीक्षार्थींमध्ये उडालेला गोंधळ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील वि.प.स. यांनी "गोरेगाव पूर्व येथील रॉयल पामच्या रो हाऊसचे बांधकाम कोसळून झालेल्या दुर्घटनेत सात कामगारांचा मृत्यू होऊन सहा कामगार जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी "शेगाव जि.बुलढाणा नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी सार्वजनिक कामे करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून दीड कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करुन घेण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

.....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सर्वश्री प्रा.शरद पाटील, जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी "सोलापूर विणकर सहकारी सुतगिरणी व यशवंत विणकर सहकारी सुतगिरणी या दोन सूत गिरण्या अवसायनात निघालेल्या असून त्यांच्या मालमत्तेचा ताबा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने घेण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

---------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नवी मुंबईतील दोन घटनांमध्ये दरोडेखोरांना पकडताना झालेल्या हल्ल्यामध्ये दोन पोलिसांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** : नवी मुंबईतील दोन घटनांमध्ये दरोडेखोरांना पकडताना झालेल्या हल्ल्यामध्ये दोन पोलिसांचा झालेला मृत्यू यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, सय्यद पाशा पटेल, गुरुमुख जगवाणी, संजय केळकर, अनिल परब, दीपक सावंत, अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.रणजितसिंग मोहिते पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"दिनांक 27 फेब्रुवारी, 2007 रोजी नवी मुंबई येथील एम.एस.ई.बी. पॉवर हाऊस मधील तांबे व ॲल्युमिनियम भंगारची चोरी करणाऱ्या चोरांना पकडताना चोरांनी केलेल्या हल्यामध्ये रबाले पोलीस ठाण्याचे पोलिस हवालदार श्री.सैदाणे यांचा कर्तव्य बजावताना जीवाची पर्वा न करता चोरांना पकडण्याकरीता गेले असता मृत्यू होणे, त्यांचेकडे प्रतिकाराकरीता काठी शिवाय कोणतेही हत्यार नसणे, काही महिन्यांपूर्वी याच परिसरात पंजाब-महाराष्ट्र बँकेवर दरोडा टाकणाऱ्या दरोडेखोरांना पकडताना एका पोलीस अधिकाऱ्याला दरोडेखोरांनी गोळ्या घालून ठार मारणे, एका वर्षात कर्तव्य बजावताना स्वत:च्या जिवाची पर्वा न करता ज्यांनी मरण पत्करले त्या नव्या मुंबईमध्ये दोन घटनांमध्ये पोलीसांचे बळी घेणाऱ्या दरोडेखोरांचा बंदोबस्त अद्यापी होऊ न शकल्याने पोलीस दलातील अन्य कर्मचारी, नागरिक व्यापारी, बँका व लाखो लोकांच्या मनामध्ये स्वत:च्या जिविताबद्दल निर्माण झालेले भितीचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.".

.....6

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये अजून पाच साथीदार पकडले गेले नाहीत, ते कोण आहेत, त्यांना पकडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये चार आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पाच आरोपींना अजून अटक झालेली नाही, त्यांची नावे सर्वश्री सागर कांबळे, गुरुनाथ, गोविंद, दामू, प्रदीप अशी आहेत. यापैकी काही आरोपींचे यांचे पत्ते मिळालेले नाहीत. फरारी आरोपींना पकडण्यासाठी विशेष पथक नेमले आहे. या पथकामध्ये एक डीएसपी, एक एसीपी, एक पीआय, एक सब इन्स्पेक्टर व 8 पोलीस कर्मचारी आहेत, या प्रकरणाबाबतचा पुढील तपास सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : कर्तव्य बजावताना स्वत:च्या जीवाची पर्वा न करता ज्यांनी मरण पत्करले अशा पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबतचा प्रश्न आहे. पोलीस हवालदार श्री.सैदाणे यांचा कर्तव्य बजावताना मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या पत्नीस नोकरी किंवा आर्थिक मदत केली जाणार आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणात मयत पोलीस हवालदाराच्या पत्नीस दोन लाख दहा हजार रुपयांची मदत देण्यात आलेली आहे. त्यांची पत्नी सध्या अकरावी वर्गात शिकत आहे, त्या बारावी पास झाल्यानंतर त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरीत घेण्याचे ठरले आहे.

....नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : 10 वी, 11वी किंवा 12 वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नोकरीमध्ये घेता येत नाही असा नियम आहे काय? आणि जर नियम असेल तर विशेष बाब म्हणून आपणास निर्णय घेता येत नाही काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस भरतीची प्रक्रिया 12 वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर होते.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय, आपल्या विभागातील एका पोलीस कर्मचाऱ्याने चोरांना पकडतांना आपली प्राणाहुती दिली. त्यांच्या पत्नीला पोलीस सेवेमध्ये लेडी कॉस्टेबल म्हणून घेण्याकरीता 12 वीची परीक्षा द्यावी लागेल. तोपर्यंत चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून तिची नेमणूक करण्यामध्ये अडचण काय आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : श्री. सैंदाणे यांच्या पत्नीने "लिपिक" म्हणून अनुकंपा तत्वावर नेमणूक करण्यासंबंधी दिनांक 14.3.2007 रोजी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज केला असून त्यासंबंधी पुढील कार्यवाही सुरु आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री. सैंदाणे यांच्या पत्नीची 12 वीची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत शासनाने चतुर्थ श्रेणीमध्ये त्यांची नेमणूक करावी. आणि 12 वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना लेडी कॉस्टेबल म्हणून नेमावे. ज्या पोलीस शिपायाने बलिदान केले आहे त्यांच्या पत्नीला विशेष बाब म्हणून नोकरी देण्याचा आपला अधिकार आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपण त्यांची नेमणूक करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, विशेष बाब म्हणून चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदावर त्यांची नियुक्ती केली जाईल.

**सभापती** : मंत्रिमहोदय, श्री. सैंदाणे यांच्या कुटुंबाच्या बाबतीत आपली सहानुभूती आहे आणि आपण विशेष बाब म्हणून त्यांची नियुक्ती करण्यास तयार आहात. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी या भगिनींना नोकरीचे संरक्षण दिले जाईल असे आपण सांगावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: घाटकोपर येथील प्रभाग क्र.152 मधील नगरसेवकाची गोळया घालून केलेली हत्या.

**मु.शी.**: घाटकोपर येथील प्रभाग क्र.152 मधील नगरसेवकाची गोळया घालून करण्यात आलेल्या हत्येबाबत सर्वश्री संजय दत्त, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री रमेश निकोसे, मधुकर सरपोतदार, अनिल परब, दीपक सावंत, दिवाकर रावते, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"घाटकोपर (मुंबई) येथील प्रभाग क्रमांक 152 मधील नगरसेवक यांच्या निवासस्थानी शिरुन दोन अज्ञात व्यक्तिंनी गोळया घालून त्यांची हत्या केल्याची दिनांक 2 मार्च 2007 रोजी घडलेली भयंकर घटना, मारेकऱ्यांनी जवळून गोळया झाडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे आढळून येणे, यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, मारेकरी फरार असून त्यांचा शोध घेण्यात पोलिसांना आलेले अपयश, यामुळे राज्यात ढासळत असलेली कायदा व सुव्यवस्था , त्यामुळे परिसरात निर्माण झालेले भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त :सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, आरोपींनी कट रचून गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या कटाचा सूत्रधार कोण आहे? आणि हा गुन्हा करण्यामागील कारणे काय आहेत?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, निवडणूक आचारसंहितेच्या कायद्यामध्ये संबंधित विजयी उमेदवारांना अडकवून त्यांची निवडणूक रद्द करावी याकरीता महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये उभ्या असलेल्या सर्व पक्षांच्या उमेदवारांनी तेथील एका कार्यालयामध्ये एकत्र बसून मिटींग घेतली. अशाप्रकारे विजयी उमेदवाराची निवडणूक रद्द झाल्यानंतर आपोआप दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवार इलेक्टेड म्हणून जाहीर होईल. अशाप्रकारचा त्यांनी कट रचला. त्या कार्यालयामधील मिटींग संपून ते बाहेर आल्यानंतर तीन जणांनी खूनाचा कट रचला म्हणून त्या तीन जणांना अटक केली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे जिल्हयातील तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्ध्वस्त करण्यात येत असलेले हरितपट्टे

**मु.शी.**: ठाणे जिल्हयातील तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्ध्वस्त करण्यात येत असलेले हरितपट्टे यासंबंधी सर्वश्री.जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, वसंत पवार, सर्वश्रीमती.फौजीया खान, मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक वसाहतीलगतच्या गावांना प्रदूषणाचा त्रास होत असतांना येथील औद्योगिक वसाहतीतील हरितपट्टे उद्ध्वस्त करण्यात येत असल्याची दिनांक २२ फेब्रुवारी,२००७ रोजी उघडकीस आलेली धक्कादायक माहिती, सबंधित वरिष्ठ पातळीवरील एमआयडीसी अधिकाऱ्यांबरोबरच स्थानिक अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेला प्रचंड आर्थिक गैरव्यवहार, हरितपट्टे, ओपन स्पेस व ॲमेनिटी प्लॉटवरील झाडांची कत्तल करुन सदरचे भुखंड उद्योगांना बेकायदेशीररित्या दिले जात असणे, येथील एम-२९ तसेच जे-७३-७४ व इतर प्लॉटजवळील हरितपट्यातील हजारो वृक्षांची केलेली बेसुमार कत्तल, आर्किड, विराज, या कंपन्यांना प्लॉट दिलेले नसतानाही अनेक झाडे कापलेली असणे, कामासाठी झाडे कापल्यानंतर पर्यायी झाडांची लागवड करणे बंधनकारक असताना, सियाराम सिल्क मिल, जिन्दाल, डेकोअर, टी.ई,पी.एस. च्या सामुदायिक सांडपाणी प्रकल्पासाठी यापूर्वी केलेल्या हजारो झाडांच्या कत्तलीनंतर पर्यायी वृक्ष लागवड केलेली नसणे, या गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, येथील हरितपट्टे नष्ट होऊन पर्यावरणाचा होत असलेल्या ऱ्हासामुळे रहिवाशांचे आरोग्यमान बिघडण्याचा निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करता, दोषींविरुध्द कारवाई करुन तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड :सभापती महोदय, मुंबई व ठाण्यामधील हरित पट्टा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. ही आता लपून राहिलेली बाब नाही. त्याठिकाणी जे महत्वाचे प्लॉट आहेत ते बळकाविण्याकरीता ओपन स्पेस आणि ॲमेनिटी प्लॉटवरील झाडांची कत्तल केली जात आहे. त्याठिकाणी ओपन स्पेसवर असलेली झाडे तोडून ते प्लॉट नंतर कंपन्यांना हवाला करावयाचे अशाप्रकारचे रॅकेट तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये दिसून येत आहे. त्याचे स्पष्ट पुरावे वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहेत. आपण निवेदनामध्ये झाडे तोडली जात असल्याचे कबूल केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, जे पुरावे समोर आले आहेत त्यानुसार त्याठिकाणी झाडे तोडून तेथील प्लॉट बळकाविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर त्या संबंधितांवर आपण कारवाई करुन ते प्लॉट आपण परत करणार आहात काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, खुल्या जागेवरील कोणताही भूखंड देण्याचे प्रयोजन कायद्यामध्ये नाही. माननीय सदस्यांनी या ठिकाणी तारापूर औद्योगिक वसाहतीचा विषय मांडला आहे. त्या ठिकाणी नियमाप्रमाणे 10 टक्के ओपन स्पेस ठेवावा लागतो, तो राखून ठेवण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी ॲमिनिटीजसाठी 5 टक्के क्षेत्र राखून ठेवण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी प्लॉटवरील झाडे तोडल्याचा उल्लेख केला. मला सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, एमआयडीसी एखाद्या व्यक्तीला, कंपनीला प्लॉट वितरित करते, त्यावेळेस औद्योगिक कामासाठीच त्या प्लॉटचा उपयोग करावा, कमर्शियल कामासाठी उपयोग करण्यासाठी प्लॉट दिले जातात. त्या संबंधित प्लॉटवर झाडे असतील तर त्यांचे ट्रान्स्प्लान्टेशन अन्य ठिकाणी करावे लागते किंवा बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी विशिष्ट प्रमाणात झाडांची लागवड केली तर अडचण येत नाही. तशी तरतूद एमआयडीसीच्या कायद्यामध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या कंपन्यांचा उल्लेख केला, त्यामध्ये विराज कंपनी आणि आर्चिड एम्ब्रॉयडरी प्रा. लि. या कंपन्या आहेत. झाडे तोडण्याचे नियमन आणि कार्यपध्दती यामध्ये स्पेसिफिक नोटीफाईड झाडांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये हिरडा,बेहडा आणि साग इ. वृक्षे नोटिफाईड केलेली आहेत. अशाप्रकारच्या वृक्षांची तोड करणे कायद्याने गुन्हा आहे. तशाप्रकारची झाडे तोडली तर त्यांच्यावर ॲक्शन घेऊ शकतो. एमआयडीसीच्या कायद्याप्रमाणे प्लॉटचा उपयोग व्यावसायासाठी झाला पाहिजे. ज्या लोकांना प्लॉट वितरित केलेले होते त्यांच्या प्लॉटवर नोटिफाईड झाडे नाहीत परंतु इतर झाडे असतील आणि प्लॉटच्या डेव्हलपमेंटसाठी त्यांनी ती तोडली असतील आणि फॉरेस्ट डिपार्टमेंटकडे तक्रार केली असेल तर त्याबाबतची पुढील कारवाई फॉरेस्ट डिपार्टमेंट मार्फत निश्चित केली जाईल.

श्री.संजय केळकर : पानेरी नदीच्या प्रदूषणाच्याबाबतीत प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणच्या मच्छिमारांनी तक्रारी केलेल्या आहेत. मधल्या काळामध्ये मच्छिमार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी तसेच त्या परिसरातील लोकांनी लाक्षणिक उपोषण करून आपल्या भावना व्यक्त केलेल्या होत्या. कंपन्यांचे सांडपाणी पानेरी नदीमध्ये सोडल्यामुळे पाणी दुषित झालेले आहे, आजूबाजूची शेती उद्ध्वस्त झालेली आहे. त्या कंपन्यांनी सांडपाण्याच्या दृष्टीने काही व्यवस्था केली नसेल तर त्या कंपन्यांना कशी परवानगी दिली ? त्या ठिकाणचे अजूनही पाणी दुषित होत असल्यामुळे तेथील लोक अस्वस्थ झालेले आहेत. मधल्या काळामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथील लोकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकू अशाप्रकारची भूमिका घेतलेली होती. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबतचा पत्रव्यवहार झाला परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही, त्या कंपन्यांवर अजूनपर्यन्त कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही हे खरे आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संबंधात उल्लेख केलेला आहे. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे त्या परिसरामध्ये जे कारखाने अस्तित्वात आहे त्यांचे सस्पेंडेड पार्टिकल्स, सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण नियंत्रणामध्ये आहे. कॉमन एफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लॉन्ट असतात. या दृष्टीने निश्चित लक्ष घातले जाईल.

श्री.संजय केळकर : प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी केलेल्या आहेत परंतु त्यांच्याकडून काहीच उत्तर आलेले नाही, त्यांनी काही कारवाई केलेली नाही, या दृष्टीने मंत्री महोदय लक्ष घालतील काय ?

श्री.अशोक चव्हाण : या संबंधाने निवेदने प्राप्त झालेली आहेत, ती निश्चित पडताळून पाहिली जातील. कायद्याचे उल्लंघन केले जात असेल तर संबंधित कंपन्यांवर कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना अर्थातच अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. पण या ठिकाणी पुराव्यासह मी आपल्यासमोर सादर करतो. त्यामध्ये ओपन स्पेस आणि त्यावरील झाडे केव्हा तोडली गेली, कशी तोडली गेली याचा सविस्तर अहवाल वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेला आहे. वर्तमानपत्राच्या माध्यमातून हे निदर्शनास आणून दिले आहे. एमआयडीसीकडे विचारणा केली असता त्यांच्यानुसार हा प्लॉट देण्यात आलेला आहे. अंतिम चौकशीअंती असे कळले की, हा प्लॉट देण्यात आलेला आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीतील एम 29 तसेच जे 73-74 मधील हरित पट्टयातील 200 ते 250 झाडे तोडण्याचे काम चालू आहे. आर्किड कंपनीच्या ठिकाणी हरित पट्टयातील झाडे का तोडण्यात येत आहेत याचे उत्तर दिले तर बरे होईल. मी माननीय मंत्रिमहोदयांकडे वृत्तपत्राचे कात्रण पाठवतो. त्यामध्ये सविस्तर पुरावे दिलेले आहेत.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी सुरुवातीला स्पष्ट केले की, जी काही जागा ओपन स्पेस म्हणून ठेवावी लागते त्यासंदर्भात एमआयडीसी स्वत: विशेष नियोजन प्राधिकारी असल्याने एमआयडीसीला अधिकार आहेत. यासंदर्भात जरुर दक्षता घेतली जाते. जेवढी ओपन स्पेस ठेवावयास पाहिजे ती त्या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. कोणत्याही कारखानदारीला किंवा कोणत्याही औद्योगिक घटकाला ओपन स्पेस कमी करुन प्लॉट देण्यात आलेला नाही. ज्या ठिकाणी प्रमाण कमी आहे त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी जरुर माहिती द्यावी. मी जी माहिती घेतलेली आहे त्यानुसार एकूण जी 10 टक्के ओपन स्पेस राखून ठेवावी लागते तेवढे प्रमाण कायम ठेवून जागा वितरित करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी आर्किडच्या बाबतीत उल्लेख केला. वृक्षतोडीच्या बाबतीत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पंचनामा केलेला आहे आणि पुढील कारवाई केली जाईल.

------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 सबंधी**

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचना मी राखून ठेवत आहे. यासंदर्भात सन्माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती केली होती. ती विनंती मी मान्य केली आहे. ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेतली जाईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : वांद्रे (पूर्व) येथे कामगार कल्याण केंद्राच्या इमारतीची पडझड झाल्याने नवीन वास्तूच्या उभारणीचे काम सुरु झाल्याने तेथील व्यायामशाळा व इतर उपक्रम बंद करण्यात आल्याबाबत.

**मु. शी.** : वांद्रे (पूर्व) येथे कामगार कल्याण केंद्राच्या इमारतीची पडझड झाल्याने नवीन वास्तूच्या उभारणीचे काम सुरु झाल्याने तेथील व्यायामशाळा व इतर उपक्रम बंद करण्यात आल्याबाबत श्री. मधुकर सरपोतदार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" वांद्रू (पूर्व) येथे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने 50 वर्षापूर्वी मुंबईतील कामगार वर्गासाठी गांधीनगर व खेरनगर वसाहतीची उभारणी केली. त्या परिसरात राहणाऱ्या कामगार वर्गाच्या दृष्टीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने गांधीनगर येथे कामगार कल्याण केंद्राची स्थापना केली. या कामगार कल्याण केंद्रातर्फे तेथे व्यायामशाळा व इतर अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जाऊ लागले. या कल्याण केंद्राचा लाभ तेथील रहिवाशी घेऊ लागले. परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे अस्तित्वात असलेल्या केंद्राची जागा अपुरी पडू लागली. तव्दत कल्याण केंद्राच्या वास्तूची पडझड झाल्यामुळे दुरुस्ती करणे आवश्यक झाले. याबाबत 1990 पासून सातत्याने महाराष्ट्र शासन व आयुक्त, कामगार कल्याण यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर नवीन वास्तू उभारण्याचा निर्णय महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने घेतला. पूर्वीची जुनी इमारत पाडून नवीन वास्तू उभारणीच्या

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कामाला सुरुवात केल्यामुळे तेथे चालणारे व्यायामशाळा व इतर उपक्रम बंद करण्यात आले. मात्र मागील दोन वर्षापासून अद्याप काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे स्थानिक नागरिकांना कामगार कल्याण केंद्रापासून मिळणाऱ्या सुविधांपासून वंचित व्हावे लागले आहे. परिणामी तेथील जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. या कल्याण केंद्राचे काम त्वरित पूर्ण व्हावे याकरिता अनेकदा संबंधितांना लेखी विनंती करुनही त्याबाबत प्रगती होताना दिसत नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे."

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

या भागात कामगार कल्याण केन्द्राची एकमेव इमारत आहे. सिमेंटचा आणि बांधकाम साहित्याचा तेथील रहिवाशंना जबरदस्त त्रास होत आहे. यासंबंधी आयुक्त,कामगार कल्याण यांनी त्वरित कारवाई करण्यासंबंधी मी पत्र लिहिलेले असून त्यांच्याशी फोनवरुन देखील संपर्क साधलेला आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.बरवड 13:20

**पृ.शी.** : मोखाडा तालुक्यातील (जिल्हा ठाणे) कारेगाव येथील आश्रमशाळा आणि परिसरातील बंद असलेली नळ योजना

**मु.शी.** : मोखाडा तालुक्यातील (जिल्हा ठाणे) कारेगाव येथील आश्रमशाळा आणि परिसरातील बंद असलेली नळ योजना याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यानी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मोखाडा तालुक्यातील (जिल्हा ठाणे) कारेगाव येथील आश्रमशाळा आणि परिसरातील चार गावांना पाणी पुरवठा करणारी नळ योजना नोव्हेंबर 2006 पासून बंद असल्याने ग्रामस्थांचे व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे होणारे हाल" याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष उल्लेखाची सूचना मी मांडत आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील कारेगाव याठिकाणी एक शासकीय आश्रमशाळा असून जवळपास 450 ते 500 विद्यार्थी त्या आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळेला आणि त्या परिसरातील चार-पाच गावांना पाणी पुरवठा करणारी नळ योजना ही नोव्हेंबर 2006 पासून बंद पडलेली आहे. जिल्हा परिषदेने या नळ योजनेचे काम ठेकेदार म्हणून पी.पी. कन्स्ट्रक्शन कंपनीकडे दिले. गेल्या पाच वर्षापासून या नळ योजनेसाठी बराचसा खर्च झालेला असून त्यापैकी 2 लाख रुपये जिल्हा परिषदेकडे थकीत आहेत. ठेकेदार म्हणून असलेल्या पी.पी. कन्स्ट्रक्शन कंपनीला जिल्हा परिषदेने पैसे न दिल्यामुळे ही नळ योजना नादुरुस्त होऊन बंद पडलेली आहे. ही नळ योजना दुरुस्त करण्यासंबंधी पी.पी.कन्स्ट्रक्शन कंपनी आणि जिल्हा परिषद यांच्यामध्ये पैशावरुन वाद सुरु आहे. परिणामी मोखाडा येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा आणि आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांचा पिण्याचा पाण्याचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

कारेगाव येथील 87 टक्के लोक हे आदिवासी आहेत. त्यामुळे ते पाणीपट्टी भरु शकत नाहीत. शासनाचे म्हणणे असे आहे की, पाणीपट्टी न भरल्यामुळे ठेकेदाराला पैसे देता येत नाही. आता मोखाडा तालुक्यातील कारेगाव येथील आश्रमशाळा ही 10वी परीक्षा केन्द्र असून आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थी त्याठिकाणी परीक्षेसाठी येत आहेत. तेव्हा याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना मी दिलेली आहे.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात विमान तिकिटांच्या ई-बुकिंगमध्ये बोगस क्रेडिट कार्ड वापरुन तिकिट विक्री होत असल्याबाबत

**मु.शी.** : राज्यात विमान तिकिटांच्या ई-बुकिंगमध्ये बोगस क्रेडिट कार्ड वापरुन तिकिट विक्री होत असल्याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात ऑनलाईन तिकिट विक्री मोठ्या प्रमाणात होत असून त्यात होणारा घोळ व भ्रष्ट्राचारही उघडकीस येत असणे, विमान तिकिटांच्या ई-बुकींगमध्ये बोगस क्रेडिट कार्ड वापरुन तिकिट विक्री करत असल्याचे माहे फेब्रुवारी 2007 च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच रेल्वे तिकिटांची मुदतपूर्व तिकिट विक्री होत असणे, त्यामुळे या ऑनलाईन तिकिट विक्रीबाबत लोकांत पसरलेली साशंकता, या सेवा चांगल्या प्रकारे नागरिकांपर्यन्त पोहोचविण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता."

सभापती महोदय, आधुनिक संगणकप्रणालीच्या सहाय्याने राज्यात ऑन लाईन तिकिट विक्रीची योजना सर्वसामान्य जनतेत अल्पावधीत लोकप्रिय झालेली आहे. असे असताना काही समाजविघातक घटकांमुळे या क्षेत्रात गुन्हेगारी सुरु झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. या योजनेत मोठ्या प्रमाणावर होत असलेला गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार वेळोवेळी उघडकीस आलेला आहे. किंग फिशर एअर लाईनच्या विमान तिकिटांच्या ई-बुकिंगमध्ये बोगस क्रेडिट कार्ड वापरुन तिकिट विक्री करुन लाखो रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे फेब्रुवारी 2007मध्ये उघडकीस आले. परिणामी या सेवेबद्दल सर्वसामान्यांच्या मनात साशंकता निर्माण झालेली आहे. विमानांच्या तिकिटांप्रमाणे रेल्वे तिकिटांची देखील मुदतपूर्व तिकिट विक्री होत असल्याचे उघडकीस आलेले आहे. अशा प्रकारे

..5..

अप्रसिद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



(श्री. संजय दत्त...)

मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या गैरव्यवहारांमुळे ही सेवा न वापरणे बरे अशा प्रकारची भावना लोकांमध्ये निर्माण झालेले आहे. सायबर क्राईमचे वाढते प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी शासनाने विशेषत: गृह खात्याने वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे जेणेकरुन ही सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यन्त पोहोचू शकेल. तेव्हा या तातडीच्या विषयाकडे मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधित आहे.

----

**सभापती** : आता मी सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी तहकूब करीत आहे. दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(दुपारी 1.24 ते 2.00 मध्यंतर)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, महत्वाच्या प्रश्नासंबंधीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा सुरु व्हावयाची आहे. अशा परिस्थितीत कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरीता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 02 वाजून 01 मिनिटानी 15 मिनिटांकरीता स्थगित झाली)

---------

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: राज्यात कायदा सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती.

**मु.शी.**: राज्यात कायदा सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत, विनोद तावडे, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, अनिल परब, संजय केळकर, अरविंद सावंत, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात गेल्या 5 ते 6 महिन्याच्या काळात झालेल्या नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हापरिषद व नगरपरिषदांच्या निवडणुकी दरम्यान लोकप्रतिनिधींवर व निवडणूक उमेदवारांवर झालेले प्राणघातक हल्ले, परिणामी राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती, पोलिसांकडून आंदोलकांवर गोळीबार करण्याच्या सर्रास घडलेल्या घटना, चोऱ्या, बँकावरील दरोडे, या दरोड्यांमध्ये पोलीस हवालदार व पोलीस अधिकाऱ्यांच्या झालेल्या हत्या, वृध्दांच्या हत्या व अल्पवयीन मुलींवर बलात्कार होण्याच्या सातत्याने वाढत असलेल्या घटना, अंमली पदार्थाची सर्रास होत असलेली विक्री, नकली नोटांची छपाई करणाऱ्या टोळ्यांची वाढत असलेली संख्या, राज्याच्या विविध भागात सापडलेली घातक स्फोटके व शस्त्रास्त्रे, राज्यभर सिमी, लष्कर-ए-तोयबा, अल-कायदा यासारख्या अतिरेकी संघटनांचे पसरत असलेले जाळे, अतिरेक्यांना शोधून काढून गुन्हेगारांमध्ये कायद्याची जरब बसविण्यात पोलिसांना आलेले अपयश, भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे बांधकाम करताना दोन पोलीसांचा गेलेला बळी व अद्यापही त्या बांधकामाला सुरुवात न होणे तसेच पोलिसांच्या पगारवाढीची सतत करण्यात आलेली घोषणा, परंतु कार्यवाहीचा अभाव, पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करण्याऱ्या घटनांचे वाढते प्रमाण, पोलीसांवर कामाचा पडत असलेला अतिरिक्त ताण, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KT/ SBT/ 14:20

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, गेली 18 वर्षे मी या सभागृहाचा सदस्य आहे. या 18 वर्षामध्ये मी पाहिलेले आहे की, जे जे विरोधी पक्षात असतात त्यांच्याकडून नेहमीच कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली जाते. कायदा आणि सुव्यवस्था प्रश्नावर चर्चा करीत असताना स्वाभाविकपणे दाऊद इब्राहिम विरुध्द, बांगलादेशी नागरिकांविरुध्द, अतिरेक्यांविरुध्द, गुन्हेगारांविरुध्द, दरोडेखोरांविरुध्द हल्ला करण्याची संधी आम्हाला मिळते. कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असताना अतिरेकी, गुन्हेगारांविरुध्द कारवाईची अपेक्षा आहे. पण एका राजकीय पक्षाचे नेते, राज्याचे मंत्री जे प्रकार करीत आहेत, त्याबाबत सभागृहात बोलण्याची वेळ आलेली आहे ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे. आज महाराष्ट्रावर हा दुर्दैवी प्रसंग आलेला आहे. राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये जो प्रकार घडला तो आपल्या सर्वांची इभ्रत वाढविणारा नाही. श्री.मोहनराव कदम, अध्यक्ष, सांगली जिल्हा, कॉग्रेस (आय ) यांनी दिनांक 2 मार्च 2007 रोजी व श्रीमती नीता केळकर, सरचिटणीस भाजपा महिला मोर्चा यांनी दिनांक 3 मार्च 2007 रोजी तासगाव जिल्हातील जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेबाबत तक्रारी केल्या. त्या तक्रारीची दखल घेतली गेली असती तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. जिल्हाधिकारी, सांगली यांनी ही तक्रार राज्याच्या निवडणूक आयोगाकडे दिनांक 5 मार्च रोजी फॅक्सद्वारे कळविली व दिनांक 6 मार्च रोजी पत्र पाठविले. दिनांक 7मार्च 2007 रोजी सावळज येथील श्री.सुभाष माळी यांनी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र सादर केले. त्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, दिनांक 2 मार्च 2007 रोजी अर्ज मागे घेण्याची वेळ संपल्यानंतर दुपारी 4.00 वाजता राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते व उमेदवार श्री. किशोर उनउणे यांनी व त्यांच्यासोबत काही पोलिसांना घेऊन त्यांचेवर दबाव आणून अर्ज मागे घेण्याच्या अर्जावर जबरदस्तीने सही घेतली." सदरहू तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री मीना, सचिव, राज्य निवडणूक आयोग हे दिनांक 7 मार्च 2007 रोजी तासगाव येथे चौकशी करण्यासाठी रवाना झाले. अधिकाऱ्यांपुढे जवळपास 29 व्यक्तींची चौकशी करण्यात आली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हीं.डि.ओ. चित्रण आयोगाकडे उपलब्ध आहे. त्यावरुन असे दिसते की, दिनांक 2 मार्च 2007 रोजी उमेदवारी अर्ज मागे

..2..

श्री.नितीन गडकरी...........

घेण्यासाठी एक मिनिट शिल्लक असल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या शिपायाने केली. दुपारी 3.00 वाजता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे बाहेरचे दार बंद करण्यात आले. परंतु कार्यालयाच्या मागील दरवाजातून मात्र कार्यकर्त्यांचे जाणे येणे सुरुच होते.

श्री.आर.आर.पाटील ( बसून ) : त्या ऑफिसला मागील दार नाही. आपण तेथे जाऊन पाहू शकता.

श्री.नितीन गडकरी : परंतु हे खरे आहे की, शेवटच्या एक मिनिटात 119 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. हे सर्व मागच्या दाराने झाले. माझ्याकडे माहिती आहे, आपण ती तपासावी.

सभापती महोदय, शिवसेनेचे उमेदवार श्री.पंचाक्षरी जंगम यांनी आपली तक्रार मागे घेतली. सांगली जिल्ह्यातील शिवसेना आणि भाजप पक्षाच्या उमेदवारांचे म्हणणे आहे की, आम्हाला तुम्ही निवडणुकीसाठी उभे करु नका. आम्ही निवडणुकीसाठी उभे राहिल्यास जीवंत राहू शकणार नाही. आमचा परिवार जीवंत राहू शकणार नाही. आम्ही आपल्याच पक्षाचे आहोत. परंतु आम्हाला निवडणुकीसाठी उभे करु नका. जेव्हा त्याठिकाणी पुन्हा निवडणूक घेण्याचे आदेश झाले त्यावेळी मी नागपूर येथे जाहीर केले की, त्याठिकाणी पुन्हा बिनविरोध निवडणूक होणार आहे. माझे मित्र ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, त्याठिकाणी किती सुंदर कायदा आणि सुव्यवस्था आहे. आम्ही सोडा, परंतु काँग्रेसचे कणखर नेते डॉ.पंतगराव कदम यांच्या उमेदवारांची सुध्दा तेथे डाळ शिजली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी चाकण येथील भाषणात सांगितले की,"माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांच्या बळावर निवडणूका लढवू नयेत, कार्यकर्त्यांच्या बळावर लढवाव्यात." माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे माननीय उपमुख्यमंत्री कितपत गंभीर घेतील मला माहीत नाही. पण ते छान हसतात, छान बोलतात. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री एकमेकांना किती सिरिअस घेतात ते मला माहीत नाही. परंतु मला वाटते की, माननीय मुख्यमंत्र्यांचे बोलणे मानननीय उपमुख्यमंत्र्यांनी गंभीरपणे घेतले असते तर ही वेळ आली नसती.

यानंतर श्री.पुरी........

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 14:25

श्री.नितीन गडकरी...

एकंदरच हे प्रकरण अतिशय दुर्दैवी आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांवर कलम 342 लावण्यात आले आहे. हे कलम एखाद्याला जबरदस्तीने डांबून ठेवणे वा ताब्यात ठेवण्याबाबतीतील असून ते राज्याच्या उप मुख्यमंत्र्यांवर लावले गेले आहे. दुसरे कलम 506 लावण्यात आले आहे. हे कलम गुन्हेगारी हेतूने धमकी देण्याचा उल्लेख करणे याबाबतीतील आहे. तिसरे कलम 171 (एफ) असून ते वर्दीचा गैरवापर व वर्दीचे सोंग आणल्याबद्दलचे आहे. अशाप्रकारे राज्याच्या उप मुख्यमंत्री व गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांच्यावर आरोपी म्हणून 342, 506 व 171 (एफ) अशी तीन कलमांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. आज महाराष्ट्राची काय परिस्थिती आहे ? हे मला समजत नाही. आजपर्यंत देशातील कुठल्याही राज्याच्या इतिहासामध्ये एखादया गृहमंत्र्यांविरुध्द् अशाप्रकारच्या कलमांतर्गत एफआयआर दाखल झालेला नसावा.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : केंद्रीय मंत्र्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे. श्री.अडवाणी साहेब, गृहमंत्री असताना त्यांच्यावर बाबरी मशिदीसंदर्भात गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यांच्यावरील गुन्हे काढले गेले असतील तर त्याची माहिती मला नाही. त्यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. तसेच, जर कोणाविरुध्द गुन्हा दाखल झालेलाच असेल तर याचा अर्थ असा होत नाही की त्यांनी गुन्हा केला असेलच.

श्री.नितीन गडकरी : त्यांच्याविरुध्द् कोणते कलम लावले होते, ते सांगावे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : त्यांच्यावर गुन्हा नोंद झालेला आहे.

श्री.नितीन गडकरी : मग, कलम कोणते लावले ते सन्माननीय सदस्यांनी सांगावे ? श्री.गुरुनाथ कुलकर्णी, आपणच माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांची वाट लावायला कारणीभूत आहात. सभापती महोदय, आज राज्यामध्ये काय चालले आहे ? "गुन्हेगार कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याला मत देऊ नका" असे स्टेटमेंट माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब आपणच केले होते. परंतु आपण आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी पिंपरी-चिंचवड येथे गेलात की नाही याची मला माहिती नाही. तसेच पुणे जिल्हयामध्ये आपले राज्यच कुठे आहे ? तेथे छोटया बाळराजांचे राज्य आहे...(अडथळा) आम्ही पाठिंबा दिलेला नाही. आमच्या मित्रांनी दिलेला आहे. परंतु एक गोष्ट खरी आहे की, पुणे जिल्हयामध्ये माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब आपले राज्य नसून श्री.अजित पवार यांचे राज्य आहे. मला हेच कळत नाही की, आपण कशाला चांगल्या गोष्टी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मांडता ? आपण चांगल्या गोष्टी जनतेसमोर मांडता परंतु त्याचा आणि आपल्या पक्षातील नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा सुतराम संबंध नसतो. मग, आपण कशासाठी स्वत:ची कुचंबणा करुन घेता ? माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, आपण सज्जन आहात. तिकडे श्री.अजित पवार साहेब, कलम 302 चा गुन्हा दाखल असलेल्या उमेदवाराला तिकीट देतात व त्याच्या प्रचारासाठी आपल्याला जावे लागते. कशासाठी आपण अशाप्रकारची कुचंबणा करुन आपला मनस्ताप वाढवून घेता ? सभापती महोदय, सांगली जिल्हयातील निवडणुकीमध्ये एका मिनिटामध्ये 119 अर्ज मागे घेण्याचे प्रकरण झालेले आहे, हे बरोबर नाही. हे मी सांगत नाही. राज्याच्या निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, हे संशयास्पद व अशक्य आहे. निवडणूक आयुक्तांनीच हे गंभीर प्रकरण असल्याचे सांगितले आहे. परंतु याबाबतची चौकशी आपण सीआयडीमार्फत करीत आहात, हे योग्य नाही. मला एक कळत नाही की, या प्रकरणामध्ये गृहमंत्रीच आरोपी असून त्यांच्याविरुध्द कलमे लावलेली आहेत. आणि या प्रकरणाची चौकशी त्यांच्याकडे असलेल्या गृह विभागांतर्गत सीआयडीमार्फत का करीत आहात ? आपण यामध्ये काय चौकशी करणार आहात ? या प्रकरणाबाबत माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्याकडे चौकशीचे आदेश असते तर जास्त योग्य झाले असते, असे मला वाटते. या प्रकरणाच्या बाबतीत सीआयडी चौकशीस अर्थ नाही.

श्री. आर. आर. पाटील : आपण चौकशी करावी. मी आपणाकडे ही चौकशी देतो.

श्री.नितीन गडकरी : आपल्याला या प्रकरणाची चौकशीच करावयाची असेल तर जी एजन्सी राज्य सरकारच्या कंट्रोलमध्ये नाही, अशा एजन्सीकडून आपण चौकशी करावी. या प्रकरणी आपण सीबीआय चौकशी करा. आपले व माननीय मुख्यमंत्र्यांचे को-ऑर्डिनेशन व टयूनिंग चांगले आहे. खैरलांजी प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सीबीआयमार्फत चौकशी करण्याचे सांगितले. त्यानंतर आपण स्टेटमेंट दिले.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

"तुझे माझे जमेना आणि तुझ्याविना करमेना" अशा प्रकारचा संसार सुरु आहे. मला एक कळत नाही, नेमका प्रणय सुरु आहे की, मारपीट सुरु आहे ? एकीकडे मुके घेण्याचा कार्यक्रम सुरु असतो आणि दुसरीकडे मारामारी सुरु असते. सी.बी.आय.ची इन्क्वायरी लावल्यामुळे आरोपी सुटून गेले.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सी.बी.आय.ची इन्क्वायरी लावल्यामुळे खैरलांजी प्रकरणातील आरोपी सुटले, असे स्टेटमेंट मी कधीही केलेले नाही आणि अशा प्रकारचे स्टेटमेंट वर्तमानपत्रात छापूनही आलेले नाही. अशा प्रकारचे वृत्त छापून आले असेल तर सन्माननीय सदस्यांनी ते दाखवून द्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला पुरावे देतो. आपण पाहिले आहे की, गृह विभागाने संबंधितांना आरोपी केले व त्यांच्यावर केसेस टाकल्या. "कारवाई बरोबर केली", असे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. नंतर ते म्हणतात की, "काँग्रेसच्या लोकांनी दबाव आणून, विशेषम: मुख्यमंत्र्यांनी, सी.बी.आय.इन्क्वायरी लावली आणि आता ते आरोपी सुटले आहेत." ही प्रतिक्रिया माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी निवडणुकीच्या भाषणांमध्ये दिली आहे. आता परवा तमाशा महोत्सवामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री दोघेही हसत होते, एकमेकांवर केलेले आरोप ते विसरले आहेत. होळी, रंगपंचमी सुरु असतांना जी वक्तव्ये केली ती आता त्यांना आठवत नाहीत. मुख्यमंत्री महोदय बहुदा 8/10 दिवस होळी साजरी करीत होते.

सभापती महोदय, आमच्या राज्याचे एक प्रमुख मंत्री, डॉ.पतंगराव कदम यांनी देखील काही आरोप केलेले आहेत. त्यांच्याबद्दल मी या ठिकाणी बोलणार असल्यामुळे माननीय सभापती महोदयांना माझी विनंती आहे की डॉ.पतंगराव कदम यांना सभागृहात बोलावून घ्यावे. कारण, ते सभागृहात अनुपस्थित असतांना त्यांच्यासंदर्भात वक्तव्य करणे बरोबर होणार नाही. तासगाव येथे पार पडलेल्या निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार, माननीय डॉ.पतंगराव कदम काय म्हणाले, हे लक्षात घ्या.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : डॉ.पतंगराव कदम हे मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार आहेत, हे सन्माननीय सदस्य कशावरुन सांगत आहेत ?

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला ते मुख्यमंत्री पदाचे दावेदार म्हणून मान्य आहेत, ते एक डायनॅमिक लिडर आहेत, समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना ते चालत नसतील तर त्याला आमचा नाईलाज आहे. परंतु, डॉ.पतंगराव कदम हे मुख्यमंत्री पदाचे एक सिरियस क्लेमंट आहेत, असे आम्ही मानतो. ते असे म्हणाले की, "निवडणुक बिनविरोध करण्यासाठी गुत्तेवाले, गुंड, पोलीस यांना बरोबर घेऊन तासगावमध्ये जे गैरप्रकार घडले ते अत्यंत खेदजनक व चिंताजनक आहेत." सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, त्यांचा या विधानाला काही आक्षेप आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : मी माझ्या उत्तरात यासंदर्भातील खुलासा करणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी मघाशी माझ्या एका वक्तव्याचा खुलासा केला म्हणून मी विचारणा केली. माननीय मंत्री, डॉ.पतंगराव कदम पुढे जाऊन काय म्हणाले तेही बघा. ते असे म्हणाले की, "राज्य निवडणूक आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली, हे बरे झाले. असंगाशी संग केल्यामुळे आमचा छोटा भाऊ भरकटत निघाला आहे. अजूनही त्याने शिकावे की, आपण कुणाची संगत करतो आहोत." दिनांक 11 मार्च 2007 रोजीच्या 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्रात ही बातमी प्रसिध्द झाली आहे. समाजात या वृत्तपत्राची विश्वसनीयता देखील आहे. मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार, एक संवेदनशील नेते, नामदार डॉ.पतंगराव कदम यांनी काढलेले हे उद्‌गार आहेत. माझे दु:ख हेच आहे की, लर्नेड ॲडव्होकेट, गुरुनाथ कुलकर्णी यांच्यासारखा ओरिजिनल माल भंगारात आणि संजय पाटील यांच्यासारखा डयुप्लिकेट, डिफेक्टिव माल चलनात आणीत आहात. नकली, डिफेक्टिव माल चलनात आणि ओरिजिनल माल भंगारात. सोनिया गांधीचे मोठेपण सांगण्यासाठी आता नारायण राणे येणार आणि सुरुवातीपासून निष्ठावान असणारे गोविंदराव आदिकसाहेब आता सभागृहात देखील येत नाहीत.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:35

श्री.नितीन गडकरी .........

तुमच्या पक्षाची क्वॉलिटी कंट्रोल लॅबॉरेटरी बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.निकोसे साहेब तुमच्यासारखा ओरिजनल माल भंगारामध्ये आणि जे गोडसेचे पुतळे उभे करावयास निघाले होते ते माननीय श्री.छगन भुजबळसाहेब गांधीवादाचे उदात्त नेते, इंदिरा गांधी यांच्या बरोबर काम करणारे निष्ठावान नेते श्री.गोविंदराव आदिक भंगारमध्ये, हे बरोबर नाही. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी निष्ठावान आहेत आणि माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेबांचे स्टार सध्या चांगले आहेत. सभापती महोदय, यांच्या पक्षात काय चालले आहे ?

" इथे कुणाला मरण जन्मता,
दगडाला पण चिरंजीविता,
बोरी बाभळी उगाच जगती,
चंदन माती कोठार
विलासराव, अजब तुमचे सरकार."

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत भंगार शब्द बोलणे योग्य नाही. तो शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, रेकॉर्डवरुन काढून टाकण्यासारखे मी काही बोललेलो नाही.

**उपसभापती** : श्री.गोविंदराव आदिक अंगार है, बाकी सब भंगार है.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याला मी सहमत आहे. माननीय श्री.पतंगराव कदम साहेबांनी दिनांक 9 मार्च रोजी सांगली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत असे सांगितले की, "गृह मंत्र्यांविरुध्द पोलिसांना गुन्हे दाखल करावे लागणे ही लाजिरवाणी घटना आहे." तुमचे सहकारी, तुमचे मोठे भाऊ माननीय श्री.पतंगराव कदम तुम्हाला असे म्हणतात की, "गृह मंत्र्यांविरुध्द पोलिसांना गुन्हे दाखल करावे लागणे ही लाजिरवाणी घटना आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची चर्चा बिहार राज्याबरोबर होऊ लागल्याने महाराष्ट्र राज्याची पत गेली." सभापती महोदय हे मी म्हणत नाही. खरे म्हणजे माननीय श्री.पतंगराव कदम साहेबांनी विरोधी पक्षाला काही कामच ठेवलेले नाही. सत्ताधारी पक्षाचे आणि विरोधी पक्षाचे काम तेच करीत आहेत.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, महानगरपालिका आणि नगरपालिकांचे निकाल बघितले तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला नगरपालिका निवडणुकीत 80 टक्के, जिल्हापरिषद निवडणुकीत 80 टक्के जागा मिळालेल्या आहेत आणि महानगरपालिकेमध्ये देखील तेच प्रमाण आहे. तुमचा जो मुद्दा आहे तो चुकीचा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, "महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची चर्चा बिहार राज्याबरोबर होऊ लागल्याने महाराष्ट्र राज्याची पत गेली." हे सन्माननीय पतंगराव कदम यांचे मत सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी मान्य केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझ्या आयुष्यात मी पहिल्यांदा एवढे अभद्र घडलेले पाहतो आहे. या घटनेतील तथ्य आयोगाच्या चौकशीसमोर येईल. परंतु गृह मंत्र्यांविरुध्द गुन्हा दाखल झाल्याने देशामध्ये महाराष्ट्राबद्दल वाईट संदेश गेलेला आहे. गृह मंत्र्यांविरुध्द गुन्हे दाखल होणे, ही गोष्ट लाजिरवाणी आहे. सभापती महोदय, जिल्हापरिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीपूर्वी महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचार करतांना माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील सभेतील प्रेक्षकांना प्रश्न विचारावयाचे.

"काय होतास तू, काय झालास तू,
का रे असा बहकलास तू."

माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील असे म्हणत होते की, निवडणुकीत गुन्हेगार, झ
ोपडपट्टी दादा, दहशतवादी निवडून येणार असतील तर त्याला अर्थ काय ? माननीय गृहमंत्री काय बाणेदार बोलत होते. पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांची लिस्ट मी आपल्याला वाचून दाखवितो.

यानंतर कु.खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आर.आर.पाटील साहेब आपण राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष होता, आता उप मुख्यमंत्री झाला आहात. तुमच्या झेंडयाखाली,दिव्याखाली काय अंधार आहे तो बघितला का ? पिंपरी चिंचवड या भागातील काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी असणा-या उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे आहे. श्री.सुरदास गायकवाड यांच्यावर 341,143,427,452,324 या कलमाखाली गुन्हे आहेत, श्रीमती चंद्रकांता सोनकांबळे यांच्यावर 427,504,336,135 या कलमाखाली गुन्हे आहेत, हर्षवर्धन पाटील साहेब तुमची माहिती माझ्यापेक्षा जास्त आहे, तेव्हा माझे काही चुकल्यास तुम्ही त्यात दुरुस्ती करावी. श्री.रंगनाथ फुगे यांच्यावर 332,148,136,353,451या कलमाखाली गुन्हे आहेत,जवळपास 20-22 गुन्हे अजूनही आहेत, श्री.माऊली लोंढे यांच्यावर 341,315,335 /1 या कलमाखाली गुन्हे आहेत,श्री.अजित गव्हाणे यांच्यावर 341,36/1,35 या कलमाखाली गुन्हे आहेत, श्री.प्रल्हाद सुधारे यांच्यावर 324 या कलमाखाली गुन्हे आहेत. श्री.महेश लांडगे, यांच्यावर 148,506,427,323या कलमाखाली गुन्हे आहेत, श्री.सुदाम लांडगे यांच्यावर 326,34,106 व आय.पी.सीच्या 326,34,106 या कलमाखाली देखील गुन्हे आहेत. श्री.जावेद शेख यांच्यावर पाच खुनाचे गुन्हे, श्री.जावेद मियीदाद शेख यांच्यावर 4 ते 5 खुनाचे गुन्हे आहेत. अरुणभाऊ वाजवा टाळया, असा आपला पक्ष राष्ट्रवादी काँगेस !

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,या सभागृहात ज्या ज्या पक्षाचे लोक बसलेले आहेत किंवा ज्या ज्या पक्षाचे प्रतिनिधी बसलेले आहेत, त्या सर्वांमध्ये फक्त राष्ट्रवादीच्याच उमेदवारांनी उपरोक्त गुन्हे केलेले आहेत का ? इतर पक्षाच्या उमेदवारांनी एकही गुन्हा केलेला नाही का ?

श्री. नितीन गडकरी : तुम्हाला माझे म्हणणे एकवत नाही, सहन होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी तुमची परिस्थिती झालेली आहे. आमच्या पक्षाचा पुष्कळ इम्पोर्टेड माल तुम्हीच आपल्याकडे घेतलेला आहे. सभापती महोदय, श्री.जावेद शेख यांच्यावर पाच खूनाचे गुन्हे दाखल आहेत आणि त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. श्री.परेश आसवाने हे तर तुरुंगातच होते. श्री. प्रशांत फुगे यांच्यावर 143,148,149,23,506 या कलमाखाली गुन्हे आहेत. श्री.शिंदे यांच्यावर 306,324,504,508,427 या कलमाखाली गुन्हे आहेत. श्री.सुरेश फुगे यांच्यावर 302,394,393 या कलमाखाली गुन्हे आहेत. श्री.गणपत लांडगे यांचयावर 104,394,326 या कलमाखाली गुन्हे

X-2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आहेत. श्री.विजय कापसे यांच्यावर 302 या कलमाखाली गुन्हे आहेत. श्री.योगेश बहल यांच्यावर देखील गंभीर गुन्हे दाखल झाले होते. श्री.बाळासाहेब हिंदळेकर यांच्यावर 420,466,464,511/34,158,342,394,332,342,504/347/1,343,10 या कलमाखाली गुन्हे आहेत. हे कोणाला सांगणार तुम्ही ? अशा प्रकारच्या पक्षात तुम्ही असतांना तुम्ही निवडणूकीच्या प्रचारात जनतेला आव्हान करता की, गुन्हेगारांना आणि गुंडागर्दी करणा-यांना, झोपडपट्टी दादांना मते देऊ नका. आता तुम्ही या पक्षाचे केवळ नेतेच नसून राज्याचे गृहमंत्री आहात. आमचे गुन्हे तुम्ही वाचून दाखवा, कमीत कमी आम्ही जनतेसमोर तुमच्यासारखी पोपटपंची तरी करीत नाही.

श्री.आर.आर.पाटील : गडकरी साहेब, आता पळवाट कशाला काढता ?

श्री.नितीन गडकरी : तुम्हीच जनतेला गुंडागर्दी करणा-यांना मते देऊ नका, असे आव्हान केले.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी जनतेला आव्हान केले होते की, झोपडपट्टी दादांना,गुन्हेगारांना मते देऊ नका. परंतु या आव्हानामध्ये मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांकरिता सूट मागितली नव्हती.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री. आर.आर.पाटील यांचे त्यांच्याच पक्षात कोणी ऐकत नाही म्हणून हे असे घडले असेल.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड येथील आमच्या पक्षाच्या अध्यक्षाला काय मारले आहे....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय सदस्यांना विनंती करीन की, त्यांनी तासगाव संबंधात देखील विस्ताराने सांगावे. त्यासाठी वाटल्यास त्यांना मी माझा वेळ देतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी माझ्यावर नोंद झालेले गुन्हे सांगितले. परंतु त्याच श्री.जंगम यांनी ती तक्रार मागे घेतली आणि त्यांनी पोलिसांकडे अशीही तक्रार केली आहे की, भाजपाचे श्री.प्रकाश जावडेकर, नीता केळकर आणि श्री.गरूड यांनी त्यांच्यावर दबाव टाकून तक्रार करण्यास लावली. त्यांच्यावरील गुन्हे स्टॅण्ड झालेले आहेत आणि माझ्यावरील गुन्हे कोर्टासमोर डी-समरी झालेले आहेत. ही सगळी माहिती देखील सन्माननीय सदस्यांनी येथे विस्ताराने सांगावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला इतकेच सांगावयाचे आहे की, तुम्ही माझ्यावर बंदूक लावली तर मी काय उत्तर देणार ? ज्याचे तुम्ही ॲफिडेविट बदलले, त्याला तेथे नेण्याची नीता केळकरला आणि इतरांना काय गरज होती ? ते ज्यांच्याकडे आलेले आहे ते सारे रेकॉर्डिंग केलेले आहे आणि ते मी माननीय गृहमंत्र्यांना दाखविणारच आहे. श्री.जंगम यांनी असेही सांगितले आहे की, माझ्यावर दबाव टाकून माझ्या सह्या घेतल्या आणि दुसरे असे की, एका मिनिटामध्ये 119 अर्ज मागे घेण्याचा लोकशाहीतील चमत्कार गृहमंत्र्यांच्या तासगावमध्ये केला गेला आहे. कदाचित त्यांच्या गोड शब्दांमध्ये त्यांनी त्यांना सांगितले असेल, किंवा माननीय पतंगराव कदमच अधिक काय ते सांगू शकतील. ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा आरोप व्यक्तिगत माझ्यावर असल्याने त्याबाबत उत्तर देण्याचा अधिकार मला आहेच. तसे उत्तर मी नंतरही देऊ शकतो. परंतु काही काळ का होईना माझ्याबद्दल असा काही समज होऊ नये म्हणून मला आता तत्परतेने काही खुलासा या संदर्भात करणे आवश्यक वाटत असल्याने मी आपल्याला काही सांगू इच्छितो. मी कशालाही स्मरून सांगू शकतो की, यापूर्वी आपण ज्यांचे नाव घेतले त्या जंगम वा इतरांना मी केव्हाही भेटलेलो नव्हतो. तसेच मी या लोकांनी त्यांचे अर्ज मागे घ्यावेत म्हणून समक्ष भेटून विनंती केलेली नाही. किंबहुना त्या साऱ्या प्रक्रियेचे व्हिडिओ शुटिंग झालेले आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना समक्ष विचारले असता त्यांनी स्वखुषीने अर्ज मागे घेत आहोत असे सांगितले आहे. सभापती महोदय, जो संशय आपल्याला आलेला आहे तो संशय निवडणूक आयोगाला देखील आला तो

...... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ...

म्हणजे शेवटच्या दिवशी शेवटच्या क्षणाला 119 जणांनी अर्ज कसे परत घेण्यात आले ? ही गोष्ट खरी आहे की, पक्षाचे उमेदवार ठरविण्यासाठी मी शेवटच्या दिवशी तासगावला गेलो होतो आणि अगदी 2.00 वाजता आम्ही आमचे उमेदवार घोषित केले त्यामुळे ज्यांनी अपेक्षेने अर्ज भरलेले होते त्यातील केवळ 18 लोकांचे अर्ज पक्षाचे उमेदवार म्हणून राहणार होते आणि बाकीच्यांना आपापले अर्ज मागे घ्यावे लागणार होते. अर्ज घेतानाच्या दिवशी देखील नेहमीच्या पद्धतीप्रमाणे वेळ संपत आली असता बाहेरचे गेट बंद करून घेतले गेले आणि आत असलेल्या सगळ्या उमेदवारांचे अर्ज कलेक्ट केले गेले. सभापती महोदय, मी सर्व कायदे तज्ज्ञांकडून माहिती घेतली आणि जाणून घेतले त्यानुसार ही पद्धती बरोबर आहे. अर्ज स्वीकारण्याची तसेच मागे घेण्याची मुदत संपते त्यावेळी बाहेरचे गेट लावून घेतले जाते आणि आत असलेल्यांना आत घेतले जाते व त्यांच्या अर्ज घेण्याची वा मागे घेण्याची प्रक्रिया सुरू ठेवून ती पूर्ण केली जाते. अर्ज भरून देण्याच्या दिवशी तसेच मागे घेण्याच्या दिवशी देखील वेळ संपताना बाहेरचे गेट बंद करून आतपर्यंत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज घेण्याची तसेच अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली गेली. या संदर्भात असेही म्हटले गेले की, अर्ज मागे घेताना मुदत संपताना बाहेरचे गेट बंद केले गेले पण मागील दरवाजातून लोक तेथे आत येत होते. सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी ज्या कार्यालयामध्ये ही अर्ज परत घेण्याची सारी प्रक्रिया चालली होती त्या कार्यालयाला मागील दरवाजा आहे काय हे आपणही पाहू शकता. सदनाचा वेळ जाईल म्हणून मी अधिक सांगणार नाही. पण निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांना देखील या सगळ्या गोष्टीचा संशय आला तो त्यासंबंधात तक्रारी आल्यानंतरच आणि एकदम 4-8 गटातील निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे त्याबाबत अधिक संशय येणे साहजिक आहे. त्यामुळेच त्यांनी त्या दिवशीची सारी प्रक्रिया रद्द केली. त्यासाठी रात्री 9 वाजता नोटिफिकेशन काढले गेले आणि ही सारी पक्रिया पुन्हा दुसऱ्या दिवशी पुन्हा 3.00 वाजेपर्यंत ठेवली. त्यावेळेस निवडणूक आयोगाने आपले खास निरीक्षक तेथे पाठविले होते. तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी देखील त्यावेळी तेथे उपस्थित होते. पण तरीही त्या ठिकाणी जेवढ्या गटांमध्ये बिनविरोध निवडणूक झाली होती तेवढ्याच गटामध्ये पुन्हा बिनविरोध निवडणूक होऊन तेच उमेदवार पुन्हा निवडून आले. तेव्हा तासगावमध्ये आम्ही लोकशाहीच आणलेली आहे हे मला येथे सांगितले पाहिजे. ...

( यानंतर श्री. गागरे ...... झेड 1 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

लोकशाहीच्या माध्यमातून मी येथपर्यंत आले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या एक उमेदवाराने काँग्रेस पक्षात जाऊन उमेदवारी अर्ज भरला. तर एक उमेदवार आमच्या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करुन पाचशे मतांनी निवडून आला. दोन जिल्हा परिषद गटामध्ये निवडणूका झ ााल्या, त्यामध्ये एकूण सात उमेदवार होते. एका उमेदवारास 12 हजाराचे मताधिक्य मिळाले, तर दुसऱ्या एका उमेदवारास 8 हजाराचे मताधिक्य मिळाले. दुसऱ्या एका गटामध्ये 8500 चे मताधिक्य मिळाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, जर निवडणूका बिनविरोध करण्याचे सामर्थ्य पोलिसांमध्ये असते तर सांगली जिल्हा परिषद आम्ही दोन मतामध्ये का सोडली असती ? मागच्या निवडणूकीच्या वेळी मी गृहमंत्री नसताना सांगली जिल्हा परिषद आमच्या पक्षाकडे होती, आता यावेळी जिल्हा परिषद काँग्रेसकडे गेली आहे.

सभापती महोदय, मी महाराष्ट्राचा गृहमंत्री आहे, दहशत करायचीच म्हटले तर माझी दहशत फक्त तासगाव मध्ये चालू शकते असे नसून बाकीच्या तालुक्यामध्येही मला तसे करता आले असते. राज्यामधील निवडणुका अगदी चांगल्या प्रकारे घेतल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही दहशत केली असती तर नागपूरमध्ये तुमची जिल्हा परिषद का आली असती ? आमच्या मित्र पक्षाला आम्ही पुढे का जाऊ दिले असते ? मला यातून एकच सांगावयाचे आहे की, आपण सर्वांनी सिस्टीमवर विश्वास ठेवला पाहिजे. श्री.जंगम यांना मी दमदाटी केली म्हणून त्यांनी तक्रार केली, असे म्हटले जात आहे. त्यांनी अर्ज मागे घेतला हे जर खरे मानायचे असेल तर, त्याच जंगम यांनी श्री.जावडेकर, केळकर व गरुड यांनी माझ्यावर दमदाटी करुन माझ्या विरोधात खोटी तक्रार करायला भाग पाडले. परंतु याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही, आम्ही पोलिसांसमोरच नव्हे तर न्यायालयासमोरही सांगितल्यावर जर आपण माझ्यावर विश्वास ठेवणार नसाल, किंवा जंगमच्या तक्रारीवर विश्वास ठेवणार असाल तर हे अन्यायकारक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

PNG/ KGS/ MAP/

श्री.आर.आर.पाटील........

सभापती महोदय, राजकारणामध्ये गुंडगिरी प्रवृत्तीचे लोक येत आहेत. सुरुवातीपासून गुंडगिरी प्रवृत्तीचा मी मुकाबला करीत आहे. माझे ठाम मत आहे की, गुन्हेगारी प्रवृत्ती राजकारणामध्ये येऊ नये. मी असे कधी म्हटलो नव्हते की, राष्ट्रवादीच्या गुंड उमेदवारांकडे दुर्लक्ष करा. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांना व त्यांना मदत करणाऱ्या लोकांनाही पराभूत करण्याचे काम आपण केले पाहिजे, असे खुले वक्तव्य मी केलेले आहे. याबाबतीत माझ्यावरील आरोप सिध्द होत असतील तर राजीनामा देण्याचीही माझी तयारी आहे.

सभापती महोदय, आमच्याकडील निवडणुका बिनविरोध होण्याचे प्रमुख कारण सभागृहास सांगतो. मागील 25 वर्षे तासगाव तालुक्यामध्ये लोकांचा राजकारणात संघर्ष सुरु होता. हा संघर्ष काँग्रेसमधील दोन गटामध्ये होता. भाजप शिवसेनेला कधीही तासगावमध्ये संधी मिळाली नव्हती. कारण काही लोक आमच्याकडे असायचे काही लोक तिकडे असायचे. विधानसभेची आकडेवारी पाहिली तर मला 70 हजार मते मिळाली आहेत, आणि काँग्रेसचे बंडखोर उमेदवार श्री.संजय पाटील यांना 66 हजार मते मिळाली आहेत. शिवसेनेच्या उमेदवारास 2100 मते मिळाली होती. अनेक निवडणूकांमध्ये शिवसेना भाजपाचे लोक मला न मागता पत्रक काढून समर्थन देत होते. ते समर्थन का देत होते ? हे मी विचारले नाही परंतु त्यांचे समर्थन मला मिळाले आहे. शिवसेनेचा तालुका प्रमुख, शहर प्रमुख, जिल्हा उपसंघटक व संपूर्ण शाखा दोन महिन्यापूर्वी राष्ट्रवादीमध्ये सामील झालेला आहे. काँग्रेसचे सर्व गट राष्ट्रवादीस मिळाले आहेत, शिवसेनेच्या सर्व शाखा राष्ट्रवादीमध्ये सामील झाल्या आहेत. सर्व तालुका एक होऊन चांगले वातावरण तयार झाले. कारण सर्वांना असे वाटले की, आपल्या सर्व निवडणुका बिनविरोध व्हायला पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपण खेडयातील राजकारण आठवा. गावातील निवडणूका असतील तर त्या गावातील सर्व लोक एकत्र जमतात, आणि आपल्या गावाला संधी मिळाली आहे, असेही वातावरण तयार होऊ शकते. उमेदवाला सहकार्य करण्याची भूमिका खेडयातील राजकारणामध्ये असते. माझ्या स्वत:च्या गावची निवडणूक मागील पंधरा वर्षात झालेली नाही. मी राजकारणात आल्यापासून विरोधी गटाला सामील करुन घेतले आहे. विधानसभेतून राज्यसभेवर पाठवायचे उमेदवार बिनविरोध निवडून येतात त्यावेळी आपण गुंडगिरी करतो असे नाही.

..... यानंतर श्री.सरफरे

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

त्यावेळी वरिष्ठ स्तरावर आपण नेते एकत्र बसतो आणि इतके आमचे उमेदवार, इतके तुमचे उमेदवार अशाप्रकारे संख्या निश्चित करुन उमेदवार उभे करतो. याठिकाणी भाजप आणि शिवसेनेला खरे दुःख झालेले नाही. याठिकाणी झालेले दुःख हे वेगळे आहे. ज्यांची निवडून येण्याची कधीही स्थिती नाही, मागे नव्हती आणि आताही नाही. ज्यांचे 18 जागांसाठी फक्त 3 अर्ज आले होते. आणि ते अर्ज सुध्दा स्थानिक लोकांनी प्रयत्न केल्यानंतर मागे घेण्यात आले. ते उमेदवार सुध्दा आपल्याला कधी भेटले नाहीत. याठिकाणी श्री. माळी नावाच्या उमेदवाराचा संदर्भ देण्यात आला. त्यांना आपण बोलावून घ्यावे आणि विचारावे. ते जर मला भेटले असतील तर आपण दोघेही सांगाल ती शिक्षा भोगावयास मी तयार आहे. ही माणसे मला कधी भेटली नाहीत, ती आपल्या पक्षाची असली तरी ती मला भेटली नाहीत. त्यामुळे दमदाटी करण्याचा प्रश्न येत नाही. माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे जर मी दमदाटी करण्याचे ठरविले तर या वयामध्ये माझ्या स्वभावामध्ये बदल होणे शक्य नाही, आणि मी ते करु शकत नाही व कधी केलेही नाही. स्थानिक उमेदवारांनी एकमेकांच्या विचाराने आपापली उमेदवारी मागे घेतली, आपले अर्ज मागे घेतले. याचे त्यांना मोठया प्रमाणात दुःख होत होते. त्या तालुक्यामध्ये दिग्गज नेतेमंडळी असतांना शेवटच्या वेळेपर्यंत त्यांच्या पक्षाचा एकही उमेदवार शिल्लक राहिला नाही. त्यामुळे भाजप शिवसेनेपेक्षा त्यांचे म्हणजे माननीय श्री. पतंगराव कदम साहेबांचे दुःख वेगळे आणि मोठे होते. किमान या तालुक्यामध्ये एक तरी उमेदवार त्यांना मिळावयास पाहिजे होता. त्यांचा संपूर्ण पक्ष आमच्या पक्षामध्ये विलीन झाल्यामुळे आणि बिनविरोध निवड झाल्यामुळे नैराश्येपोटी आम्हाला बदनाम करण्याचे कुभांड रचले गेले. दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर सर्व उमेदवारांचे व्हिडिओ शूटींग करण्यात आले. त्यावेळी तालुक्याच्या ऐक्यासाठी आणि तालुक्याच्या विकासाला चालना मिळण्यासाठी आम्ही आमचे अर्ज पाठीमागे घेत आहोत अशाप्रकारे 180 उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांसमोर हसत निवेदन केल्याचे व्हिडिओ कॅसेटमध्ये बंदिस्त आहे. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तासगावमधील निवडणूक बिनविरोध झाल्याचे घोषित केले. माझ्या तालुक्यामधील सर्व जनतेला ही सर्व माहिती आहे. आपले एक शिष्टमंडळ माझ्या तालुक्याला पाठवा. आणि त्याठिकाणी चौकशी करुन तशाप्रकारचा अहवाल सभागृहाला सादर करा. त्यामध्ये आपण म्हणाल ती शिक्षा स्वीकारण्याची माझी तयारी आहे. आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

म्हणत असाल की, या प्रकरणी सी.बी.आय. मार्फत चौकशी कां करीत नाही? तर त्या चौकशीला सुध्दा माझी तयारी आहे. इतकेच नव्हेतर हे करण्यात आलेले आरोप जर सिध्द झाले असते तर मी सार्वजनिक जीवनामध्ये राहणे पसंत केले नसते. या राज्यामध्ये कोणत्याही गृहमंत्र्यांनी आरोपांचे ओझे खांद्यावर घेऊन राज्य चालविणे योग्य ठरले नसते. श्री. जंगम यांच्याशी याबाबतीत मी भेटलो नाही व चर्चा झाली नाही. केवळ पोलिसांसमोर नव्हेतर न्यायाधिशांसमोर देखील त्यांनी आपले म्हणणे मांडले असल्यामुळे ही सर्व परिस्थिती आपणासमोर ठेवली आहे. सांगली जिल्हयामध्ये माननीय श्री. पतंगराव कदम साहेबांची तक्रार सोडल्यास तालुक्यामध्ये कोणाचीही तक्रार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे मित्र माननीय गृहमंत्री यांनी थोडसे आमचेही म्हणणे ऐकून घ्यावे. हे करीत असतांना आपण घाई करु नये. आपण काय केले यासंबंधी शांतपणे याठिकाणी खुलासा करावा. कुठल्याही उमेदवारांनी आमच्यासमोर प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले नाही. आपण याठिक्‌ाणी माननीय न्यायाधिशांचा संदर्भ देत आहात, परंतु आपण निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल साहेबांना जाऊन भेटला. माननीय श्री. नंदलाल हे या राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत. त्यांच्यासमोर आपण स्वत:च्या तोंडून माहिती दिलेली आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी कधी आणि केव्हा कुणाला भेटलो हे याठिकाणी स्पष्ट केले आहे. श्री. प्रकाश जावडेकर आणि श्रीमती नीता केळकर यांच्या समवेत उपस्थित असलेले श्री. जंगम यांना व्हिडिओ कॅसेटमध्ये बधितले आहे. ज्या गाडीमध्ये त्यांना बसविण्यात आले होते त्या गाडीमध्ये भाजपचे दोन नेते होते. त्या दोन नेत्यांच्या मध्ये श्री. जंगम यांना बसविण्यात आले होते. त्यांना जरा देखील त्या गाडीमधून खाली सोडण्यात आले नाही. याचे संपूर्ण व्हिडिओ शूटींग करण्यात आले असून ही सर्व माहिती पोलिसांकडे आहे. हा संपूर्ण अहवाल आपण पाहिल्यानंतर आपण आपले मत बनवा. हा जंगम इतका सत्यवचनी असेल आणि माझ्या बाबतीत जे बोलला ते जर खरे असेल तर श्री. प्रकाश जावडेकर यांच्या बाबतीत तो जे बोलला ते खोटे कसे असेल?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु..

श्री.प्रकाश जावडेकर हे खोटे कसे बोलतील असा आपला मुद्दा आहे. निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांच्यासमोर तक्रार केल्यानंतर व्हीडीओ चित्रिकरणामध्ये अर्ज स्वखुषीने परत घेतो असे सांगितले, कोर्टामध्ये जाऊनही ते सांगतात. आयुक्त नंदलाल यांच्यासमोर त्यांनी खरे सांगितल्यानंतर त्यांनी कोर्टासमोर खरे का सांगितले नाही ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांना चर्चेला उत्तर देण्यासाठी भरपूर वेळ मिळतो आणि तसा ते वेळ घेतातही. सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांबद्दल, त्यांच्या एकूणच कायदा व सुव्यवस्थेच्या विषयायाच्या संदर्भात जी मते मांडली जात आहेत, त्या संदभातील एकेका मुद्यांच्या संदर्भात ते स्पष्टीकरण देत आहेत, अशाने त्यांना दोन तासाचा वेळही पुरणार नाही. एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात एका मिनिटामध्ये स्पष्टीकरण होऊ शकते. परंतु या संबंधात मंत्री महोदयांचे भाषणच सुरु झाले तर ही चर्चा खूप वेळ चालेल आणि सन्माननीय सदस्यांचे मुद्देच निघून जातील. सन्माननीय सदस्यांना त्यांच्या भाषणामध्ये काही आरोप करावयाचे असतील तर त्यांना करू द्यावेत, त्यानंतर त्यांनी त्या संदर्भात उत्तर द्यावे. त्याचा फैसला काय व्हायचा तो होईल. प्रश्नोत्तराच्या तासाच्या माध्यमातून चर्चा करण्याची पध्दती कोठेही नाही. सन्माननीय मंत्री महोदयांना आणि सभापती महोदय आपल्यालाही विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना त्यांचे भाषण पूर्ण करू द्यावे, त्यानंतर मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे असेल तर ते त्यांनी द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्य योग्य बोलले. मी सदनाचा नेता आहे. तेव्हा माझ्याबद्दल काही काळसुध्दा गैरसमज होऊ नये म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब आणि मी माननीय सभापती महोदयांची परवानगी घेऊनच बोललो आहे.

श्री.नितीन गडकरी : खरे म्हणजे आपण इतके पटकन उत्तरे का देत आहात,हे कळत नाही. श्री.प्रकाश जावडेकर आणि नीता केळकर यांच्याबाबतीत आरोप केला. श्री.प्रकश जावडेकर हे या सदनाचे सदस्य होत त्यामुळे मी .त्यांना चांगला ओळखतो.

श्री.आर.आर.पाटील : त्यांना ओळखता परंतु मला आपण ओळखत नाही असे म्हणावयाचे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आपल्यालाही मी ओळखतो. आपण श्री.संजय पाटील यांचे नेते आहात. सन्माननीय श्री.अजितदादा पवार पुण्यामध्ये काय करतात] हे आपल्याला माहीत नाही, सन्माननीय श्री.गुरुनाथ कुलकर्णी काय करतात ? याची आपल्याला माहिती नाही.

श्री.भास्कर जाधव : जे सन्माननीय सदस्य सभागृहात हजर नाहीत त्यांच्याबद्दल आरोप करु नये, असे संकेत आहेत.

श्री.नितीन गडकरी : ते उद्या सभागृहात येऊन खुलासा करतील. आपण इम्पोर्टेड माल आहात, आपण कशाला खुलासा करता ? मी ज्यांची नावे घेतली त्यांच्यावर मी आरोप करत नाही. श्री.प्रकाश जावडेकरांना मी अनेक वर्षे ओळखतो. माझ्यावर आरोप केला तर समजू शकतो, मी विद्यार्थी नेता म्हणून काम करीत असतांना मारपीट केलेली आहे. परंतु श्री.प्रकाश जावडेकर हे अतिशय वेगळ्या प्रकारचे आहेत. त्यांच्याकडून दबाव, प्रेशर आणण्याचा प्रयत्न होण्याचा प्रश्न नाही. प्रकाश जावडेकर, नीता केळकर ही अशाप्रकारे बोलणारी मंडळी नाहीत. या राज्याच्या निवडणूक आयुक्तांनी स्वत: त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर श्री.मीना नावाच्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी चौकशीसाठी पाठविले. व्हीडिओ चित्रण पाहिल्यानंतर आणि एका मिनिटामध्ये 119 अर्ज परत घेतले. या संदर्भाने निवडणूक आयुक्तांनी जज्जमेंट दिलेले आहे,त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हीडीओ चित्रीकरण उपलब्ध आहे.....

यानंतर श्री.बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

व्हिडिओ चित्रीकरणावरुन असे दिसून येते की, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या शिपायाने दिनांक 2 मार्च, 2007 रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी एक मिनिट शिल्लक असल्याची घोषणा केली. त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कक्षात बऱ्याच व्यक्ती हजर होत्या. दुपारी 3.00 वाजता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचे बाहेरचे दार बंद करण्यात आले. हे बाहेरचे दार यासाठी बंद करण्यात आले होते की, बाहेरील व्यक्तीने कार्यालयात प्रवेश करु नये. परंतु कार्यालयाचे मागील दार उघडेच होते व त्यामधून व्यक्तींचे जाणे येणे सुरुच होते."

श्री. आर. आर. पाटील : आपण आमदारांची कमिटी नेमावी आणि तेथील मागील दार बघून घ्यावे.

श्री. नितीन गडकरी : निवडणूक आयोगाने पुढे असे म्हटले आहे की, ....(अडथळा).. माझा गिल्बर्ट मेंडोसा होईल.....

**उपसभापती** : आपण श्री. गिल्बर्ट मेंडोसा यांचा उल्लेख केला. ते भारतीय जनता पक्षामधून आलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : आमचा रिजेक्टेड माल तुम्ही का घेता ? मिरा-भाईंदर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री. गिल्बर्ट मेंडोसा यांच्यावर कलम 302, 307 चे गुन्हे आहेत. त्यांना तीन वेळा तडीपारीची शिक्षा झाली आणि तीन वेळा त्यांची तडीपारीची शिक्षा रद्द केली. गुन्हेगारांना संरक्षण देऊ नका, त्यांना मते देऊ नका असे आव्हान करणारे या राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांचे आदेश आहेत....

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा हा आक्षेप रेकॉर्डमधून काढला पाहिजे. मी माझी तत्वे कधीही सोडलेली नाहीत.

**उपसभापती** : यामध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांचा संबंध नाही.

श्री. नितीन गडकरी : तडीपारी कशी रद्द झाली ?

**उपसभापती** : ठाणे जिल्ह्याचा हा विषय असल्यामुळे मला बोलले पाहिजे. हे जे गुन्हे त्यांच्याकडून घडले ते आपल्याकडे असतानाच्या काळात घडले होते. श्री. गडकरी साहेब, आपण प्रत्येक गोष्टीत घाई करता. तडीपारीच्या संदर्भात हायकोर्टामध्ये त्यांच्या विरोधातील एक अर्ज

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

**उपसभापती** .....

प्रलंबित होता त्यासंबंधी नुकताच हायकोर्टाने निकाल दिलेला आहे. त्यांना तडीपार करण्याची कोणत्याही प्रकारची आवश्यकता नाही म्हणून त्यावेळचे आदेश हायकोर्टाने रद्दबातल केलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सुसंस्कृत व्यक्ती श्री. मेंडोसा असा मी उल्लेख करतो...

**उपसभापती** : आपल्याला या विषयावर बोलावयाचे असेल तर त्याकरिता वेगळी सूचना द्यावी. आपण या प्रस्तावावर बोलावे.

श्री. नितीन गडकरी : मी राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलत आहे. राज्याचे गृहमंत्री म्हणून आपल्या काळामध्ये हे जे सुसंस्कृत, सज्जन, प्रामाणिक आणि प्रतिष्ठित व्यक्ती आहेत त्यांना चुकीने, गैरसमजुतीने श्री. आर. आर. पाटील यांच्या पोलिसांनी तीन वेळा तडीपार केले, त्यांची तडीपारी या सरकारने रद्द केली.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. ही तडीपारी रद्द करण्याचे आदेश मी दिलेले नाहीत.

श्री. नितीन गडकरी : तुमच्या खात्याने आदेश दिले काय ?

श्री. आर. आर. पाटील : ती माहिती माझ्याकडे नाही.

श्री. नितीन गडकरी : मी जबाबदारीने बोलतो. तीनवेळा महाराष्ट्र शासनाने तडीपारी रद्द केली.

श्री. आर. आर. पाटील : मीही जबाबदारीने बोलत आहे. अशा प्रकारची कोणतीही सूचना किंवा कोणतेही आदेश माझ्याकडून कधीही झालेले नाहीत.

श्री. नितीन गडकरी : कदाचित लेखी आदेश नसतील पण तोंडी आदेश असतील.

श्री. आर. आर. पाटील : तोंडी आदेशही दिलेले नाहीत.

**उपसभापती** : हा जास्त वादाचा विषय होऊ नये. पुण्यातील आपल्या पक्षाच्या नगरसेवकांची जी यादी आहे ती आपण एकदा वाचावी. त्यावर उद्या आपण दोघे बोलू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी काही पब्लिकली भाषण केले नाही. मी काही पोपटपंची करणारा नाही. राजकारणामध्ये कास्ट, कॅश आणि क्रिमिनल असे महत्वाचे तीन "सी" असतात. यांनी राजकारणामध्ये दबाव आणलेला आहे. कॉंग्रेस पक्षाची परिस्थिती अशी आहे की,

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

त्या ठिकाणी कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. जी श्रीमंतांची मुले आहेत त्यांना वर्ल्ड बँकेची चिंता नाही. राष्ट्रवादीच्या झेंड्याखाली महाराष्ट्रात काय चालले आहे हे कळत नाही. मी एकाला गमतीने विचारले की, राष्ट्रवादीचा खोट्या नोटा छापण्याचा कारखाना आहे काय ? या राज्यात इरिगेशनचे एकही टेंडर होत नाही. सन्माननीय श्री. आर. आर. पाटील यांच्याबाबत मी सांभाळून सांभाळून बोलत आहे. ते माझे मित्र आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:10

(श्री. नितीन गडकरी...)

उपसभापती महोदय, मी आपणास विनंती करतो की, आपण या मेण्डोन्सा प्रकरणामध्ये पडू नका. आपण सभापतीस्थानी बसला आहात. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाहीत तर आपण या संपूर्ण सार्वभौम सभागृहाचे उपसभापती आहात. मेण्डोन्सा प्रकरणामध्ये आपण फार इण्टरेस्ट घेऊ नका.

**उपसभापती** : आपण पुणे महानगरपालिकेच्या नगरसेवकांची लिस्ट पहावी असे मी आपणास सांगितलेले आहे...(अडथळा)...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : खासदारांनी प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतलेले आहेत. त्या खासदारांची खासदारकी रद्द झालेली आहे.... आता आमदार आणि खासदारांच्या निवडणुका होणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : .....भीमराव गायकवाड या शिवसेनेच्या नगरसेवकाच्या खिशामध्ये 18 लाख रुपये कोंबले. ही घटना एका राज्याच्या प्रतिष्ठीत मंत्र्याच्या घरात घडली.त्याने ते पैसे फेकून सांगितले की, मी हिंदुत्वाशी बेईमानी करणार नाही...... राजकारणाच्या गोष्टी कशाला करता....

**उपसभापती** : ही चर्चा वेगळया दिशेने चालली आहे..

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे प्रस्तावावर बोलत आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेच्या पलिकडे ते गेलेले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मध्येच उठून उभे राहून आमदार आणि खासदारांच्या निवडणुका आहेत असे सांगितले. ज्यांनी पैसे खाल्ले असतील त्यांचा पंचनामा लोक करतील. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे झालेल्या गोष्टींचा पंचनामा येथे मांडत आहेत. या ठिकाणी राज्यातील गुंडागर्दीवर चर्चा चालू आहे. सन्माननीय गृहमंत्री हे श्री. आर.आर.पाटील असल्यामुळेच त्यांचे म्हणणे आम्ही टॉलरेट केलेले आहे. दुसरे कोणी मंत्री असते तर त्यांचे म्हणणे आम्ही टॉलरेट केले नसते.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नियम 260 अन्वये राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर याठिकाणी चर्चा चालू आहे. ही चर्चा सुरळीत सुरु होती. या चर्चेच्या दरम्यान माननीय गृहमंत्र्यांवर काही आरोप आणि आक्षेप करण्यात आले. गिल्बर्ट मेण्डोन्सा असो की आणखी कोणी असो.... हे सर्व कार्यकर्ते असतात. ज्यांचे कन्व्हिक्शन झालेले आहे आणि ज्यांना कन्व्हिक्ट केलेले आहे त्यांच्या बाबतीत बोलले गेले तर ते ठीक आहे.

..2..

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

परंतु आपण राजकीय जीवनामध्ये काम करणारे कार्यकर्ते आहोत. निरनिराळया आंदोलनाच्या वेळी कार्यकर्त्यांवर केसेस दाखल केल्या जातात. अशा केसेसमुळे कार्यकर्त्याला प्रतिष्ठासुध्दा मिळते.ज्याच्यावर गुन्हा दाखल झालेला नाही असा शिवसेनेचा एक तरी कार्यकर्ता आहे काय ? अशा काही गुन्ह्यांचे याठिकाणी अक्राळविक्राळ स्वरुप मांडून ते कार्यकर्ते क्रिमिनल आहेत अशी भूमिका मांडणे इष्ट नाही हे तुम्हाला आणि या सदनातील सदस्यांना देखील पटते आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंबंधी मला बोलायचे आहे. राजकीय जीवनामध्ये काम करणा-या कार्यकत्या्रंवर केसेस असतात अशा प्रकारची भूमिका त्यांनी मांडली. परंतु आपणाला एकाच यादीमधे 302 कलमाचे गुन्हे असणारे गुन्हेगार मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येईल. 302 कलमाची केस असलेले गुन्हेगार निवडून येणे ही गंभीर बाब आहे. निवडणूक आयोगाने अशा लोकांना निवडणूक लढविण्यास परवानगी देऊ नये अशी आमच्या पक्षाची भूमिका आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

आणि याच दृष्टीकोनातून मला एकच सांगावयाचे आहे की, चर्चेचे स्वरुप बदलू नये. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना विनंती आहे की, त्यांनी चर्चा ऐकून घ्यावी आणि नंतर उत्तर द्यावे. सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना डिस्टर्ब करुन वेगळी चर्चा घडवून आणायची, त्यामुळे चर्चेतून वेगळी चर्चा असा प्रकार सुरु होतो. "Your guilty consciousness speaks itself". त्यामुळे प्रत्येक वेळी उठून तुम्ही तुमच्या विरोधात बंड करुन उठलात असा अर्थ होतो. कृपा करुन सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे भाषण पूर्ण होऊ द्यावे आणि मग उत्तराच्या भाषण खुलासा करावा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या संदर्भात मी जे काही बोललो त्याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला. मघाशी मी सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम काय म्हणाले ते वाचून दाखविले. ते पुन्हा वाचून दाखविण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेस ही गुंडांची पार्टी आहे असे मी पिंपरी-चिंचवड येथे माननीय मुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट वाचले. दुसऱ्या दिवशी मी पिंपरी-चिंचवड येथे होतो.....(अडथळा)...सभापती महोदय, मला एकच विनंती करावयाची आहे की, श्री.प्रकाश जावडेकर, सौ.नीता केळकर, श्री.नितीन गडकरी, श्री.आर.आर.पाटील काय म्हणाले याला वैधानिक आधार नाही. राज्याच्या निवडणूक आयोगाकडे जाऊन ज्या व्यक्तीने तक्रार केली, त्या तक्रारीवरुन श्री.मीना नावाच्या अधिकाऱ्यांच्या समितीने चौकशी केली. 119 अर्ज एकाच वेळी विथड्रॉ झाले ही वस्तुस्थिती आहे. त्या आधारे निवडणूक आयोगाने डायरेक्शन्स दिल्या आणि गृहमंत्र्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला. तेथील प्रांत श्री.कुळकर्णी आणि इतर दोघांना त्यांनी निलंबीत केले. निवडणूक आयोगाने तुमच्या ऑर्ग्युमेंटचा निकाल लावला. तुमच्या म्हणण्याला काही अर्थ नाही. कोर्टात जा नाही तर हायकोर्टात जा. सरकार म्हणून निलंबन मागे घेऊ शकत नाही. महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त म्हणजे quasi-judicial authority आहे. निवडणुकीच्या काळात त्यांनी दिलेला निर्णय हा सरकारवर बंधनकारक आहे. जो निर्णय दिला त्याविरुध्द हायकोर्टात अपील करता येते. एका न्यायालयात तुमचा निकाल लागला. तुम्ही काय केले याबाबत निवडणूक आयोगाने निर्णय लावला. निवडणुका झाल्या, सगळे झाले. माझी एकच विनंती आहे, कशाला अट्टाहास बिनविरोध निवडणुकांसाठी? सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांची ताकद तुम्ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी............

सांगितली. त्यांचा एकही माणूस निवडून येऊ शकत नाही असे सांगितले. यांची पार्टी शिल्लक नाही असे तुम्ही मघाशी सांगितले.......(अडथळा).....काँग्रेस पार्टी शिल्लक राहिली नाही......(अडथळा).... सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम तुमचा मुलगा उपोषणाला का बसला? सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम त्या मुलाला मी भेटलो. इतका बॅलन्स, संयमी, कर्तृत्ववान मुलगा आहे. मी एवढेच म्हटले, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम मुलगा आम्हाला द्या. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे मुख्यमंत्री पदाचे दावेदार आहेत. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचा मुलगा उपोषणाला का बसला? सभापती महोदय, कालाय तस्मै नमः!

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. भास्करराव जाधव )**

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, शशिकांत शितोळेंचे हात तोडल्यामुळे महाराष्ट्रात कोणती लोकशाही आहे हे महाराष्ट्रातील जनतेला आता कळून चुकलेले आहे. ज्यावेळेस माननीय अरुणभाई गुजराथी निवडणुकीत निवडून आले नाहीत त्यावेळेस त्यांनी असेच केले होते का ? माननीय अरुणभाई गुजराथी हे सज्जन गृहस्थ आहेत, साने गुरुजींचे शिष्य आहेत. सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या राजकारणातील एक सौजन्यमूर्ती होऊन गेलेले आहेत. अशा या सौजन्य मूर्तीचे शिष्य माननीय शरद पवार साहेब आहेत. ज्यावेळेस माननीय छगन भुजबळसाहेब शिवसेनेत होते त्यावेळेस त्यांनी सभागृहात भूखंडाचे श्रीखंड या प्रश्नाच्या संदर्भात एक बॅनर तयार करुन विधानसभेत आणले होते, त्यावेळेस माननीय पद्मसिंह पाटील यांनी त्यांना गुद्दे मारले होते. हा प्रकार होत असतांना त्यावेळेस सुध्दा माननीय पवार साहेब माननीय पद्मसिंह पाटलांना म्हणाले होते की, असे करु नका, तुम्ही बाजूला व्हा, असे करणे बरोबर नाही. मला वाटते त्यावेळेस माननीय पतगंराव कदम साहेब सुध्दा सभागृहाचे सदस्य होते. त्यामुळे मी जे काही सांगतो आहे ते त्यांना पटत असावे. माननीय शरद पवार साहेबांचे जे गुण आहेत, विचार आहेत त्या संदर्भात आपल्याला बरेच काही शिकता येण्यासारखे आहे. माननीय शरद पवार साहेबांकडून अनेक गुण शिकण्यासारखे आहेत. त्यामुळे त्यांचे गुण शिकण्याचा मी नेहमी प्रयत्न करीत असतो. माननीय शरद पवार साहेबांच्या गुणामुळेच आम्ही त्यांचे कौतुक करीत असतो. त्यामुळे सध्या जो काही प्रकार चालू आहे त्यामुळे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस साफ झाल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, मी आणीबाणीच्या काळातील कार्यकर्ता आहे. मी हाडामासाचा कार्यकर्ता आहे. मला सत्तेचा कुठल्याही प्रकारचा मोह नाही. सत्तेसाठी मी कॉग्रेंस आणि राष्ट्रवादीमध्ये कधीही जाणार नाही. आम्ही आमच्या कामावर निवडून येत असतो. आम्ही जातीयवादी आहोत, ब्राम्हणवादी आहोत असे आमच्यावर आरोप होत असतात. माननीय अटलबिहारी वाजपेयी हे भारताचे पंतप्रधान होते त्यावेळेस सुध्दा त्यांच्यावर अशाच प्रकारचे आरोप झाले होते. आपण आम्हाला जातीयवादी, ब्राहम्णवादी म्हणत असला तरी आम्ही कॉंग्रेस पक्षाच्या तुलनेने खूपच चांगले आहोत. आम्ही आपल्या हातातून राज्येच्याराज्ये जिंकून घेत आहोत. त्यामुळे आता तरी आम्हाला जातीयवादी आणि ब्राहम्णवादी म्हणू नये.

.....2

श्री. नितीन गडकरी पुढे सुरु ....

सभापती महोदय, आम्ही चांगल्याला चांगले म्हणत असतो. माननीय पतंगराव कदम साहेबांचे विद्यापीठ चांगले आहे, परंतु त्यांचे राजकारण चांगले आहे की, नाही हे माहिती नाही. जे चांगले आहे ते चांगलेच राहते. परंतु ज्या जिल्हयातून माननीय शरद पवार साहेब केंद्रात मंत्री म्हणून गेलेले आहे त्याच जिल्हयात, आमच्या उमेदवाराचे दोन हात तोडले जातात त्याला काय म्हणावे? माननीय शरद पवार साहेबांच्या जिल्हयाची हीच सहिष्णूता आहे का ? सभापती महोदय, दोन-चार निवडणूका जिंकल्या काय आणि हरल्या काय, त्यामुळे काहीही फरक पडत नाही. माननीय अरुणभाई गुजराथी विधानसभेचे अध्यक्ष असतांनाही निवडून आले नाहीत म्हणून त्यांनी या सारखा प्रकार केला नव्हता. ते निवडून आले नसले तरी त्यांनी संयम पाळला होता. माननीय अरुणभाई गुजराथी हे मॅच्यूअर्ड आहेत. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास "हाथी गए बाजार, कुत्ते भौंके हजार". असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

सभापती महोदय, आम्ही केलेल्या कामावरुन निवडून येत असतो. आमच्याकडे जात पात पाळली जात नाही. आम्ही अल्पसंख्याक असलो तरी निवडून येतो. आम्ही जर जात-पात पाळली असती तर आम्ही निवडून आलोच नसतो. आम्हाला तेली, माळी, कुणबी निवडून देत असतात. परंतु तुमच्या काळात तुम्ही पुण्यामध्ये शशिकांत शितोळेचे दोन्ही हात तोडलेले आहेत. शशिकांत शितोळे यांना राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही नेता भेटावयास गेला नाही. त्यामुळे आपण जे म्हणता ती कोणती सहिष्णूता आहे? कोणती लोकशाही आहे? यासंदर्भात जो काही प्रकार घडलेला आहे तो निंदनीय आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

राजकारण हे विचारांचे झाले पाहिजे. पराभूत उमेदवाराचे हात तोडणे हा अतिशय निंदनीय प्रकार आहे. श्री.शशिकांत शितोळे यास मी भेटलो, त्याला पाहून मला अतिशय दु:ख झाले. माझ्या डोळ्यात अश्रू आले. सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड येथील पोलीस अधिकारी लोकांच्या तक्रारींची दखल घेत नाहीत. त्या भागातील बहुसंख्य समाज हा मराठा असल्याने कदाचित आपले नातेवाईक देखील त्याठिकाणी असतील, ते आपणास कल्पना देतील. आपण एकमेकांचे विरोधक असलो तरी आपली लढाई विचारांची आहे.आपल्या विचारांत मतभिन्नता असू शकते. तेव्हा विचारांचे राजकारण झाले पाहिजे. श्री.शशिकांत शितोळे यांचे आईवडील मला भेटले ते अतिशय घाबरलेले होते. ते रडत होते. त्यांनी मला सांगितले की, अशा वातारणात आम्ही रस्त्यांवरुन कसे फिरायचे ? ही कोणती लोकशाही आहे ? सभापती महोदय, श्री.शशिकांत शितोळेला भेटायला मी हॉस्पीटलमध्ये गेलो होतो. त्यावेळी त्यांनी मला स्वत: श्री.प्रशांत शितोळे, श्री.शशिकांत ढमाले, श्री.कृष्णराव ढमाले,श्री.कृष्णराव शितोळे यांची नावे सांगितली. श्री.आर.आर.पाटील तुमच्या दिव्याखाली अंधार असेल. शितोळे बंधू राष्ट्रवादीचे नेते असल्यामुळे पोलिसांनी एफ.आर.आय.नोंदवून घेतला नाही. गुन्हेगारांना कोणताही धर्म नसतो, कोणतीही जात नसते, तो मुसलमान अथवा हिंदू नसतो. अफझलला फाशी देऊ नका, त्यांच्या मतांचे आपण राजकारण करा. सभापती महोदय, श्री.शशिकांत शितोळे यांच्यावर 23 वार झाले. परंतु पंचनाम्यात फक्त 3 ते 4 वार झाले असे नमूद करण्यात आले. श्री. प्रशांत शितोळे यांच्या लॉनवर नेऊन तेथे श्री.शशिकांत शितोळे याचे हात तोडण्यात आले. परंतु रस्त्यावर बाचाबाची झाली अशी एफ.आय.आर.मध्ये नोंद करण्यात आली. तेथील पोलीस अधिकारी सर्वश्री.गोविंद पवार, दीपक हुंबरे यांचेकडे खास जबाबदारी देऊन त्यांना ही केस सबोटेज करण्यास सांगितले. कुणीही सत्तेचे अमरत्व घेऊन आलेले नाहीत. आज आम्ही जात्यात आहोत, तर तुम्ही सुपात आहात. उद्या तुम्ही जात्यात असाल तर आम्ही सुपात असू Any thing can happen in cricket and politics. लढाई ही विचारांची असली पाहिजे, ती माणुसकीला काळिमा फासणारी नको. आज पोलिसांचे जे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

व्यवहार सुरु आहेत ते अतिशय दु:खदायक आहेत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना माझ ी हात जोडून विनंती आहे की, आपण तेथील पोलीस अधिकाऱ्यांची बदली करा. पुण्याच्या पोलीस आयुक्तांना आम्ही तशी विनंती केलेली आहे.

सभापती महोदय, श्री.अंकुश लांडगे यांनी मौजा भोसरी येथील सर्व्हे क्रमांक 1 या जागेवर आरक्षणाची मागणी केली होती. ती मागणी लांडगे यांनी करु नये म्हणून त्यांची हत्या करण्यात आली होती...........

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, मला कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला जायचे आहे. तत्पूर्वी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी त्यांच्या भाषणात माझा व माझ्या मुलाचा उल्लेख केला त्या संदर्भात मला वैयक्तिक स्पष्टीकरण करायचे आहे. मला पोलीस प्रोटेक्शन आहे असे वक्तव्य याठिकाणी करण्यात आले. माझ्या आणि माझ्या मुलाच्या बाबतीत अशी घटना घडली की, माझ्या मतदारसंघात कडेगाव येथे पंचायत समितीच्या निवडणुकीत कॉंग्रेसच्या 50 कार्यकर्त्यांची घरे फोडण्यात आली. महिलांना व लहान मुलांना मारहाण करण्यात आली. त्या संदर्भात मी तेथील एस.पी.ना फोन केला व मी घटनास्थळी जाणार असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी मला पोलीस प्रोटेक्शन दिले. हा हल्ला राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला होता. दुसऱ्या दिवशी माझा मुलगा उपोषणास बसला. अशाप्रकारची घटना यापूर्वी कधी घडली नव्हती. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या सुसंस्कृत नेत्याचे गाव माझ्या गावापासून चार कि.मी.च्या अंतरावर आहे. तेथे अशी घटना घडली ही निश्चित दु:खदायक बाब आहे. त्याठिकाणी महिलांना व लहान मुलांना मारहाण करण्यात आली ही अतिशय दुर्देवी घटना आहे.

यानंतर श्री.रोझेकर.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मंत्रीमहोदय आपण ज्येष्ठ मंत्री आहात. आपल्या खुलाश्याचा येथे काय संबंध आला ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खुलासा करण्यापासून आपण मंत्रीमहोदयांना थांबवू शकणार नाही. कृपया, त्यांना आपला खुलासा करु द्यावा.

**तालिका सभापती** : खुलासा करण्यापासून थांबवू शकणार नाही, असे आपण मला म्हणू शकणार नाही. सन्माननीय मंत्रीमहोदयांना खुलासा करु द्यावा किंवा नाही, याचा निर्णय मी घेईन.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मला पोलीस प्रोटेक्शनमध्ये जिल्हयात फिरावे लागलेले नाही. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत व पंचायत समितीच्या निवडणुकीत माझ्या पक्षाचे कार्यकर्ते माझ्या जिल्हयात निवडून आलेले आहेत, त्यामुळे मला प्रोटेक्शनची गरज नाही. त्या ठिकाणी जी घटना घडली तेथे भेट देण्यासाठी मी पोलीस अधीक्षकांना बरोबर घेऊन गेलो होतो, कृपया गैरसमज नसावा, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री, डॉ.पतंगराव कदम 9 मार्च रोजी बोलले. ते असे बोलले की, "राज्याच्या गृहमंत्र्यांवर पोलिसांना गुन्हे दाखल करावे लागणे, ही लाजिरवाणी घटना आहे............"

डॉ.पतंगराव कदम : उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील हे राजकारणात जरी मोठे असले तरी माझ्या छोटया भावासारखे आहेत, मला जेंव्हा गुन्हा दाखल झाल्याचे कळले त्यावेळी मला दु:ख झाले. महाराष्ट्रातील थोर नेते, वसंतदादा पाटील, वि.स.पागे, यशवंतराव चव्हाण यांचा हा जिल्हा आहे, त्यामुळे मला दु:ख झाले.

श्री.नितीन गडकरी : "असंगाशी संग केल्यामुळे आमचा छोटा भाऊ भरकटत गेला आहे, अजूनही त्याने शिकावे की, आपण कुणाची संगत करतो आहोत" असे माननीय डॉ.पतंगराव कदम म्हणाले. मला एवढेच सांगावयाचे आहे की, तुमच्या मागदर्शनाचा त्यांना उपयोग व्हावा. या सभागृहात सन्माननीय मंत्री महोदयांना खुलासा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांची अशी स्थिती झाली आहे की, "सहनही करता येत नाही आणि सांगताही येत नाही."

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी................

सभापती महोदय, अंकुश लांडगे यांने भोसरी येथील सर्व्हे क्रमांक 1 वर आरक्षणाची मागणी केली होती. त्याला मारण्यात आले, त्याच्या डोक्यावर घाव घालण्यात आले, त्याला दगडाने ठेचले गेले. ही माननीय शरद पवारांची राष्ट्रवादी आहे काय ? ही माननीय यशवंतराव चव्हाणांची काँग्रेस आहे काय ? ही तर पप्पु कलानी, मेंडोसा यांची काँग्रेस आहे, कशाला ही घाण तुम्ही अंगावर घेता आहात ? या प्रकरणातील एक बिल्डर, राष्ट्रवादीचा कार्यकर्ता याची साधी चौकशीही गृह विभागाने केली नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, अंकुश लांडगे प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत उच्चस्तरीय चौकशी करुन गुन्हेगारांना शासन करणार काय ? शशिकांत शितोळे याचे हात तोडले, त्याबाबत सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय ? उपमुख्यमंत्रीमहोदय आपल्यामध्ये ही ताकद आहे काय ? अशी ताकद असेल तर आम्ही तुम्हाला स्वीकारु. हे कार्यकर्ते काँग्रेसचे असोत किंवा राष्ट्रवादीचे पण ज्यांनी हे कृत्य केले त्यांना सजा देण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे काय ? त्यांच्यावर एफ.आय.आर.नोंदविणार आहात काय ? बोलण्याप्रमाणे जर व्यवहार झाला तर आर.आर.पाटीलसाहेब लोक आपल्याला मानतील. पक्षाचे नेते तुमचे ऐकत नसतील तर तुम्ही किती गप्प राहणार ? तुमची अडचण मला माहित आहे. पण तुमचा विभाग कारवाई करणार आहे की नाही ? आम्ही महाराष्ट्रात कुणाकडे जायचे ? एवढेच सांगतो की, निवडणुकीमध्ये हारजित होत असते. श्री.आर.आर.पाटील हे आमचे मित्र आहेत, आपल्या विचारांमध्ये मतभिन्नता आहे, तुम्ही तुमच्या पक्षाचे विचार मांडता, मी माझ्या पक्षाचे विचार मांडतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोरले...........

GRB/ KTG/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 15:35

श्री.नितीन गडकरी .........

माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. मी पिंपरी-चिंचवडचे पुढारी वृत्तपत्र बघितले. त्या वृत्तपत्रामध्ये अशी बातमी छापून आली होती की, राष्ट्रवादी काँग्रेस ही गुंडांची पार्टी आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख असे बोलले हे मला त्यावेळी पटले नाही. परंतु आता मला असे वाटते की, ते खरे आहे. मुख्यमंत्री पद त्यांना हवे असले तरी सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही अशी त्यांची अवस्था झालेली आहे. जळगांवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तलवारी काढल्या, घरांवर हल्ले केले. परंतु माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यासंदर्भात बोलणे शक्य नाही. माननीय गृहमंत्र्यांनी या घटना थांबविल्या पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये ज्या घटना घडल्या त्या घटना माननीय श्री.आर.आर.पाटील गृहमंत्री असतांना घडलेल्या आहेत. कै.लाल बहादूर शास्त्री गृहमंत्री असतांना रेल्वेला अपघात झ ाला होता त्यावेळी त्यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. तुमच्या काळामध्ये असे घडणार असेल तर मी काय करु असे म्हणून चालणार नाही. घटनात्मक प्रमुख म्हणून या राज्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी हे केले, मी केलेले नाही असे म्हणून चालणार नाही. तुम्ही राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेचे प्रमुख आहात. राज्याच्या निवडणूक आयोगाने तुमच्यावर एफ.आय.आर. दाखल केलेले आहेत. प्रांत अधिका-याला निलंबित करण्यात आले. त्यांच्या समोर बयाण झाला. आमच्यासमोर बयाण झालेला नाही. तुमच्या विरोधात निर्णय झालेला आहे. त्या निर्णया विरुध्द तुम्ही हायकोर्टामध्ये, सुप्रिम कोर्टामध्ये अपिल करा. माझ्या तुम्हाला शुभेच्छा आहेत की, कालांतराने तुमच्यावरील गुन्हे खोटे ठरावेत. परंतु आजच्या वस्तुस्थितीचा तुम्ही स्वीकार करा. मी तुमच्या जिल्हयातील नाही. तुमच्या जिल्हयातील सहकारी कारखाने, दूध संघ तुमचे आहेत. आम्ही कारखान्यासाठी परवानगी मागितली तर ती आम्हाला लवकर मिळाली नाही. तुम्ही आम्हाला सूतगिरणीसाठी परवानगी दिली नाही. तुमच्या सूतगिरण्यांना आम्ही भरभरुन पैसे दिलेत. मला त्याच्या खोलात जावयाचे नाही. या राज्यातील लोकशाही टिकवावयाची असेल, लोकशाहीमध्ये घटनात्मक परिवर्तन आणावयाचे असेल, महाराष्ट्र राज्याचे बिहार राज्य करावयाचे नसेल तर महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत सर्वात वाईट गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे आपल्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KTG/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 15:35

श्री.नितीन गडकरी .........

राज्यात कायद्याचा सन्मान होत नाही, कायद्याची कोणाला भिती वाटत नाही. कारण आपल्या राज्यामध्ये चांगले काम करणा-या माणसाला सन्मान मिळत नाही आणि वाईट काम करणा-याला शिक्षा होत नाही. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, मी पुण्याच्या दोन प्रकरणांबद्दल बोललो आहे. त्या प्रकरणांची सी.आय.डी. चौकशी करा आणि ते गुन्हेगार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे असले तरी त्यांच्यावर कडक कारवाई करा. ती कारवाई आपण कराल अशी मी तुमच्याकडून अपेक्षा करतो. महाराष्ट्र राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची अतिशय वाईट परिस्थिती आहे. आता पर्यंत कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मला दाऊद, विदेशी शक्ती, आतंकवादी, गुन्हे करणारे, बलात्कार करणारे, दरोडेखोरांवर बोलावे लागत होते. परंतु माझे दुर्दैव असे आहे की, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मला आज माननीय गृहमंत्री महोदयांविषयी बोलावे लागत आहे. त्यामुळे माझी मान शरमेने खाली जात आहे, याचे मला दु:ख आहे. महाराष्ट्र राज्याच्या गृहमंत्र्यांविषयी मला असे बोलावे लागत आहे याचे मला दु:ख होत आहे. माझी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांना विनंती आहे की, आपण राज्यातील कायदा व सुव्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर कु.खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती आहे की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीकरिता सभागृह 10 मिनिटे स्थगित करण्यात यावे, त्यानंतर बाकी सर्व सन्माननीय सदस्य देखील सभागृहात उपस्थित राहू शकतील.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : ठीक आहे, सभागृहांच्या नेत्यांचेही हेच मत असल्यामुळे हे सभागृह 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( 3.41ते 3.51 पर्यंत बैठक स्थगित झाली आहे.)

----------

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगिती नंतर ... )

**<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती माननीय भास्कर जाधव.</u>**

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 के अन्तर्गत राज्य में कानून और व्यवस्था की स्थिति के बारे में जो प्रस्ताव सदन में रखा गया है, उस प्रस्ताव पर मैं अपने विचार रखने के लिए यहां पर खड़ी हूँ. राज्य की लोकसंख्या और उसकी तुलना में हमारे पास उपलब्ध पुलिस बल को देखते हुए राज्य में कानून और व्यवस्था की स्थिति को कायम रखना किसी भी शासन के लिए आसान बात नहीं है. एक तरफ समाज में गिरती हुई नैतिकता, बढ़ती हुई गुंडागीरी, दहशतवाद और अन्य विभागों की तरह गृह विभाग में भी कुछ भ्रष्ट अधिकारियों की मौजूदगी के कारण राज्य में कानून और व्यवस्था की स्थिति के ऊपर खतरा पैदा होना लाजिमी है, ऐसा मैं मानती हूँ. इस पर ठोस उपाय करने की जरुरत है और इसी दृष्टि से यहां पर चर्चा उपस्थित की गई है, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, हमारे माननीय गृह मंत्री श्री. आर.आर. पाटील ने जब से पद संभाला है, तब से उनके ऊपर संकट के बादल मंडराते रहे हैं, लेकिन उसके बावजूद उन्होंने जिस प्रकार से कार्य किया है, वह निश्चित रुप से सराहनीय है. इस बारे में मैं आपके सामने उदाहरण पेश करना चाहती हूँ. समाज में गिरती हुई नैतिकता और उसके चलते बढ़ते हुए क्राइम रेट को रोकने के लिए माननीय मंत्री महोदय ने डान्स बार पर बंदी लगाने का जो निर्णय लिया है, उससे यह सिद्ध होता है वे बड़े से बड़ा डिसीजन लेने में पीछे नहीं हटते. इसी प्रकार से साहूकारी पद्धति पर प्रतिबंध लगाने का काम इस राज्य में किया गया. इस निर्णय से परेशान किसानों को बहुत दिलासा मिली है. जब इस तरह का काम होता है तो मैं इतना ही कहना चाहती हूँ :

"रोशनी के लिए हमने शमा जला रखी है,
हवाओं ने भी मगर शर्त लगा रखी है."

इस प्रकार की परिस्थिति हमारे राज्य में है.

. . . भाषण जारी, LL 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान का भाषण जारी

इसका अर्थ यह नहीं है कि पिछले एक साल में दहशतवाद और कानून-व्यवस्था के बारे में जो घटनाएं इस राज्य में हो रही है, उसकी तरफ हमें देखने की जरुरत नहीं है. ये घटनाएं हमारे लिए परेशानी का कारण है. इस चर्चा के माध्यम से हम सभी लोग मिलकर इसकी जड़ तक जाकर इसके लिए रास्ता निकालेंगे तो महाराष्ट्र राज्य का फायदा हो सकता है. अगर हम इस चर्चा के दौरान आरोप-प्रत्यारोप करते रहेंगे तो इससे समस्या का हल निकलने वाला नहीं है.

सभापति महोदय, यह सच है कि जिला परिषद, पंचायत समिति, नगरपालिका और महानगरपालिका के चुनाव के अन्दर गुंडागर्दी की बढ़ती हुई प्रवृत्ति हमारे लिए धोखादायक है और इसका दोष हम अकेले शासन को नहीं दे सकते हैं, ऐसा मैं समझती हूँ. राजकारण में गुंड प्रवृत्ति के लोग बढ़ रहे हैं और "मनी मसल पावर" का इस्तेमाल हो रहा है. जिन इलेक्शन के ऊपर पहले 10 या 20 हजार रुपए खर्च होते थे, वहां पर अब 10 या 20 लाख रुपए खर्च हो रहे हैं. हमें यह विचार करना चाहिए कि यह पैसा राजनीति में कहां से आ रहा है ? इस प्रवृत्ति के लिए हम अकेले शासन को जिम्मेदार नहीं ठहरा सकते. चुनाव के दौरान चुनाव आयोग की भूमिका भी महत्वपूर्ण हो गई है. मैं माननीय गृह मंत्री से कहना चाहती हूँ कि पुलिस का जो सिस्टम है, उसमें सुधार करने की आवश्यकता है. मुझे ऐसा लगता है कि अगर पुलिस की भूमिका ठीक नहीं रही तो लोकशाही का मजाक होता रहेगा. मैं आपको एक उदाहरण देना चाहती हूँ कि परभणी नगरपालिका के चुनाव के बाद एक नव निर्वाचित नगरसेवक मेरे साथ एस.पी. के पास गया था. एक मारहाण की घटना की शिकायत करने के लिए हम लोग एस.पी. के चेम्बर में बैठे थे तो उतने में मेरे सामने ही उस नव निर्वाचित नगरसेवक को धारा 495 का आरोपी बना दिया गया और उससे कहा गया कि वह दरोडा डालने के लिए किसी के घर में गया था.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान का भाषण जारी ....

उसके खिलाफ शिकायत दर्ज हुई. इसके बाद वह व्यक्ति तीन महीने तक जेल में सड़ता रहा. यह सिस्टम एक मज़ाक हो गई है. एस.पी. की मौजूदगी में एक कामगार के खिलाफ धारा 495 के अन्तर्गत मामला दर्ज किया जाता है और हम कुछ नहीं कर पाते. हम बेबस है. हम कुछ नहीं कर सकते हैं. यह वातावरण यह दर्शाता है कि, शासन और अधिकारियों के काम में कहीं कहीं दोष है, हमारी सिस्टम में कहीं न कहीं दोष है. चार्जशीट दोषपूर्ण रखी जाती है. सही आरोपी को छोड़ दिया जाता है और निर्दोष व्यक्ति को तकलीफ उठानी पड़ती है. यह हमारी सिस्टम का दोष है. इसलिए अब समय आ गया है कि आईपीसी और सीआरपी कानून के अन्तर्गत जरुरी संशोधन किए जाए और इन कानूनों के अन्तर्गत मौजूद खामियों को दूर किया जाए.

सभापति महोदय, विरोधी पक्ष के सम्माननीय सदस्यों की ओर से यहां इस सदन में यह जो प्रस्ताव चर्चा के लिए रखा गया है, उसके अन्तर्गत नाबालिग लड़कियों पर होने वाली बलात्कार की घटनाओं का भी उल्लेख है. महिलाओं पर दिन-ब-दिन अत्याचार बढ़ते जा रहे हैं, यह बात किसी से छिपी हुई नहीं है. इस संबंध में मैं यह बताना चाहती हूं कि नाबालिग लड़कियों एवं महिलाओं पर होने वाले बलात्कार के केवल 10 प्रतिशत मामले ही पुलिस स्टेशन में दर्ज होते हैं. इसके दो कारण है. एक कारण यह है कि महिलाओं को बदनामी का डर होता है. दूसरा कारण यह है कि, पुलिस स्टेशन में पुरुष कर्मचारियों के सामने लज्जावश या स्वाभाविक हिचक की वजह से महिलाएं शिकायत दर्ज नहीं कराती है. इस बात को मद्देनज़र रखते हुए मैं यह मांग करती हूं कि जहां पर 50 प्रतिशत से ज्यादा महिलाओं की आबादी है वहां पर महिला पुलिस स्टेशन की स्थापना की जाए. महिला पुलिस स्टेशन स्थापित हो जाने से वहां महिलाएं बिना किसी हिचक के अपनी शिकायत दर्ज कराएगी. महिला पुलिस स्टेशन स्थापित हो जाने के बाद पुलिस स्टेशन में दर्ज अपराधों के प्रतिशत में भी वृध्दि दिखाई देगी. अत: मैं माननीय गृह मंत्री जी से अनुरोध करती हूं कि वे इस सुझाव पर जरुर अमल करें.

सभापति महोदय, हमारे देश में चुनाव के दौरान गुंडागर्दी का माहौल देखा जाता है. इस बारे में भी कठोर उपाय करने की जरुरत है. ये उपाय सिर्फ सरकार की तरफ से ही नहीं बल्कि सरकार और विरोधी पक्ष मिलकर इस चर्चा के माध्यम से कोई ठोस योजना तैयार करें. ताकि अब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) MM-1

आगे लोकशाही का खून न हो और लोकशाही को बचाया जा सके. गुंडागर्दी हर पक्ष की तरफ से होती है. इसलिए हम सबको मनी पावर और मसल पावर का गलत इस्तेमाल दूर करने के लिए प्रयास करना चाहिए.

सभापति महोदय, मैं एक और बात की तरफ सरकार का ध्यान खींचना चाहूंगी. यह देखा जा रहा है कि जाति के प्रमाणपत्र की जांच पड़ताल किए बिना ही आरक्षित सीट पर चुनाव लड़ा जाता है. लेकिन चुनाव हो जाने के बाद पता चलता है कि उम्मीदवार द्वारा प्रस्तुत किया गया जाति का प्रमाणपण अवैध है. यह बात पता चलने के बाद चुनाव रद्द कर दिया जाता है. इसकी वजह से फिर से चुनाव प्रक्रिया से गुज़रना पड़ता है. इस समस्या को हल करने के लिए प्रमाणपत्र की जांच-पड़ताल के लिए समिति गठित की गई है. लेकिन इस समिति के अन्तर्गत यह माहौल दिख रहा है कि, जो सचमुच लाभार्थी है, उस पर अन्याय हो रहा है. उदाहरणार्थ परभणी में पाशा खुरेशी ओबीसी के अन्तर्गत आते है.

इसके बाद श्री शर्मा....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान का भाषण जारी (पूर्वी तालेवार)

जहाँ पर अन्याय है वहां पर कानून और व्यवस्था की स्थिति का प्रश्न उपस्थित होता है. जिस जगह पर भ्रष्टाचार पनप रहा है, उसको दूर करने का काम होना चाहिए.

सभापति महोदय, मैं एक और बात यहां पर आपके सामने लाना चाहती हूँ. इस प्रस्ताव में दहशतवाद का जिक्र किया गया है. अलग अलग अन्तर्राष्ट्रीय संगठन दहशतवाद को फैलाने का काम कर रहे हैं और इसको रोकने के लिए बहुत संवेदनशील और खतरनाक मामलों से पुलिस को जूझना पड़ता है. इसके लिए हमारे गृह मंत्रालय ने बहुत प्रोग्रेसिव काम किया है. एस.एम.एस. और एम.एम.एस. के माध्यम से किसी संवेदनशील व्यक्ति तक पहुंचने का काम पुलिस की वॅन्स द्वारा किया जाता है. यह सब प्रगति हमारे गृह मंत्रालय ने की है, लेकिन इसके बावजूद मैं एक चीज बोलना चाहती हूँ कि जब डॉक्टर के पास कोई इन्सान जाता है तो अगर डॉक्टर उसका डॉयगोनसिस सही करता है, तभी उसका सही इलाज हो सकता है. दहशतवाद का डॉयगोनसिस सही हो, यह सब से ज्यादा जरुरी बात है. ऐसे कई उदाहरण हमारे सामने हैं, जहां पर कार्रवाई नहीं की गई. नांदेड़ में बम ब्लास्ट हुआ. परभणी, जालना और पूर्णा में मस्जिद के अन्दर ब्लास्ट किए गए. इसका संशय जातीयवादी संगठन "बजरंग दल" पर किया गया था. मैं यह बात पुलिस की रिपोर्ट के आधार पर कह रही हूँ. लेकिन आज तक उनके ऊपर कोई कार्रवाई नहीं हुई. नांदेड का केस सी.बी.आई. को दिया गया तो उन्होंने कहा कि हम यह केस नहीं लेना चाहते. नांदेड के बम ब्लास्ट में शटर टूटकर 10 फीट दूर चला गया, सामने की बिल्डिंग के शीशे टूट गए. लेकिन जब एफ.आई.आर. दर्ज हुई तो उसमें कहा गया कि यह इन्श्योरेन्स के लिए किया गया है. मेरा स्पष्ट रुप से मानना है कि इन्श्योरेन्स के लिए ऐसी चीजें नहीं होती हैं. लेकिन इस प्रकार के लूप-होल्स हमारे कानून में हैं. हमें स्वस्थ वातावरण में रहने का अधिकार है. हमारे राज्य से दहशतवाद खत्म होना चाहिए और इसके लिए दोषी व्यक्तियों या संस्थाओं के खिलाफ शिकायत दर्ज होनी चाहिए. मगर यह हो नहीं रहा है. इसलिए माननीय गृह मंत्री को इस बारे में खास तवज्जुह देनी चाहिए, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, अन्त में मैं इतना ही कहना चाहती हूँ कि हमारी लीडरशिप में, हमारे माननीय गृहमंत्री में उच्चस्तरीय क्षमता है, फिर भी आज की परिस्थिति के अन्दर दहशतवाद और

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . 2

. . . श्रीमती फौजिया खान जारी

कानून-व्यवस्था की स्थिति से लड़ना आसान नहीं है. मैं आशा करती हॅूं कि हमारे कार्यक्षम और उच्च क्षमता वाले माननीय गृह मंत्री इन अड़चनों को दूर करने में कामयाब होंगे. मैं आपके सामने एक शेर पढ़ना चाहती हूँ.

"फलक की चाह है जहां बिजलियां गिराने की,
हमें भी जिद है, वहां आशियां बनाने की."

इसी के साथ मैं अपना भाषण खत्म करती हॅूं.

...............

भाषण पूर्ण. नंतर श्री. सरपोतदार यांचे मराठी भाषण.

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये एका अतिशय गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. ज्यावेळी आम्ही हा प्रस्ताव दिला त्यावेळी त्याच्या पाठीमागचा उद्देश आताच्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकांव्यतिरिक्त महाराष्ट्रामध्ये अन्य जी कायदा व सुव्यवस्था होती त्यासंदर्भात चर्चा करावयाचा होता. प्रस्तावात तसा उल्लेख आला परंतु प्रत्यक्षात प्रामुख्याने सांगली आणि खासकरुन तासगाव यावरच आज चर्चा झाली. आमचे माजी विरोधी पक्ष नेते सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जे भाषण केले ते तासगाव आणि त्या परिसरातील परिस्थिती यासंदर्भात होते. त्यावेळी या राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आणि या सदनाचे नेते श्री. आर. आर. पाटील या ठिकाणी उपस्थित होते. नेमके आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. या सदनाच्या बाबतीत मला एक गोष्ट समजत नाही. खरे म्हणजे हे जेष्ठांचे सदन मानले जाते परंतु या सदनाला नेहमी दुय्यम स्थान दिले जाते. आपल्याला कल्पना आहे की, काल सभागृहाची बैठक सुरु होताना वंदे मातरम्च्या वेळी प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळी कोणीही कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदनाचे कामकाज दहा मिनिटांसाठी स्थगित करावे लागले. इतके या सदनाकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. आज या विषयावर ज्यावेळी चर्चा सुरु झाली त्यावेळी सुध्दा सदनाचे कामकाज स्थगित करावे लागले. त्यावेळी सभागृहामध्ये कोणीही कॅबिनेट मंत्री तसेच गृह खात्याचे राज्यमंत्री सुध्दा उपस्थित नव्हते. एकंदर कायदा व सुव्यवस्था या प्रश्नाकडे पाहण्याची जर अशी मानसिकता असेल तर मला असे वाटते की, आपण बिहारकडे चाललो आहोत. बिहारच्या परिस्थितीमध्ये आता सुधारणा होईल परंतु श्री. लालूप्रसाद यादव यांच्या काळात बिहारमध्ये जी परिस्थिती होती त्या परिस्थितीकडे आपण प्रवास करीत आहोत अशी माझी भावना झालेली आहे. कायदा व सुव्यवस्थेला महत्व मिळत नाही. मुंबई शहरातील कालची अशी एक बातमी आहे. दोन व्यापारी रस्त्यावरुन चालले होते. पाठीमागून मोटारसायकवरुन आलेल्या लोकांनी त्यांना गोळ्या घातल्या. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आणि दुसरा रुग्णालयामध्ये कधी मृत्यू येतो याची वाट पाहात आहे. ही खार-सांताक्रूझ येथील घटना आहे. ही मुंबई शहरातील परिस्थिती आहे. या मुंबई शहरात जीवन जगणे फार असह्य होऊन बसले आहे. मी माननीय गृह राज्यमंत्री श्री. म्हेत्रे यांना बोललो होतो की, आपण एकदा माझ्या बरोबर यावे. मी आपल्याला पोलीस स्टेशनला घेऊन जातो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार ......

त्या ठिकाणी तक्रारदारांची तक्रार ऐकून घेतली जात नाही. उलट ज्यांच्या विरुध्द तक्रार असते त्यांना मानाचे स्थान दिले जाते अशी परिस्थिती आहे. ही गोष्ट निर्विवाद आहे की, महाराष्ट्राच्या पोलिसांनी पुष्कळशा गुन्ह्यांचा चांगल्या पध्दतीने शोध घेतलेला आहे. विशेषत: आंध्र प्रदेशमधील हिरे चोरांना मुंबईमध्ये पोलिसांनी झटपट पकडले. काही गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी खूप चांगली तत्परता दाखवली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी कितपत शोध घ्यावयाचा याबाबत मी जास्त बोलत नाही. कारण वेळ मर्यादित आहे. आज पहिल्यांदा ज्यावेळी या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली त्याची वेळ आणि चर्चा पहिल्यांदा स्थगित झाली त्याची वेळ माझ्याकडे आहे. 2 वाजून 18 मिनिटांनी आज ही चर्चा सुरु झाली आणि 3 वाजून 53 मिनिटांनी काही काळाकरिता चर्चा स्थगित झाली. एक सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलण्यासाठी उभे राहिले त्या संपूर्ण भाषणामध्ये देवाण-घेवाण, उत्तर-प्रतिउत्तर अशा पध्दतीची चर्चा झाली. कोणत्याही सदनामध्ये चालत नाही तशी चमत्कारिक चर्चा या सदनात घडली. त्यावेळी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला परंतु पुढे तशीच चर्चा चालू राहिली. सभापती महोदय, मी विधानसभेमध्ये काम केले आहे. तेथील परिस्थिती मला माहीत आहे. या सभागृहातील अनुभव निराळा आहे. मी लोकसभेमध्ये काम केले आहे. लोकसभेतील परिस्थिती मला माहीत आहे. परंतु आज या ठिकाणी जे पाहिले ते कोठेही पाहिले नाही. एखादा सन्माननीय सदस्य बोलत असेल, भाष्य करीत असेल तर हरकतीचा मुद्दा उपस्थित करणे हा सदनाच्या सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. कोणताही सन्माननीय सदस्य केव्हाही हरकतीचा मुद्दा उपस्थित करु शकतो. हा त्यांचा अधिकार आहे. परंतु हरकतीच्या मुद्याच्या नावाखाली कोणी भाषण करावयास लागले तर ते चालू दिले जात नाही. परंतु आज आपण पाहिले की, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी आरोप केल्यानंतर त्याला उत्तर देत असताना माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी भाषण केले. मी त्यांना सांगितले की, आपण सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि जे काही उत्तर द्यावयाचे असेल ते आपल्या भाषणामध्ये द्यावे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ 16:15

(श्री. मधुकर सरपोतदार....)

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केलेले संपूर्ण आरोप निराधार आहेत, ते योग्य नाहीत असे तुम्ही तुमच्या भाषणात सांगा. या प्रस्तावावरील चर्चेला कोण उत्तर देणार ? हे देखील माहीत नाही. या सभागृहाचे कामकाज गांभीर्याने घेतलेले जात नाही. शेवटी या ठिकाणी आपण कशासाठी चर्चा घडवून आणतो ? जनतेला दिलासा मिळावा, राज्य सुरक्षित असावे, गुन्हेगारी कमी व्हावी आणि सगळया गुन्हेगारांना पोलिसांची भीती वाटावी हा या चर्चेच्या मागचा मूळ उद्देश आहे. आता पोलीस आणि गुन्हेगार हातात हात घालून फिरायला लागल्यानंतर जनतेने कुणाकडे पहायचे ? या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांची कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात तक्रार आहे. दुसरे एक मंत्री, राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था नाही, असे म्हणतात. निवडणुकीच्या काळात काय काय घडले यावर याठिकाणी चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी काही घटनांच्या संदर्भातील मजकूर याठिकाणी वाचून दाखविला. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. कारण तेच तेच मुद्दे मांडून शिळया कढीला ऊत आणण्यामध्ये मला स्वारस्य नाही. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात हे मुंबई शहर आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्य आज कुठे आहे ? राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था किती चांगली आहे ? सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान यांनी त्यांच्या भाषणामध्ये व्यथा मांडली. जे गुन्हेगार आहेत त्यांना पकडले पाहिजे. पोलीस चोराला सोडून सन्याशाला पकडतात हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. कुठे सब-इन्स्पेक्टर लाच घेतता पकडला तर कुठे वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला लाच घेताना पकडले अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रातून रोज वाचावयास मिळतात. अशा प्रकारची बातमी येत नाही असा एकही दिवस उजाडत नाही. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्री असे म्हणतात की, महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. पण प्रत्यक्षात महाराष्ट्र कुठे चालला आहे ? संपूर्ण राज्य आज अंधारात आहे. हे प्रगतिचे लक्षण आहे काय ? संपूर्ण राज्यात गुन्हेगार मोकाट सुटलेले आहेत, लोकांना खायला अन्न मिळत नाही, पिण्यासाठी पाणी मिळत नाही, हे प्रगतिचे लक्षण आहे काय ? आज राज्यात कोणीही सुरक्षित नाही. परीक्षांमध्ये मुलांना राजरोसपणे कॉप्या दिल्या जातात. मध्यंतरी बीडमधील एक घटना मी दूराचित्रवाहीनीवरुन पाहिली. परीक्षा हॉलमध्ये जाऊन लोक मुलांना कॉप्या देत होते आणि ते देत असताना त्यांना कोणी अडवत नव्हते. ही प्रगत राज्याची

..2..

(श्री. मधुकर सरपोतदार...)

संकल्पना आहे काय ? प्रगत राज्य कशाला म्हणायचे याची व्याख्या करण्याची वेळ आलेली आहे. आपण या प्रगत राज्याची रोज आरती करता आहात ते राज्य खरोखरच प्रगत राज्य आहे काय याचा शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे. शिवसेना-भाजप युती सत्तेवर असताना राज्यावर 36 हजार कोटीचे कर्ज झाले. त्यामध्ये आधीच्या सरकारचे 16 हजाराचे कर्ज होतेच. त्यावेळी विरोधकांनी महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीत काढले असा आकांत केला. आता आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यापासून राज्यावर 1 लाख 37 हजार कोटीचे कर्ज झालेले आहे. आता हे काढलेले कर्ज कशावर खर्च केलेले आहे ? माननीय गृहमंत्र्यांनी पोलिस यंत्रणेच्या आधुनिकीकरणाच्या, पोलिसांच्या पगारवाढीच्या, श्रेणी वाढीच्या घोषणा केल्या. खरे म्हणजे त्यांनी पोलिसांच्या मूळ समस्या समजून घेतल्या पाहिजेत. पोलीस आज प्रत्यक्षात कशा प्रकारे जीवन जगत आहेत हे गृहमंत्र्यांनी जाऊन पाहिले पाहिजे. पोलीस दलाच्या बाबतीत भ्रष्टाचार हा जसा परवलीचा प्रश्न आहे तसा पोलिसांच्या समस्या हा देखील परवलीचा प्रश्न झालेला आहे. पोलिसांकडे कुणाचेही लक्ष नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..............

आणि सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, आमच्या महाराष्ट्राचे असे झाले आहे की, श्री.आर.आर.पाटील उर्फ आबा यांच्यासारखा मनुष्य आज गृहमंत्री आहे, उपमुख्यमंत्री आहे, रोज एक नवीन घोषणा त्यांनी केली नाही असे होत नाही. काही ना काही स्टेटमेंट ते करतात. महाराष्ट्रातील लोकांना हे मिळणार, ते मिळणार अशी घोषणा करायची, प्रत्यक्षात अंमलबजावणी नाही. जर तुमची योजना तयार नव्हती, निधी नव्हता तर घोषणा कशाला केली? पोलिसांना पगारवाढ! काय गरज होती? अगोदर सगळी व्यवस्था करुन नंतर घोषणा दिली असती, आज घोषणा केली आणि दोन दिवसात वाढीव पगार पोलिसांच्या हातात पडला असता तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु घोषणा करायच्या आणि अंमलबजावणी काहीच नाही. याला आपण प्रगत राज्य म्हणायचे का? मला कळत नाही, या महाराष्ट्र राज्यात काय चालले आहे? सभागृहात गृहराज्यमंत्री बसले आहेत. मध्यंतरी खूप टीका झाल्यानंतर त्यांना काही अधिकार देण्यात आले असे मला कळते. प्रत्यक्षात त्यांना कोणकोणते अधिकार मिळाले याची मला माहिती नाही. परंतु चर्चेला गृह राज्यमंत्री म्हणून जर ते उत्तर देणार असतील तर गृहमंत्री आहोत असे समजून उत्तर दिले पाहिजे. आम्ही जे मुद्दे उपस्थित करतो त्याची उत्तरे आपल्याकडून मिळण्याची अपेक्षा आहे. असे उत्तर ते देणार असतील तर ठीक आहे, नाही तर उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन उत्तर दिले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, दररोज वर्तमानपत्र पाहिले तर एकही दिवस असा जात नाही, ज्या दिवशी आम्हाला पोलिसांविषयी एखादी चांगली बातमी, परंतु 10 बातम्या त्यांच्याविरोधात वाचायला मिळतात. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांचीच आहे ना? एक क्षेत्र असे दाखवा, ज्या ठिकाणी पोलिसांनी असे कृत्य केले, ज्यामुळे आम्हाला अभिमान वाटेल? काही जागा आहेत. माझी पूर्ण खात्री आहे, मुंबईच्या पोलिसांनी जर मनावर घेतले आणि भ्रष्टाचार झाला नाही तर कोणताही गुन्हेगार मुंबई पोलिसांकडून सुटून बाहेर पळून जाऊ शकत नाही, इतकी जबरदस्त यंत्रणा आहे. हल्ली काय झाले आहे? त्यांच्यामध्ये रिझर्व्हेशन आले, प्रमोशनमध्ये रिझर्व्हेशन आले. कोणालाही मेरिटवर प्रमोशन नाही. सगळी प्रमोशन्स पात्रता असो वा नसो, वरच्या पदावर बसवा. ज्यांची पात्रता नाही त्यांना वरच्या अधिकारावर नेऊन बसवा अशा योजना चालू आहेत. काही अधिकारी फक्त बसून होते. परवा नेमणुका झाल्या. त्यामध्ये पुण्याचे श्री.धनंजय जाधव यांची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 16:20

श्री.मधुकर सरपोतदार.............

मुंबई पोलीस आयुक्त म्हणून नेमणूक झाली. मुंबईला पोलीस आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्याबरोबर त्यांनी काय केले? मला मोठे आश्चर्य वाटते. त्यांचा कारभार कसा चालणार? त्यांच्याबद्दल मला फारशी माहिती नाही. परंतु पोलिसांचे ब्रीदवाक्यच ते बदलून टाकणार आहेत असे माझ्या वाचनात आले. पोलिसांच्या ब्रीदवाक्यावर पंजा असलेले चिन्ह पहावयास मिळते. हीच कॉंग्रेस पक्षाची निशाणी आहे. आचारसंहिता आणि शिस्तीचा विचार केला तर पोलिसांच्या ब्रीदवाक्यातील पंजा असलेली निशाणी ही राजकीय पक्षाची निशाणी होऊ शकत नाही. पोलिसांची निशाणी सुध्दा हाताचा पंजा आणि कॉंग्रेस पक्षाची निशाणी ही सुध्दा हाताचा पंजा ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, दहशतवाद विरोधी पथक पोलीस दलामध्ये कार्यरत आहे. या दलाचे काम अत्यंत चांगले चालले आहे. मध्यंतरी पानीपत येथे ट्रेनवर जो हल्ला झाला, त्यावेळी या पथकाला तपासाच्या कामात हातभार लावण्यासाठी पाचारण करण्यात आले. याचे कारण असे की, मुंबईला झालेल्या बॉम्बस्फोट मालिकांचा शोध घेण्यासाठी हे पथक निर्माण केले गेले होते. प्रश्न असा आहे की, अशी पथके आपण निर्माण करतो. त्यांना सोयी-सुविधा देतो. त्यांच्याकडून ज्या प्रकारचे रिझल्ट्स अपेक्षित असतात ते मिळणे आवश्यक आहे. पोलीस दलाचा दबदबा का निर्माण होत नाही याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

पोलीस खाते कार्यकर्त्यांवर 143,148, 149, 151 अशी वेगवेगळे कलमे लावत असतात. कार्यकर्त्यांवर पोलीस खाते जी कलमे लावते त्याची जंत्री मी काही या ठिकाणी वाचून दाखवित नाही. मी ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी निर्मल नगर पोलीस स्टेशन, खेर नगर पोलीस स्टेशन, वाकोला पोलीस स्टेशन आहेत. या ठिकाणी चो-यांचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढलेले आहे. माझ्या भागामध्ये शासकीय वसाहत सुध्दा आहे. शासकीय वसाहतीमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात चो-या वाढलेल्या आहेत. माझ्याकडे मोठया प्रमाणात शासकीय कर्मचारी येतात आणि सांगतात की, आम्ही दिवसा कार्यालयात जातो, मुले शाळेत जातात आणि हीच संधी साधून चोर आमच्या घरातील सर्व ऐवज लंपास करतात, जीवन भर जमा केलेली जमा-पुंजी चोर चोरुन नेतात त्यामुळे आम्हाला या ठिकाणी राहणे अवघड होऊन बसलेले आहे. सभापती महोदय, 100 चो-या झाल्या असतील तर त्यापैकी एक-दोन चो-यांचाच तपास लागत असतो, बाकीच्या 98 टक्के प्रकरणात चोर पोलिसांना सापडत नाही. सगळया सराईत चोरांची नावे पोलिसांना माहिती असतात परंतु असे असतांना सुध्दा चोर मात्र काही सापडत नाहीत, पकडले जात नाहीत. त्यामुळे सध्या जो काही प्रकार चालला आहे त्यावर गृहखात्याचे नियंत्रण असले पाहिजे परंतु गृहखाते आता राजकारणी लोकांकडेच लक्ष देत आहे. संपूर्ण पोलीस खाते राजकारण्यांच्या पाठीशी लागलेले असल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, लोक पोलीस संरक्षण सुध्दा घेत नाही. पोलीस संरक्षण घेतले तर लोक हसतात. आज अशी परिस्थिती आहे की, चौ-या झाल्या तरी लोक त्याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये जाण्यास तयार नसतात. यासंदर्भात मी आपल्याला एक उदाहरण सांगतो की, मध्यंतरी आमच्या कडील एका सोन्या-चांदीच्या व्यापा-याच्या दुकानात चोरी झाली त्यामुळे हा व्यापारी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवावयास गेला परंतु पोलिसांनी त्याचा गुन्हा न नोंदवता तू सोने-चांदी काळया बाजारातून तर आणली नव्हते ना? अशा प्रकारचे प्रश्न विचारुन त्यांला भंडावून सोडले. चोरीची तक्रार लिहायची सोडून त्यालाच प्रश्न विचारु लागले. आता पोलिसांचा "सदैव तत्पर, सदैव मदतीस तयार" असा सिम्बॉल तयार केलेला आहे. परंतु आपण कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये गेलो तर आपल्याला भयानक अनुभव येतो, वेगळाच अनुभव येतो.

.....2

श्री. मधुकर सरपोतदार......

उलट पोलीसच गुन्हेगारांना मदत करण्यास सदैव तत्पर असतात. सभापती महोदय, यासंदर्भात मला एक उदाहरण द्यावयाचे आहे की, आमच्या भागात एक मुस्लीम कुटुंब राहते. त्या घरातील महिलेने आपल्या सख्ख्या भावाच्या मुलास आपली मुलगी दिली होती. लग्नांनतर त्यांना दोन तीन मुलेही झाली परंतु काही दिवसानंतर त्यांचे बिनसले. त्यामुळे ती मुलगी परत आपल्या बापाच्या घरी आली. या प्रश्नाच्या संदर्भात मौलवी तसेच काझी यांनी मार्ग काढून त्यांना घटस्फोटही करुन दिला. परंतु ही सर्व घटना घटना घडून गेल्यानंतर त्या मुलीच्या बापाने मुलीच्या सासरकडच्या लोकांना त्रास देण्यास सुरुवात केली. या मुलीचे वडील हे त्या भागातील काँग्रेसचे एक कार्यकर्ते आहेत. पोलीस स्टेशनमध्ये अशा लोकांचा चांगलाच दबदबा असतो. मुलाची बहीण ही मुंब्रा येथे राहते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

त्यांना मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले आणि सांगितले की, तुम्ही मुलाला हजर करा. मुलाच्या वडिलांनी सांगितले की, त्यांचा रीतसर तलाक झालेला आहे आणि आता तो अरब देशात गेलेला आहे. यावर पोलिसांनी त्यांना सांगितले की, आमच्याकडे तक्रार आलेली आहे, तेव्हा तुम्ही कोणत्याही परिस्थितीत मुलाला पोलीस स्टेशनमध्ये हजर करा असा त्यांना दम दिला. पुढे असेही सांगितले की, मुलीकडून जेवढे सामान घेण्यात आलेले आहे ते आमच्याकडे जमा करा, नाहीतर तुम्हा दोघांना पोलीस स्टेशनमध्ये बंद करु. त्यानंतर मुलीचे आईवडील आणि त्या मुलाला पोलीस स्टेशनमध्ये बोलाविण्यात आले. त्यावेळी पोलिसांच्या समक्ष मुलीचा मामा त्या मुलाच्या अंगावर धाऊन गेला. हा काय प्रकार आहे असे त्याच्या वडिलांनी पोलिसांना विचारले असता त्यांनी सांगितले की, तो गृहस्थ कॉंग्रेसचा मोठा कार्यकर्ता आहे. त्याच्या विरुध्द आम्ही काहीही करु शकत नाही. वो बड आदमी है. माझ्या मुलाचा रीतसर तलाक झाला आहे असे त्याचे वडील सांगत असताना देखील त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अशाप्रकारची अनेक उदाहरणे येथे सांगता येतील. पण वेळ थोडा आहे. मला अजून इतरही प्रश्न मांडावयाचे आहेत.

सभापती महोदय, सांगली जिल्हयातील तासगाव येथे काय घडले त्याबाबत येथे खूप चर्चा झाली. मी त्यास पुन्हा स्पर्श करु इच्छित नाही.

सभापती महोदय, मुंबईतील घाटकोपर येथील शिवसेनेचे नगरसेवक श्री.कमलाकर जामसंडेकर यांची दिवसाढवळ्या त्यांच्या रहात्या घरी अज्ञात इसमांनी गोळ्या घालून हत्या केली. त्यांचा काय दोष होता ? मागील दोन वर्षे ते महानगरपालिकेवर निवडून आले होते. तिसऱ्यांदा निवडून येऊन त्यांनी हॅटट्रीक केली होती. त्यांच्या घरात घुसून त्यांचेवर गोळ्या झाडण्यात आल्या. त्या प्रकरणातील आरोपिंना आजही पकडण्यात आलेले नाही. खून रचल्याचा आरोप ठेवून तीन-चार जणांना 120 (बी) खाली अटक करण्यात आली. त्यांना संशयीत आरोपी म्हणून अटक करण्यात आलेले आहे. खरे आरोपी फरार आहेत. पोलिसांची ही आपसातील तडजोड आहे. खरे आरोपी मोकाट सुटलेले आहेत. मुंबईतील बॉम्ब स्फोटाच्या बाबतीत सुध्दा असे होऊ शकते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS-1

AJIT/ KGS/ MAP/ 16:30

श्री.मधुकर सरपोतदार........

सभापती महोदय, दहशतवादी संघटना म्हणून सीमीला महाराष्ट्रात बंदी आहे. लष्कर-ए-तोयबा संघटनेमार्फत ती काम करीत आहे. मुस्लिमांच्या वस्तीत पोलीस तपासासाठी गेले तर त्यांच्यावर हल्ले होतात. भिवंडी येथील उदाहरण अगदी ताजे आहे. भिवंडी संदर्भात सभागृहात चर्चा झाली त्यावेळी मी माननीय गृहमंत्र्यांना म्हणालो होतो की, Yor are unfit to be Home Minister. You should resign and go.

यानंतर श्री.रोझेकर........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

याचे कारण असे आहे की, आमदारांच्या, खासदारांच्या, शासनाच्या निधीतून व शासकीय जमिनीवर जे पोलीस स्टेशनचे अर्धे काम झाले होते ते थांबविण्याचे अधिकार शासनाला नाही. परंतु, शासनाने स्वत:चे खास अधिकार वापरुन केवळ कुणाचे तरी तुष्टिकरण करण्यासाठी काम थांबविले आहे. ज्याप्रमाणे फाजल गुरुची फाशी देशाच्या गृहमंत्र्यांनी थांबविली आहे त्याचप्रमाणे भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे बांधकाम राज्याच्या गृहमंत्र्यांनी थांबविले आहे. कुणीतरी जमिनीसंदर्भात वाद उत्पन्न करतो आणि आमदारांच्या, खासदारांच्या, शासनाच्या निधीतून सुरु असलेले काम थांबविले जाते. याचा अर्थ असा होतो की, ज्या वस्त्यांचा गुन्हेगार आश्रय घेतात त्या वस्तीमध्ये पोलीस स्टेशन होऊ नये. पोलीस गुन्हेगारांना शोधण्यासाठी हिदू वस्तीमध्ये येतात, हिंदू वस्तीमध्ये बंदी घालतात. अशा पद्धतीने पोलिसांकडून डावे-उजवे केले जाते. बेकसूर माणसाला पकडायचे, ज्याचा गुन्हा नाही त्यांना लॉकअपमध्ये बंद करायचे आणि तिकडे गुन्हेगार मोकाट सुटले आहेत. ही जी पद्धत पोलिसांनी स्वीकारली आहे त्याचा बंदोबस्त होण्याची आवश्यकता आहे. गृहराज्यमंत्री महोदय, आपल्यावर खूप मोठी जबाबदारी आहे. आपण स्वत: किती पोलीस स्टेशन्सना भेटी दिल्या, याची मला माहिती नाही. पोलीस स्टेशन आपल्या अखत्यारित येतात. पोलीस स्टेशन्सना भेटी देऊन त्यांची काम करण्याची पद्धत, गुन्हे नोंदविण्याची कार्यपध्दती, माणसांबरोबर वागण्याची पद्धत तपासण्याची आवश्यकता आहे. एक महिला तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस स्टेशनला गेली परंतु ती तक्रार नोंदवून घेण्यात आली नाही कारण तिच्या बहिणीने अगोदरच पोलीस स्टेशन मॅनेज करुन ठेवले होते. आम्ही पोलिसांना फोन करतो, प्रत्यक्ष पोलीस स्टेशनमध्ये जात नाही, कारण आम्हाला पोलीस स्टेशनमध्ये जाण्यास शरम वाटते. शरम याची वाटते की, ज्या पोलीस स्टेशनमध्ये हप्तेबाजी चालते, भ्रष्टाचार चालतो त्या ठिकाणी आपण ताठ मानेने जाऊ शकत नाही. जाऊन काही फायदा होत नसेल तर पोलीस स्टेशनमध्ये कशासाठी जावे ? असा माझा सवाल आहे. कलम लावणे, ते बदलणे हे प्रकार तर सर्रास सुरु असतात. कायद्यातील कलमांचा सुयोग्य उपयोग व्हावा, अशी रास्त अपेक्षा आहे. नव्याने मुंबई पोलीस आयुक्तपदी मराठी अधिका-याची नियुक्ती झाली आहे, मला त्यांना भेटायला जायचे आहे, मी जरुर भेटण्यासाठी जाणार आहे. सन 1992 साली श्रीकांत बापट ही मराठी व्यक्ती पोलीस आयुक्तपदी

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..............

होती. दंगलीचे कारण पुढे करुन त्यांची बदली करण्यात आली. दंगल क्षमविण्यासाठी त्यांनी अत्यंत कठोर भूमिका घेतली त्यामुळे त्यांची बदली झाली. अशा प्रकारचे पोलीस आयुक्त शासनाला नको असतात. मिळमिळित भूमिका घेणारे आयुक्त हवे असतात. त्यानंतर आज प्रथमच सुर्दैवाने मुंबई शहराला मराठी पोलीस आयुक्त मिळाले, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे, 105 हुतात्म्यांच्या बलिदानाने मुंबई महाराष्ट्राला मिळालेली आहे, काँग्रेस सरकारनेच 105 हुतात्म्यांना गोळया घालून मारले. त्या मुंबई शहरासाठी शासनाला मराठी पोलीस आयुक्त मिळत नाही ? शेवटी मी या संदर्भात एवढेच सांगतो की, सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी पोपटपंची थांबवावी, प्रत्यक्षात करावयाच्या गोष्टी कराव्यात, केवळ तोंडपाटीलकी नको, कृती करुन दाखवावी. नुसत्या घोषणा करु नका. सगळया पोलीस खात्यावर अशा प्रकारचे बंधन असले पाहिजे की ज्यामुळे पोलीस खात्याबद्दल दरारा निर्माण होईल, पोलीस योग्य प्रकारे अधिकार वापरतील, गुन्हेगारांना पाठीशी घालणार नाहीत, जे घालतील त्यांच्यावर कारवाई होईल आणि हे सर्व करण्यासाठी राज्यातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .........

यासंदर्भात सभागृहातील सन्माननीय सदस्यांची मदत हवी असल्यास ती घ्यावी. आमदारांना विश्वासात घेतले जात नाही. आपापल्या मर्जीने सर्व गोष्टी केल्या जातात. शासनाला या गोष्टी करणे झेपणार नाही. मुंबईतील बिल्डरांना मदत केली जाते. परंतु झोपडपट्टीतील लोकांना मदत केली जात नाही.

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर मला एक तास बोलावयाचे होते. मुंबईतील आणि संपूर्ण महाराष्ट्रातील परिस्थिती मला सभागृहामध्ये मांडावयाची होती. परंतु वेळे अभावी मी एवढेच सांगेन की, पोलिसांना योग्य मार्गावर आणावे. पोलिसांना कोणता सिम्बॉल द्यावा हे महत्वाचे नाही. पोलिसांना आठवडयातून एक दिवस सुट्टी मिळेल याची व्यवस्था करावी. कारण पोलिसांना देखील संसार आहे. पोलिसांना श्वास घेण्याची संधी द्या. त्यांच्याकडून काम करुन घ्या. चांगले काम करणा-यांच्या पाठीवरुन प्रेमाचा हात फिरवा. मी माननीय श्री.आर.आर. पाटील यांची पूर्वीची भाषणे ऐकलेली आहेत. परंतु गृहमंत्री झाल्यानंतर त्यांच्या मनामध्ये काय आहे हे मला माहीत नाही. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील भाषणे चांगली करतात. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले" असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटलेले आहे. त्याप्रमाणे माननीय गृहमंत्र्यांनी वागावे. पोलिसांचे सहकार्य सर्वसामान्य माणसाला मिळाले पाहिजे. चोर, दरोडेखोर, पाकिस्तानी, बांगलादेशी लोकांना पोलिसांचे सहकार्य मिळावयास नको. पोलीस भ्रष्टाचारामध्ये अडकता कामा नये याची काळजी घ्यावी आणि त्या कसोटीला उतरावे, अशी मी विनंती करतो आणि माझे बोलणे थांबवितो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) UU-2

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 16:40

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, चाकण येथील मार्केट यार्डमध्ये भाषण करतांना माननीय मुख्यमंत्री जे बोलले त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केला. मी जिल्हा परिषदेच्या मुद्याची पुनरावृत्ती करणार नाही. राज्य कसे चालले आहे हे त्याचे उदाहरण आहे, असे उद्‌गार त्यांनी काढले. महाराष्ट्र राज्याची स्थापना झ ाल्यापासून कोणत्याही मुख्यमंत्र्याने मंत्रिमंडळातील आपल्या सहका-याच्या विरोधात असे उद्‌गार काढले नव्हते. दोन राजकीय पक्षांचे मंत्रिमंडळ असले तरी ते मंत्रिमंडळ घटनात्मक दृष्टया एकसंघ असते आणि मंत्रिमंडळाचे प्रमुख मुख्यमंत्री असतात. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, निवडणुका पोलिसांच्या बळावर काय जिंकता, निवडणुका कार्यकर्त्यांच्या बळावर जिंका. वास्तविक माननीय मुख्यमंत्र्यांनी असे बोलावे म्हणजे त्यांचा आपल्या सहका-यावर कंट्रोल नाही. त्यांनी स्वत: राजीनामा द्यावयास पाहिजे होता. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना असे विचारावयास पाहिजे होते की, तुम्ही असे उद्‌गार का काढता ? राज्याचे गृहमंत्री पद माननीय मुख्यमंत्र्यांकडे नसले तरी शेवटी राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री असतात. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आज पर्यंत आपण पाहिले तर आपल्या असे लक्षात येईल की, माननीय मुख्यमंत्री आपल्याच मंत्रिमंडळातील एका मंत्र्याबद्दल असे भाष्य करतात याबद्दल काय बोलावे ? त्याच दिवशी आम्ही असे सांगितले होते की, हे सत्य असेल तर त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाका आणि असत्य असेल तर तुम्ही अगतिक आहात तुमचा तुमच्या सहका-यांवर अंकुश नाही असे यावरुन दिसून येते. शिवसेनेचे नगरसेवक श्री.जामसंडेकर यांचा खून झाला. त्या घटनेची मी पुनरावृत्ती करीत नाही. वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी छापून आली होती की, ज्यांनी सुपारी दिली त्यांना पकडले. परंतु ज्यांनी प्रत्यक्ष गुन्हा केला त्यांना पकडले नाही. वारंवार प्रेस कॉन्फरन्समध्ये बोलतांना, खाजगीमध्ये बोलतांना, इलेक्ट्रॉनिक मिडीयासमोर बोलतांना किंवा पत्रकारांसमोर बोलतांना वरिष्ठ पोलीस अधिकारी असे म्हणतात की, खून करणा-यांची, गुन्हे करणा-यांची प्रवृत्ती बळावली आहे. पूर्वी पोलिसांना गुन्हेगार कोण आहे याबाबतची माहिती असायची. पोलिसांकडे गुन्हेगारांच्या हाताच्या ठशांची माहिती उपलब्ध असायची.

यानंतर कु.खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

या राज्यात गँगस्टर झाले, त्यांनी या राज्यात गुंडागर्दी केली, हाणामारी केली, दरोडे घातले, खंडणी गोळा केली परंतु नवी मुंबई येथे जे पोलिसांच्याच पाठीमध्ये सूरा खुपसून ठार मारण्याचे प्रकरण घडले तशा प्रकारचे धारिष्टय कोणी आजवर केले नव्हते पण आता हे सर्व कसे घडत आहे? याचे नेमके कारण आपण शोधून काढणार आहात की नाही ? कुठल्या प्रकारचे गुन्हे या राज्यात घडत आहेत ? कुठल्या प्रकारचे गुन्हेगार या राज्यात आलेले आहेत ? यासंदर्भात योग्य ती कारवाई लवकरच व्हावयास पाहिजे, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार या ठिकाणी जे बोलले ते बरोबर होते " राज्य आबादी आबाद चाललेले आहे. अशा प्रकारे राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यावर तुम्ही गुन्हा दाखल करणार आहात का ?

या राज्यात कोल्हापूर या जिल्हयात गेल्या वर्षी 365 दिवसांपैकी 221 दिवस मुंबई पोलीस कायद्यातील कलम 37 अन्वये जमाव बंदी कायदा लागू केला होता म्हणजे कोणीही मोर्चे काढावयाचे नाहीत, कोणीही अन्यायाविरुध्द बोलावयाचे नाही. भारतीय नागरिकाला राज्याच्या घटनेनुसार ज शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करण्याचे अधिकार दिलेले आहेत, त्यांचा वापर करावयाचा नाही. आंदोलने,निदर्शने करावयाची नाहीत, आपला राग व्यक्त करावयाचा नाही. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री बसलेले आहेत, त्यांना मी सांगू इच्छितो की, कोल्हापूरमध्ये गेल्या वर्षी 365 दिवसांपैकी 221 दिवस मुंबई पोलीस कायद्यातील कलम 37 अन्वये जमाव बंदी कायदा लागू होता. म्हणजे हातपाय बांधावयाचे, तोंडावर पट्टी बांधावयाची त्याला घरात बंद करुन ठेवावयाचे आणि या घरामध्ये शांतता चालू आहे असे वर लिहावयाचे अशा प्रकारे हे राज्य चालले आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला होता म्हणून मी त्याची पुनरावृत्ती न करता एक मुद्दा मांडू इच्छितो की, भिवंडी पोलीस स्टेशन का बांधले गेले नाही ? कोणाला खूष करण्यासाठी ते बांधले गेले नाही ? जमीन सरकारची आहे असे जर सांगितले गेले असेल तर त्या ठिकाणी त्याचा शोध घेतला असता, परंतु सभापती महोदय,या ठिकाणी कोणाचीही पर्वा न करता केवळ अल्पसंख्यांकांच्या मताची भीक मागण्यासाठी हे चालविले गेलेले आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये सुब्रमण्यम नावाच्या आय.पी.एस.अधिका-याचे गेले तीन महिने पोस्टींग झालेले नव्हते आणि आता त्यांचे पोस्टींग नागपूर येथे झालेले आहे. श्री.सुब्रमण्यम यांनी "मला नागपूरला जावयाचे नाही" असे सांगितले, हे तुमचे कायद्याचे राज्य चालू आहे ? नियमांचे राज्य चालू

V V-2....

श्री.मधुकर चव्हाण....

आहे ? सभापती महोदय, या ठिकाणी गृहमंत्र्यांनी अनेक वेळेला सभागृहामध्ये आम्ही यावर सी.आय.डी.एन्क्वायरी करु असे सांगितले होते परंतु अद्यापपावेतो या प्रकरणाची सी.आय.डी.एन्क्वायरी झालेली नाही.

एस.टी.मध्ये दोन कोटी रुपयांचा टायरचा भ्रष्टाचार झाला, तेथील एका आय.ए.एस.अधिका-याने तो घडवून आणला होता त्याच्या विरोधातही सी.आय.डी.एन्क्वायरी करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात सभापती महोदय आपण आणि सन्माननीय गृहमंत्र्यांनी दिले होते परंतु दोन वर्ष पूर्ण झाल्यानंतर देखील सी.आय.डी.एन्क्वायरी झालेली नाही. आता त्यातलाच एस.टी.मधील एक आय.ए.एस.अधिकारी दुसरीकडे जाऊन इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर जातीयवादी पोपटपंची करीत आहे, यातून तुम्ही कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात ?

जुहूमध्ये एस.आर.ए.योजनेमध्ये गृहनिर्माण खात्याने तर तेथील जे सिनेमा नट नटी आहेत त्यांनी स्वत:चे खोटे नाव नोंदविले हेही मानय केले, त्याची सी.आय.डी.एन्क्वायरी होईल, असे सभागृहात उत्तर देण्यात आले होते परंतु अद्यापही त्याची कोणत्याही प्रकारची एन्क्वायरी करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, पोलिसांच्या पगारामध्ये 800 रुपये वाढ करण्यात आली पंरतु त्यांचे घरभाडे 900 रुपये आकारण्यात येत आहे म्हणजे एखाद्याला 9,700 पगार असेल तर घरभाडे आकारल्यामुळे त्याचा पगार 9,600 केला असे होते. पोलिस भरतीमध्ये 1960 चे निकष लावण्यात येतात, ज्या वेळेला राज्याची स्थापना झाली त्या वेळेचे पोलिस भरतीचे निकष आता लावण्यात येत आहे. 1960 मध्ये मुंबईची लोकसंख्या 40 -42 लाख होती परंतु आता मुंबईची लोकसंख्या 1 कोटी 25 लाख इतकी आहे, हे सर्व तुमच्याच पापाचे फळ आहे.

**तालिका सभापती ( श्री. भास्कर जाधव )** : सदर प्रस्तावाची वेळ फक्त 4.48 वाजेपर्यंत होती, परंतु आता प्रस्ताव संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे, आपण दोन मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी दोन मिनिटात माझे भाषण पूर्ण करतो, खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून त्यांना महाराष्ट्रीयन माणून कधीही मिळत नाही, त्यांच्याजवळ ज्या बंदूकी असतात, त्यांचे परवाने खरे नसून सर्व खोटे

V V-3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

असतात, त्याबद्दल आपण काहीच का बोलत नाही, अथवा कारवाई करीत नाही ? आणि दुसरी गोष्ट अशी की, सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी उल्लेख केला की, " सज्जनांच्या रक्षणासाठी, दुर्जनांना शिक्षा करण्यासाठी आम्ही नवीन " सिम्बॉल " केलेला आहे.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ कु. खर्चे नंतर --- 16:50

श्री. मधुकर चव्हाण ....

त्यावेळी राज्याचे पोलीस महासंचालक श्री.पसरिचा यांना यासंबंधात वार्ताहरांनी विचारले असता त्यांनी सांगितले की, असा काही बदल झाल्याचे मला माहीत नाही. म्हणजे मुंबईचे पोलीस आयुक्तालय हे वेगळे आहे काय ? पोलीस दलाच्या मानचिन्हामध्ये काही बदल केला गेला पण त्याची माहिती महासंचालकांना नाही. मी तर म्हणेन की, पहिले जे चिन्ह होते, त्यात जे वाक्य होते तेच बरोबर आहे. आता त्याप्रमाणे 'सदैव तत्पर' कोण राहणार आहे ? आजही तुम्ही पोलिसांची जी भरती करीत आहात ती 1960 सालच्या निकषांवर करीत आहात, हे कितपत योग्य आहे ? शासनाने एक चांगले काम केले आहे, त्याबद्दल जरूर मी अभिनंदन करीन. मुंबईत आपण वायरलेस व्हॅन्स सुरू केल्या तसेच बीट मार्शल पद्धती सुरू केली. पण त्यांचा किती उपयोग होतो आहे, हे लोक खरोखरी व्यवस्थित काम करीत आहेत की नाही हे आपण पाहता का ? मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगेन की, तुम्ही एकदा गुप्तवेष करून पाहणी करा. दादर येथे रेल्वे स्टेशन जवळ जाऊन आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, तेथे जी वायरलेस व्हॅन उभी असते त्यामध्ये आपले पोलीस शिपाई पत्ते कुटत बसलेले असतात आणि जवळच्या फेरीवाले आणि हॉटेलांमधून खाणे-पिणे मागवित असतात. सभापती महोदय, मुंबईमध्ये देखील अनेक टॅक्सीज् विनापरवाना चालविल्या जात आहेत. याबाबत शासनाकडून दिलेल्या माहितीनुसारच मी सांगू इच्छितो की, दर 10-20 टॅक्सींमागे 9 टॅक्सी विनापरवाना चालविल्या जात आहेत. हे आपले कायद्याचे राज्य आहे काय ? इतकेच काय पण नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये तुमचे कायद्याचे राज्य कसे असते हे जनतेने पाहिलेले आहे, अनुभवलेले आहे. या निवडणुकांमध्ये आपण लोकांची गरीबी, अगतिकता विकत घेतली, त्यांचे दारिद्र्य विकत घेतले आणि फुले-आंबेडकरांचे नाव सातत्याने घेत राहिलात. सभापती महोदय, या विषयावर चर्चा होणार आहेच. पण राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत या सदनामध्ये केव्हा तरी दिवसभर चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. आता वेळ कमी असल्याने मी अधिक न बालता एक दोन उदाहरण देऊन माझे भाषण संपविणार आहे. सभापती महोदय, आर्थर रोड तुरूंगामध्ये शस्त्रास्त्रे कशी जातात ? जेलमध्ये खून होतात, त्यासाठी जेलच्या आत मध्ये धारदार शस्त्रे कशी काय जातात ? सिंहगडच्या पायथ्याशी गेल्या तीन-सहा महिन्यांपासून अनैतिक धंदे चालत होते. त्याबाबत आम्हाला संशय होता आणि त्याच्या मागावर मुंबईचे पोलीस होते. तेथे धाड

...... डब्ल्यूडब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

टाकण्यासाठी मुंबईचे पोलीस जात होते पण ते खंडाळा-लोणावळा परिसरात असतानाच त्यांना बातमी कळली की. पुणे ग्रामीण पोलिसांनी तेथे छापा टाकला आहे आणि त्यामुळे आपले मुंबईचे पोलीस खंडाळ्याहूनच परत आले. असे सारे असताना माझे राज्य कसे उत्तम चालले आहे असे आपण आग्रहाने सांगत आहात, ते कितपत योग्य आहे ? तमाशामध्ये ज्याप्रमाणे सोंगाड्या सांगतो की, महाराज राज्यामध्ये सगळे लोक सुखी आहेत, राज्यात सगळे भिक मागत आहेत, कोणी दु:खी नाही. अगदी उत्तम प्रकारे राज्य चालले आहे. त्याप्रमाणे आपले राज्य आज चालले आहे. तेव्हा आपल्या राज्यातील आजच्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थिती बाबत गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे एवढेच मी आपल्याला सांगतो. धन्यवाद.

***

..... डब्ल्यूडब्ल्यू 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत चांगल्या पद्धतीने काम करीत आहे अशा पद्धतीने मी सुरूवातीलाच माझे मत व्यक्त करीत आहे. खरे म्हणजे आता या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गडकरी उपस्थित असायला पाहिजे होते. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये म्हटले आहे की, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या विषयी मला खूप आदर आहे. पण तरीही मला त्यांच्या बाबत असे बोलावे लागत आहे याचे दुःख होत आहे. सभापती महोदय, या संदर्भात मला एक शेर आठवतो. मला शेरो-शायरी जमत नाही. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी नामदार श्री.आर.आर.पाटील यांच्या विषयी जे प्रेम दाखविले आहे त्या संदर्भात कॉलेजच्या काळातील एक शेर मला आठवतो, तो मी येथे आपल्याला सांगते. ..

" बहुत शोर सुनते थे, पहलू में दिल लेके,
जो चीरा तो कतरा-ए-खून न निकला "

अशा प्रकारचे प्रेम विरोधी पक्षाचे सत्तारूढ पक्षावर असावे, जे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी नामदार श्री.आर.आर.पाटील यांच्यावर केले आहे. ..

( यानंतर श्री. गागरे .... एक्सएक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

मला कॉलेजच्या जीवनामधील शेर आठवला तो मी सांगितला आहे. असेच प्रेम विरोधी पक्षाने आम्हाला दाखविले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे. साडे सात वर्षापूर्वी महाराष्ट्रात युतीचे राज्य होते. युतीच्या राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था ताळयावर आणण्याचे प्रयत्न करताना सत्ताधारी पक्षाला किती त्रास झाला आहे, याचा इतिहास महाराष्ट्राला माहिती आहे. आमच्या भगिनी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे सभागृहात उपस्थित आहेत, त्यावेळी त्या परळी येथे आल्या होत्या. महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध ठिकाणी डॉ.नीलम गोऱ्हे जातात. युतीच्या काळात महिलांवरील अत्याचारही वाढले होते, महिला असुरक्षित होत्या, अल्पसंख्यांक असुरक्षित होते. महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत युती शासनाच्या काळातील व आताच्या काळातील आकडेवारीची आपण तुलना केली तर आता गुन्हयांची संख्या कमी झालेली आहे अशी तफावत दिसून येत आहे. मागच्या साडेसात वर्षाच्या काळाच्या बाबतीत अजून एक बाब मला स्पष्ट करावयाची आहे. आताच्या दोन अडीच वर्षामध्ये देशाच्या व राज्याच्या राजकारणामध्ये अल्पसंख्यांक समाजात भितीचे वातावरण निर्माण व्हावे, असुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, अशी परिस्थती नाही. लोकशाहीमध्ये आपली मते व्यक्त करण्याचा मला अधिकार आहे. राजकारण व समाजकारणासंबंधी विचार व्यक्त करण्याचा मला अधिकार आहे. या देशातील काही चांगल्या घटना पाहिल्या तर हा आत्मविश्वास संपलेला दिसत नाही. परंतु बाबरी मस्जीद प्रकरण व गुजरातमधील दंगली यांचे पडसाद महाराष्ट्रात उमटले आहेत यामुळे महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक समाज घाबरलेल्या अवस्थेत आहे. लोकशाहीमध्ये जगण्याचा सर्वांना अधिकार आहे. मला सन्माननीय सदस्यांना अभिमानाने सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र शासन अत्यंत चांगला राज्य कारभार करीत आहे. महाराष्ट्रातील अविभाज्य घटक असलेल्या अल्पसंख्यांक समाजातील भितीची भावना दूर करणे, धर्मनिरपेक्षतेची भावना रुजविणे व त्याचे संरक्षण करण्यामध्ये महाराष्ट्र शासन यशस्वी झाले आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. महाराष्ट्रामध्ये धार्मिक दंगली, दोन्ही जाती धर्माच्या भावना दुखावणे, माणसांच्या धार्मिक भावना भडकावून राजकारणात

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/

श्रीमती उषाताई दराडे.....

लाभ उठविणे हया प्रवृत्ती आज फार मोठया प्रमाणात पुढे येत आहेत. माणूस विरोधी पक्षात असो किंवा सत्ताधारी पक्षात असो, टीका करीत असताना, स्वत:ची चूक असेल तर ती प्रामाणिकपणे मान्य करण्याची भूमिका असली पाहिजे. समोरच्या माणसाची चूक नसताना आपण त्याची चूक दाखवून देत आहोत, हे बरोबर नाही. हिवाळी अधिवेशनात मी पाहिले की, जे खैरलांजी प्रकरण घडले, त्यामुळे महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची मान शरमेने खाली गेली आहे. परंतु खैरलांजी प्रकरणाचा वापर ज्या पध्दतीने राजकारण करण्यासाठी केला गेला, ते कौतुकास्पद नाही. तसेच त्यावेळी महिलांवर अत्याचार झाले, अशा प्रकारचे चित्र सभागृहासमोर आले होते. या महिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या प्रेताचे पोस्टर काढून धिंडवडे काढण्यात आले. प्रेताची विटंबना करण्यात आली. राजकारण लाभापोटी केले जात असेल तर विरोधक म्हणून आपण त्यांच्यावर ॲटॅक करीत आहात. या घटनेचे कोणीही समर्थन करीत असेल तर आपण आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तेव्हा हया सभागृहात चर्चा करीत असताना कोणाचा अपमान होणार नाही, याची दखल घेणे या समाजाची जशी जबाबदारी आहे, तशीच या सभागृहाची जबाबदारी आहे. अजून काही बाबी मला सांगावयाच्या आहेत. जेव्हा आपण एखाद्यावर हल्ला करतो तेव्हा त्यांच्या चारित्र्याचा, आत्मसन्मानाचा सभागृहात अपमान होणार नाही, याची काळजी घेणे हे या समाजाचे व सभागृहाचे काम आहे. माझे म्हणणे असे आहे की, काही नवीन पध्दती काही वर्षापूर्वी युतीच्या राज्यामध्ये झाल्या आहेत. विविध कार्यालयात जाणे, मोडतोड करणे, अधिकाऱ्यांना मारणे, जहाल भाषण करणे इत्यादी गोष्टी घडत होत्या.

..... यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

लोकशाही संकेत पाळून आता या महाराष्ट्रातील सर्व निवडणुका अत्यंत शांततेने पार पडल्या आहेत, ही कायदा व सुव्यवस्था अस्तित्वात असल्याची नांदी आहे. या महाराष्ट्र सरकारने या राज्यामधील दलित, मागासवर्गीय, महिला, भटके, पददलित, विमुक्त अल्पसंख्यांकांचे हितसंबंध जपण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. म्हणून खुल्या वातावरणामध्ये विकासाची फळे हे महाराष्ट्र राज्य चाखत आहे, हे देखील सांगण्याची गरज नाही. आदिवासींच्या संदर्भात चांगला निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी आपण करीत आहोत. आणि म्हणून हे करीत असतांना...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्या चांगले मुद्दे उपस्थित करीत आहेत. सभागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर चर्चा सुरु असतांना आदिवासी, महिला यांच्या विकासाचे प्रश्न उपस्थित करण्याची गरज नाही. या विषयावर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या वेळी आपल्याला बोलता येईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, राज्यामध्ये खुले वातावरण असल्यामुळे आपण विकासाची फळे चाखत आहोत. आपण या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहात. सभागृहामध्ये विचार व्यक्त करीत असतांना माझ्याकडून काही चूक होत असेल तर आपण केलेल्या मार्गदर्शनाचा मी सन्मान करीन. महाराष्ट्रामध्ये विकासाची फळे चाखत असतांना लोकशाहीची मूल्ये जपली गेली नाहीत, एकमेकांचा आत्मसन्मान जपला गेला नाही, धार्मिक सहिष्णुता राखली गेली नाही, कौमी एकता राखली गेली नाही, आणि समाजामध्ये कायद्यावरील विश्वास शिल्लक राहिला नाहीतर आपण ही विकासाची फळे कशी चाखणार? कायद्यावरील विश्वास संपादन करण्यामध्ये हे महाराष्ट्र राज्य यशस्वी झाले आहे. आज याठिकाणी एक बाब चर्चेमध्ये आली. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हेगारांची नावे घेतली जातात त्या पध्दतीने काही लोकांची नावे याठिकाणी वाचली गेली. पुण्याच्या निवडणुकीच्या संदर्भात अमूक गुन्हा दाखल झाला आहे, तमूक गुन्हा दाखल झाला आहे, याची यादी याठिकाणी वाचून दाखविण्यास माझा विरोध नाही. परंतु कायद्यामध्ये कोणतीही गोष्ट गृहीत धरता येत नाही. त्याकरीता करेक्ट फॅक्ट समोर आली पाहिजे. माननीय आबांच्या प्रकरणासंदर्भात त्यांनी याठिकाणी खुलासा केला आहे. त्यानंतर ते प्रकरण डिफायनल झाले त्यासंबंधी याठिकाणी बोलले गेले त्याची देखील करेक्ट माहिती आली पाहिजे. गुन्हा किती तारखेला झाला, त्याचे पुढे काय झाले? त्याबाबत चौकशी झाली काय, इन्व्हेस्टिगेशन झाले काय,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

चार्जशीट दाखल झाली काय, चार्ज फ्रेम झाले काय, ट्रायल झाली काय, कन्विक्शन झाले काय, शिक्षा झाली की नाही, त्या गुन्हयाची स्टेज काय? याची चर्चा झाली. हे वरिष्ठांचे सभागृह आहे, याठिक्‍याणी महाराष्ट्रातील कोणत्याही एका नागरिकाच्या कृत्याविषयी, गुन्हयाविषयी चर्चा करीत असतांना कळत न कळात कुणाच्या विरुध्द अर्धवट माहिती पटलावर ठेवली तर त्या व्यक्तिच्या अधिकाराच्या हक्काचा भंग होईल अशाप्रकारची कोणतीही कृती होऊ नये . म्हणून ज्या ज्या नावांची चर्चा करीत असतांना माझी एकच विनंती आहे की, ज्यांच्याविरुद गुन्हा दाखल झाला आहे त्यांचे कुणीही समर्थन करणार नाही. जर एखाद्या व्यक्तिविरुध्द गुन्हा दाखल झाला असेल तर त्या बाबतीत पुढे काय झाले याची माहिती मिळणे सुध्दा फार महत्वाचे आहे. ती माहिती याठिकाणी उपलब्ध नसतांना प्रिज्युडाईस होऊन एखाद्यावर आरोप करुन चुकीचा पायंडा पाडला जाणार नाही यादृष्टीने आपण हे काम कॉंशस्ली केले पाहिजे.आबांचे प्रकरण डिफायनल झाले नसते आणि खुलासा आला नसता तर ते तसेच रेकॉर्डवर राहिले असते.

कायदा व सुव्यवस्था संभाळीत असतांना एखाद्या गोष्टीचा विशेष उल्लेख करण्याकरीता मी आपला फार वेळ घेणार नाही. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये सांगितले आहे की, आम्ही पोलीस यंत्रणेचे संगणकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राज्यात 12 हजार पेक्षा जास्त पोलिसांची भरती केली आहे. त्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेसाठी लागणारी यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ज्याठिकाणी नक्षलवादी आहेत त्यांना सन 2005 मध्ये आत्मसमर्पण करण्यासाठी एक प्रकल्प तयार करण्यात आला होता. त्या प्रकल्पाची मुदत ऑगस्टपर्यंत वाढवून दिली आहे. आतापर्यंत 137 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. महाराष्ट्रामध्ये गुन्हे घडत नाहीत असे मी म्हणणार नाही, याठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्तीचे कुणीही समर्थन करणार नाही. परंतु गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासन यशस्वी प्रयत्न करीत आहे. नक्षलवाद्यांच्या, अतिरेक्यांच्या कारवाया कमी करण्याचा महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आहे. महिलांवरील अत्याचार कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. भटक्या-विमुक्त, मागासवर्गीयांना खुल्या वातावरणामध्ये जगता येईल यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. महाराष्ट्रातील पुरोगामित्व टिकविण्यासाठी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार टिकविण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था टिकविण्यासाठी हे महाराष्ट्र सरकार यशस्वीपणे पुढे चालले आहे असे मी माझे विचार व्यक्त करुन माझे भाषण संपविते. -----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री.दिपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, विधानमंडळाच्या दुसऱ्या मजल्यावरील उपहारगृहामध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. याबाबत आपण लक्ष घालावे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्यांनी उपहारगृहामध्ये पाण्याची टंचाई असल्याचा उल्लेख केला, त्याचबरोबर बाथरुममध्येची पाणी नाही, या संदर्भात लक्ष घालावे.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

**पृ.शी** : राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती.

**मु.शी.** : राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, डॉ. दीपक सावंत, श्री. विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री मधुकर चव्हाण, अनिल परब, संजय केळकर, अरविंद सावंत, वि.प.स. यांचा प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरू.....

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, जिल्हापरिषदांच्या निवडणुकांच्या निमित्ताने आणि महानगरपालिकांच्या झालेल्या निवडणुकांच्या निमित्ताने महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सगळ्यांसमोर आलेली आहे. आजच्या या चर्चेच्या विषयामध्ये अनेक विषय जोडले गेलेले असले तरी महाराष्ट्र राज्य हे शांततेने चालणारे राज्य आहे. बहुतांशी पक्षामध्ये संघर्ष असला तरी ते मतभेदापुरतेच राहिलेले होते. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने परस्परांनी तलवारी काढून परस्परांवर हल्ले केले.

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

यामुळे पहिल्यांदाच महाराष्ट्र बिहारच्या वाटेवर जातो की काय ? अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याबाबत माननीय गृहमंत्री महोदयांना मी दोष देत नाही. पण या निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्षाने ज्या पध्दतीने सत्तेचा, दारुचा आणि दहशतवादाचा वापर गावागावामध्ये केला ती गोष्ट विसरून चालणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गट आणि गणांचा खर्च हजारो रुपयांमध्ये येत होता तो आता 25 लाखापर्यन्त गेलेला आहे. तरुण मुले उमेदवाराच्या प्रचाराची सुरुवात संध्याकाळी करत होते. त्यावेळेस ते तरुण दारुच्या नशेमध्ये झिंगलेले असतात आणि रात्री मारामारीला सुरुवात करतात. हे एका गावातील चित्र नाही तर ते महाराष्ट्रातील सगळीकडे असेच चित्र दिसून येते. सगळ्यात वाईट गोष्ट अशी आहे की, दारुचे गुत्ते त्यांच्याच पक्षातील कार्यकर्त्यांचे आहेत. तरुणांना निवडणुकीमध्ये आठ दिवस दारु प्यायला शिकवायचे आणि नंतर त्यांनी 360 दिवस दारु विकत घेण्यासाठी कर्ज काढायचे असा प्रकार आहे, ही गोष्ट माननीय गृहमंत्री महोदयांना न आवडणारी आहे, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पुण्यामधील घटना पाहिली तर विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा हात तोडण्याचा प्रकार घडला. ही लाजिरवाणी आणि घृणास्पद अशाप्रकारची बाब आहे. याबाबत सत्ताधारी पक्ष, माननीय गृहमंत्री काय तोडगा काढणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.कपिल पाटील (पुढे सुरु....

आहेत ? हा खरा प्रश्न आहे.  गृहमंत्री महोदयांचे चारित्र्य शुध्द आहे, याबाबत माझ्या मनात शंका नाही. परंतु गृहमंत्री महोदय ज्या पक्षाचे नेतृत्व करतात, त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सत्तेचा वापर केला गेला, यंत्रणा वापरली गेली, पैसा वापरला गेला, दहशतीचा वापर गेला केला, त्याला कसा आवर घालणार आहात ?  हा खरा प्रश्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये आचारसंहिता घालून घेणे आवश्यक आहे, बंधन घालणे आवश्यक आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

या प्रस्तावाच्या निमित्ताने भिवंडीचा उल्लेख वारंवार केला गेला. मला या निमित्ताने सांगावयाचे झाले तर ज्या पध्दतीने पोलीस चौकीचे प्रकरण चिघळण्यात आले, ते योग्य नाही. जमीन कब्रस्थानाची आहे ,असे अल्पसंख्यांक समुदायाचे म्हणणे आहे. पण ही जमीन सरकारच्या मालकीची आहे, असे सांगून त्या ठिकाणी पोलीस चौकी जबरदस्तीने बांधण्याचा प्रकार झाला, हा प्रकार घृणास्पद आहे.

श्री.मधुकर चव्हाण :  माननीय गृहमंत्री महोदयांनी सभागृहामध्येच प्रामाणिक सांगितलेले आहे की, ही जमीन सरकारची आहे. तरीसुध्दा वाद चिघळू नये,म्हणून पोलीस चौकीचे बांधकाम थांबविण्यात आले, असे असताना पोलिसांनी वाद चिघळविला असे सांगून सन्माननीय सदस्य अल्पसंख्यांकांना खुष करण्यासाठी बोलत आहेत काय ? माननीय गृहमंत्री महोदयांनी प्रामाणिकपणे ती सरकारची जमीन आहे असे सांगितलेले होते. असे असतांना सन्माननीय सदस्य अल्पसंख्यांकांना का चढवत आहेत ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : त्या ठिकाणी आमदार खासदारांच्या निधीतून निधी दिलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : आम्ही विरोधात नाही..

श्री. कपिल पाटील : चौकशीमध्ये वस्तुस्थिती समोर येईल.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो. गृह विभागाचा आणि पोलीस खात्याचा आजही आग्रह आहे आणि असे म्हणणे आहे की, ही जमीन गृह विभागाची आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील म्हणतात त्यामध्येही तथ्य आहे की, वक्फ बोर्डाने ही आमची जमीन आहे असा निर्णय दिला आहे. त्यावरील अंतिम निर्णय आम्ही त्यांच्याकडून प्राप्त करुन घेत आहोत. त्याचबरोबर ही जमीन आमची असल्याचा आम्ही दावा केला आहे.

श्री. कपिल पाटील : या वादग्रस्त मुद्याबाबत अंतिम निकाल लागेपर्यंत आपण या सर्वोच्च सभागृहामध्ये परस्पर निर्णय घेतला तर चुकीचे संकेत देण्यासारखे होईल. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. त्यांनी वस्तुस्थिती मान्य केली. चौकशीमध्ये जे काही निष्पन्न होईल ते करण्यास काहीही हरकत नाही. त्याला आडकाठी करण्याचे कारण नाही. परंतु दहशतीने कोणतीही गोष्ट होऊ नये याबाबतीत सतर्क राहिले पाहिजे. यामध्ये कोणाचेही लांगूलचालन करण्याचा किंवा अनुनय करण्याचा प्रश्न नाही. या ठिकाणी सर्व सारखे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आक्षेप घेतला. त्यांनी माझ्याबद्दल आक्षेप घेतला याबद्दल मला दु:ख झाले.

श्री. मधुकर चव्हाण : मी सन्माननीय सदस्यांबद्दल आक्षेप घेतला नाही. अल्पसंख्यांकांवर अन्याय करीत आहोत असा सन्माननीय सदस्यांच्या बोलण्याचा रोख आहे. सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपणही त्या ठिकाणी पैसे दिले. आम्ही एखाद्या बालवाडीला पाच लाख रुपये दिले तर दोन दोन वर्षे त्याची फाईल क्लिअर होत नाही. ती जमीन कोणाची आहे वगैरे सर्व पाहिले जाते. जमिनीच्या बाबतीत खात्री पटली म्हणूनच आपण उद्‌घाटन केले. राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून वक्फ बोर्डाला संधी दिली हा राज्याचा मोठेपणा आहे. उद्या ते म्हणतील की, औरंगजेबाने, मोगलांनी तुमच्यावर 350 वर्षे राज्य केले म्हणून हा देश आमचा आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. कपिल पाटील : या देशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा हा देश आहे. त्यामुळे अशा पध्दतीचे भाष्य या सभागृहात होणे अतिशय चुकीचे आहे. भिवंडीच्या संदर्भातील प्रकरण झ ााल्यानंतर ज्या पध्दतीने तडीपारीच्या नोटिसा काढल्या गेल्या त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, जे अपराधी असतील त्यांना जरुर शिक्षा द्यावी पंरतु जे निरपराध आहेत त्यांना तडीपार करणे, त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करणे आक्षेपार्ह आहे. मी अनेक प्रकरणे माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे दिलेली आहेत. पुन्हा मी त्या तपशिलामध्ये जात नाही. याकडे शासनाने लक्ष द्यावे. आता निवडणुका संपलेल्या आहेत. जे निरपराध लोक आहेत त्यांना न्याय मिळावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. हे केले नाही तर दोन समाजामध्ये दुरावा वाढतो, कटुता वाढते. त्यातून पुढे संघर्ष जन्माला येत असतो.

सभापती महोदय, या निवडणुकीच्या निमित्ताने झालेला हिंसाचार तसेच माफियांनी कायदा व सुव्यवस्था आपल्या ताब्यात घेतल्याची परिस्थिती पाहिली तर याबाबत अतिशय गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. या राज्यातील लोकप्रतिनिधींना सुध्दा स्वतंत्रपणे वावरता येत नाही, फिरता येत नाही अशी स्थिती आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्यासंदर्भात उदाहरण दिले. राज्यातील मंत्र्यांची ही स्थिती असेल तर इतराची काय स्थिती असेल ? मिरा-भाईंदरच्या महिला महापौरांना तेथील स्थानिक माफिया, गुंड उघडपणे धमक्या देतात. त्या ठिकाणी दहशत माजवितात. त्या महिला प्रतिनिधींना आपण कोणतेही संरक्षण देऊ शकत नाही. त्यांना सांगण्यात आले की, उद्या राजीनामा द्या नाही तर संरक्षण काढले जाईल. असे म्हणणारे जे लोक आहेत त्यांना धडा शिकविला पाहिजे. मला आपल्याबद्दल शंका नाही. त्यांना संरक्षण देण्याची आपली भूमिका आहे. त्या शहरातील माफियांनी तेथील संपूर्ण राजकारण ताब्यात घेतलेले आहे.

यानंतर श्री. शिगम ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 17:15

(श्री. कपिल पाटील...)

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी तडिपारीचे उदाहरण दिले. माननीय गृहमंत्र्यांनी त्यांना कधीही मदत केलेली नाही आणि तशी मदत ते कधी करणार नाहीत याची मला खात्री आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अशा लोकांना संरक्षण देऊ नये, त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. आज या लोकांना त्यांची जागा दाखविली नाही तर लोकप्रतिनिधींना काम करणे कठीण होईल. आज एक स्त्री माफियांशी संघर्ष करीत आहे, तिला संरक्षण मिळाले पाहिजे. शिवाजी महाराजांच्या काळामध्ये एका पाटलाने गुन्हा केला त्यावेळी त्याचे दोन्ही हात छाटले होते. आता हात छाटण्याची शिक्षा राहिलेली नाही. अशा माफियांना वेळीच जरब दाखविली नाही तर उद्या ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सुध्दा दम भरायला लागतील. या माफियांना आपण आवरणार की नाही ? एवढाच माझा प्रश्न आहे...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला विधानसभेमध्ये याच विषयाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी जायचे आहे.या सदनामध्ये कॅबिनेट मंत्री नाही म्हणून सदनाची बैठक तहकूब केली होती. विधानसभेमध्ये देखील माझीच उपस्थिती पाहिजे असा आग्रह धरल्यामुळे त्याही सदनाची बैठक तहकूब केली होती. एखाद्या विषयावर एकाच वेळी दोन्ही सभागृहामध्ये चर्चा असेल तर दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करण्याची भूमिका घेतली पाहिजे.

**उपसभापती** : अजून 8-10 वक्ते बोलणार आहेत. तेव्हा माननीय गृहमंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना येथे बोलावून त्यांना मुद्दे घेण्यास सांगावे. वक्त्यांची भाषणे लांबली तर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण उद्या होईल.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी नांदेडची घटना सांगितली. मला एवढेच सांगायचे आहे की, मालेगावची घटना, मुंबईची घटना, नांदेडची घटना, नागपूरची घटना, या घटनांमध्ये पोलीस फरक करणार आहेत काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 17:20

श्री.कपिल पाटील.........

अतिरेकी हे अतिरेकीच असतात आणि अतिरेकी घटना या अतिरेकीच घटना असतात. त्यामध्ये फरक होता कामा नये. दुर्दैवाने ते झालेले आहे. हा फरक पुढच्या काळात राहू नये. सभापती महोदय, नागपूर आणि नांदेड येथील प्रकरणांमध्ये योग्य पध्दतीने चौकशी झालेली नाही. ही प्रकरणे सीबीआयकडे देऊ नयेत. उठसूठ सीबीआयकडे प्रकरणे सोपविणे चुकीचे आहे. तुमच्याकडे जाब तरी विचारता येईल, त्यांना काय विचारणार? या सगळया प्रकरणांबाबत तपास घेण्यामध्येच फरक केला जातो. त्यात गडबड होते म्हणून संशय निर्माण होतो. याबाबत पोलिसांची स्वतंत्र बैठक घेऊन शोध घेतला पाहिजे. काहींना संरक्षण देऊन काहींना टार्गेट करणे हा फरक दूर केला पाहिजे. पुणे आणि नाशिकमध्ये जे घडले म्हणून अगोदरपासून तयारी केली ही गोष्ट वेगळी आहे. हा फरक होता कामा नये एवढीच विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, बऱ्याच मुद्यांवर ऊहापोह झाला आहे. जे मुद्दे चर्चेत आले नाहीत अशाच दोन-तीन महत्वाच्या मुद्यांकडे मी मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधणार आहे. मघाशी बसून बोलत होते म्हणून ते मुद्दे समोर आले नाहीत. खरोखर एक खंत मांडावीशी वाटते ती म्हणजे कायदा व सुव्यवस्थेसंबंधी विधानसभेत आणि विधानपरिषदेत यापूर्वी चर्चा झालेल्या आहेत. बऱ्याचदा असे चित्र दिसते की, चर्चेला जे उत्तर विधानासभा सभागृहात दिले जाते त्याला प्रसिध्दी मिळते. परंतु बहुतेक वेळेला परिषदेत दिलेल्या उत्तराला प्रसिध्दी मिळत नाही. सभापती महोदय, या संदर्भात मंत्रीमहोदय काही करु शकत नाहीत असे नाही. आमची अपेक्षा असते की, जे मुद्दे या सभागृहात मांडलेले असतात ते मुद्दे समाजाच्या दृष्टीने महत्वाचे असतात. त्यामध्ये एखाद्या वेळी लोकसंख्येचा किती आधार आहे याबद्दल चर्चा होऊ शकते.

**उपसभापती** : ज्यावेळी सभागृहामध्ये प्रस्तावासंबंधी चर्चा घेण्यात येते त्यावेळी अशा चर्चेसंबंधी पक्षनिहाय वेळ ठरवून दिली जाईल आणि ती वेळ सगळया पक्षांना बंधनकारक राहील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या चार वर्षात कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा झालेलीच नाही, त्यामुळे सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वेगवेगळया राजकारणामध्ये असणाऱ्या खास करुन शिवसैनिकांपैकी काही जणांचा खून झाला. अशा प्रकरणांची तपासणी आणि ज्या प्रकरणांमध्ये कोर्टासमोर साक्षीपुरावे नोंदले जातात त्यामध्ये पुरेशी दक्षता घेतली नसावी काय अशी परिस्थिती आहे. उदाहरणार्थ सोलापूर जिल्हयामध्ये मोहोळ या ठिकाणी पंडित देशमुख यांचा खून झाला. या प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष सुटले. या प्रकरणातील चौकशी अधिकारी सध्या पिंपरी-चिंचवड येथे कार्यरत आहे. त्यांच्या बाबतीत अनेक लोकांची तक्रार आहे. अधिकाऱ्यांविरुध्द वैयक्तिक बोलणे मला आवडत नाही. श्री.गोविंद पवार या अधिकाऱ्याचा उल्लेख झाला, सध्या हा अधिकारी पिंपरी-चिंचवड येथे कार्यरत आहे. हाच अधिकारी ज्यावेळी नगर जिल्हयात होता त्यावेळी दुसऱ्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन महिला कॉन्स्टेबलला बरोबर येण्यासाठी त्याने पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार केला होता. नगर जिल्हयामधून पिंपरी-चिंचवड येथे त्याची बदली करण्यात आली. त्याच्यात काय गुण पाहिले? अशा प्रकारचे चौकशी अधिकारी पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली याच जिल्हयात बदलीने फिरत असतात. डाके बंधूंचा खून झाला त्या प्रकरणातील सर्व

...3...





डॉ.नीलम गोऱ्हे............

आरोपी सुटले. अडीच-तीन वर्षे केस चालू होती. या प्रकरणामध्ये सुध्दा आरोपी निर्दोष सुटले. कशा पध्दतीने चौकशी झाली? सरकार अपिलात का गेले नाही? सरकारी वकिलांवर टीका करणे योग्य नाही. परंतु ते किती तयारी करुन कोर्टासमोर उभे होते याची देखील तपासणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात निगराणी करणार नसाल तर राजकीय खटल्यांमध्ये न्याय मिळणार नाही ही वस्तुस्थिती दिसून येते.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

सभापती महोदय, रमेश गोवेकरांचा अजून देखील तपास लागलेला नाही. नगरसेवक जामसंडेकर यांच्या गुन्हयाच्या संदर्भातही अजून काहीही तपास लागलेला नाही. आमच्या कार्यकर्त्यांच्या ज्या हत्या होत आहेत त्याकडे पोलीस खाते जाणून-बुजून दुर्लक्ष करीत आहे की काय अशी शंका आम्हाला येत आहे. अशा घटनांमध्ये जे लोक निर्दोष सुटले जातात अशा प्रकरणांचा तपास बरोबर केलेला आहे की नाही ? साक्षी पुरावे बरोबर नोंदविले गेले आहेत की, नाहीत हे पाहिले पाहिजे. 31 डिसेंबर, 2006 रोजी गेटवे ऑफ इंडियावर जी घटना घडली त्यामुळे संपूर्ण मुंबईच नव्हेतर संपूर्ण जग हादरले. या ठिकाणी एका परदेशी महिलेचा विनयभंग करुन तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. सुरुवातीला असा काही प्रकार झालेलाच नाही असे चित्र पोलीस खात्याकडून तयार करण्यात आले परंतु या घटनेच्या संदर्भात जेव्हा टी.व्ही.न्यूजवर या घटनेच्या संदर्भातील छायाचित्र दाखविली गेली तेव्हा मुंबई पोलीस कमिशनरांनी सांगितले की, आम्ही या प्रकरणाच्या संदर्भात काही मोबाईल्स जप्त केलेले आहेत. परंतु या प्रकरणाचे पुढे काय झाले त्याची काहीही माहिती मिळालेली नाही. ही घटना जेव्हा घडली तेव्हा त्या घटनेच्या काही अंतरावर मुंबईचे पोलीस आयुक्त उपस्थित होते. आता महिलांना संरक्षणाचे प्रश्न भेडसावू लागले आहेत. निगडी येथे महिलांनी तक्रार केली होती हद्दीचा वाद त्या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. बलात्कार होऊन 48 तास उलटून गेले तरी त्याची नोंद हद्दीच्या प्रश्नामुळे घेण्यात आली नाही. महिलांच्या घटनेच्या संदर्भात मी माननीय गृहमंत्र्यांना दरवेळेस 5-6 निवेदन देत असते या निवेदनांची उत्तरेही मला मिळत असतात. परंतु प्रत्येक ठिकाणी घटना घडल्यानंतर त्यासंदर्भात आम्ही निवेदन दिलेच पाहिजे का? अशा घटनांच्या संदर्भात पोलिसांनी काहीच काम करावयाचे नाही काय? महिलांच्या तक्रारीमध्ये हद्दीचा वाद कधीही उपस्थित होता कामा नये. राष्ट्रीय आयोग, मानवी आयोग, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा महिलांच्या तक्रारीच्या संदर्भातील हद्दीचा वाद होता कामा नये असे सांगितलेले आहे असे असतांनाही हे प्रकार पुन्हा पुन्हा होत आहेत त्यामुळे यासंदर्भात ठोस अशी भूमिका घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, स्टार न्युजने पुण्यातील ठाकर समाच्या एका मुलीच्या संदर्भातील न्युज दिली होती. या मुलीला भोपाळ येथे पळवून नेण्यात आले होते परंतु ही मुलगी सुटका करुन पुणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

डॉ. नीलम गो-हे....

येथे आली. या मुलीचे नाव पिटंबाई होते. ही बातमी दाखविण्यात आल्यानंतर त्या ठिकाणच्या पोलीस कमिशनरानी उलट स्टार न्युजवर चॅनलला आणि संबंधितांवर लोकांना भडकवल्याचे आरोप ठेवण्यात आले यापुढे असे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, औंढा नागनाथ येथे दारुचे दुकान बंद करण्याच्या संदर्भात तक्रार केली होती. महिलांनी दारुचे दुकान बंद करण्याच्या संदर्भात मागणी केली तर मतदान घेऊन दारुचे दुकान बंद केले जाईल यासंदर्भातील आश्वासन सभागृहात तसेच सांगली येथे दिले होते. परंतु असे आश्वासन देऊन सुध्दा महिलांनी दारुची दुकाने बंद करण्याची मागणी केली तरी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. यासंदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. परंतु पोलीस खाते म्हणते की, यासंदर्भातील प्रकरणाची माहिती आम्हाला द्या. सभापती महोदय, आम्ही काय सत्तेमध्ये आहोत? आमच्याकडे काय गृहखाते आहे. पोलीस खात्याने यासंदर्भातील माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. सर्व घटनांची माहिती आम्ही आपल्याला देऊ शकत नाही. सांगली जिल्हयातील श्रीमती मोरे यांनी सुध्दा यासंदर्भात लिस्ट दिली होती परंतु त्यासंदर्भात सुध्दा काहीही कार्यवाही इ ाालेली नाही. महिलांवर आता मोठया प्रमाणात अत्याचार होत आहेत. एका घटनेत तर दिराने भावजईच्या एका तीन वर्षाच्या मुलाला जमिनीवर आपटून ठार मारले आहे. अशा घटनांच्या संदर्भात शासन आणि पालीस विभागाने जनतेच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची शासनाने दखल घेतली पाहिजे परंतु प्रत्येक वेळी आम्ही यासंदर्भात माहिती देत असतांना सुध्दा अशा घटनांना आळा बसला आहे असे आम्हाला तरी दिसत नाही. महिलांना जास्तीत जास्त आणि चांगल्या प्रकारचे संरक्षण मिळण्याची आवश्यकता आहे. रेवदांडा येथे मच्छिमार महिलांवर अमानुष लाठीमार करण्यात आल्याच्या संदर्भात या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी निवेदन दिलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...........

महिलांच्या मोर्चाला सामोरे जाण्यासाठी पोलिसांची कोणती कार्यपध्दती आहे,कोणते निकष आहेत त्यांसंबंधीची भूमिका येथे स्पष्ट झाली पाहिजे. कोठेवाडी येथील दरोडा आणि त्यावेळी महिलावंर झालेले अत्याचार अशाप्रकारच्या घटना राज्यात आजही घडत आहेत. कोठेवाडी प्रकरणी चार-पाच वर्षानंतर न्याय मिळाला. दोन वर्षापूर्वी जामखेड येथे दरोडा पडला, त्यामध्ये महिलांना देखील मारहाण झाली, काही महिला त्यामध्ये मृत्युमुखी पडल्या. नगर, बीड,नाशिक, औरंगाबाद, वैजापूर याठिकाणी अजूनही अशाप्रकारच्या घटना घडत आहेत. लोकांना मारहाण होत आहे, त्यामध्ये काही जणांचा मृत्यू होत आहे. दरोडेखोरीला आळा बसण्यासाठी दरोडा विरुध्द पथक स्थापन करण्यात आले. असे असताना देखील मोठ्या प्रमाणावर दरोडे पडत आहेत. या संदर्भात नेहमीच आकडेवारी सांगितली जाते. डिसेंबर महिन्यात मानननीय उपमुख्यमंत्र्यांनी सी.आय.डी.क्राईमने काढलेल्या एका पुस्तकाचे प्रकाशन केले. त्यामध्ये सर्व आकडेवारी आलेली आहे. परंतु आकडेवारीमध्ये न जाता प्रत्यक्षात किती टक्के लोकांना न्याय मिळतो हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, आता मुंबईच्या पोलीस आयुक्त पदी एका मराठी व्यक्तीची नियुक्ती झालेली आहे. अगोदरचे पोलीस आयुक्त हे पेज-थ्री कल्चरचे होते, असे चित्र निर्माण झाले होते. अनेक पंचतारांकित हॉटेल्समधील पार्ट्यांना पोलीस आयुक्त हजर असत. आताच्या पोलीस आयुक्तांकडून चांगल्या कारभाराची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, जत तालुक्यातील महिलांनी दारुबंदीसाठी आंदोलन केले. त्यांना तेथे प्रबोधन हवे आहे. त्यांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला की, "आम्ही मुस्लिमांचा विश्वास संपादन करण्यात यश मिळविले आहे." केवळ निवडणुकी पुरता आपण अशी विधाने करायला लागलो तर ते चुकीचे आहे.

सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षकाच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी आम्हाला सांगितले होते की, जूनपर्यंत बदली करु, परंतु अजूनपर्यंत त्यांची बदली झालेली नाही, त्याबाबत केव्हा कार्यवाही करण्यात येणार आहे त्याचे उत्तर त्यांनी आपल्या भाषणात द्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी.** : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक 15 मार्च, 2007 रोजी दुपारी 3.30 वाजता भरलेल्या बैठकीत शुक्रवार, दिनांक 16 मार्च,2007 ते शुक्रवार, दिनांक 30 मार्च,2007 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**<u>मार्च, 2007</u>**

| | |
|---|---|
| शुक्रवार, दिनांक 16 | : 1) राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)<br>2) अशासकीय कामकाज (विधेयके-गत सत्रातील प्रलंबित) |
| शनिवार, दिनांक 17 | : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) |
| रविवार, दिनांक 18 | : सुट्टी |
| सोमवार, दिनांक 19 | : सुट्टी (गुढीपाडवा) |
| मंगळवार, दिनांक 20 | : बैठक होणार नाही. |
| बुधवार, दिनांक 21 | : बैठक होणार नाही. |
| गुरुवार, दिनांक 22 | : सन 2007-2008 चा अर्थसंकल्प सादर करणे (दुपारी 2.00 वाजता) |
| शुक्रवार, दिनांक 23 | : 1) सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)<br>2) कोकणासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा.<br>3) अशासकीय कामकाज (ठराव) |
| शनिवार, दिनांक 24 | : 1) सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)<br>2) पुरवणी विनियोजन विधेयक. |

==3==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील..........

| | | |
|---|---|---|
| रविवार, दिनांक 25 | : | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 26 | : | अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस) |
| मंगळवार, दिनांक 27 | : | सुट्टी (रामनवमी) |
| बुधवार, दिनांक 28 | : | अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) |
| गुरुवार, दिनांक 29 | | 1) शासकीय विधेयके |
| | | 2) लेखानुदान विनियोजन विधेयक |
| | | 3) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| शुक्रवार, दिनांक 30 | : | अशासकीय कामकाज (विधेयके) |
| शनिवार, दिनांक 31 | : | सुट्टी ( महावीर जयंती ) |

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------------

यानंतर श्री.रोझेकर.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती

**मु.शी.**: राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत, श्री.विनोद तावडे, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, अनिल परब, संजय केळकर, अरविंद सावंत, वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु............

**उपसभापती** : मला सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, त्यांनी केवळ महत्वाचे मुद्दे मांडावेत, सविस्तर भाषण करु नये.

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी मुद्दे मांडतो आणि गुद्दे देतो, लांबलचक भाषण करीत नाही. गृह खात्याची भूमिका अशी आहे की,

"कहूँ तो माँ मर जाए, न कहूँ तो बाप कुत्ता खाए"

सभापति महोदय, एक आदमी बाजार से मटन लेकर आया और उसने अपनी पत्नी से कहा कि इसको पकाकर रखना, मैं थोड़ी देर में आता हूँ. वह मटन लेकर कुत्ता भाग गया और 3 साल की बच्ची यह देख रही थी. बच्ची की माँ ने पूछा कि मटन कहां है तो बच्ची ने कहा मटन तो कुत्ता ले गया. माँ ने कुत्ते को काटा और उसका मटन बनाकर अपने पति के सामने थाली में रख दिया. लड़की ने कहा कि पिताजी खाना मत खाओ. पिता ने पूछा कि क्या बात है, मुझे तो भूख लगी है. उस लड़की ने विचार किया कि मैंने अगर सच बात बता दी तो मेरी मॉ को मार पड़ेगी, इसलिए उसने कहा "कहूँ तो माँ मर जाए, न कहूँ तो बाप कुत्ता खाए". अशी या खात्याची परिस्थिती आहे. अनेकदा गुन्हा घडल्यानंतर आणि पोलिसांनी आरोपींना पकडल्यानंतर नेत्यांचा फोन जातो. नगरसेवक, खासदार, आमदार, स्थानिक लोकप्रतिनिधी फोन करतात व त्यामुळे पोलिसांमध्ये शैथिल्य येते. कोणे एकेकाळी मुंबई पोलिसांची अशी ख्याती होती की, त्यांची तुलना स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांबरोबर होत असे. मुंबई पोलीस विभाग एवढा कर्तबगार होता, पण अलिकडे ही कर्तबगारी राहिलेली नाही, असे दिसून येते. त्याचे कारण असे आहे की, सट्टा व्यवहार बंद झाला असला तरी दारुची दुकाने मोठया प्रमाणावर उघडली गेली आहेत. ज्यांना 50

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे पुढे सुरु............

वर्षापूर्वी दारुचा परवाना दिला त्यांच्याकडे आज करोडो रुपये जमा झाले आहेत. महापालिका, जिल्हा परिषदा, लोकसभा, विधानसभा निवडणुका आल्या की, या दारुच्या धंद्यातील पैसा वापरला जातो. तसेच, ज्या लोकांना शिक्षण संस्था दिल्या आहेत त्यांच्याकडे देखील अमाप पैसा जमा झालेला आहे आणि हा पैसा देखील निवडणुकांमध्येच खर्च होतो. साखर कारखाने, उद्योग, लघुउद्योग यांना सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स लागतो, पण या दारु व्यावसायिकांना किंवा शिक्षण संस्था चालकांना कोणताही टॅक्स भरावा लागत नाही. त्यांच्याजवळ किती माया जमा झालेली आहे, याचे मोजमाप होत नाही. फुले, आंबेडकर, गांधी यांच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. त्यांचा संदर्भ या ठिकाणी मी देणार नाही. आज मुंबईतील कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे. ज्यांना दारुचे लायसन्स दिले त्यांच्या चवथ्या पिढीकडे देखील तेच लायसन्स आहे. हे लायसन्स खरे पाहता रद्द केले पाहिजे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 17:40

श्री.रमेश निकोसे .........

अन्यथा दारुची दुकाने उघडावयाची असतील तर ती किराणा दुकानामध्ये देखील उघडावीत आणि त्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन ठेवू नये. दारुची विक्री करुन जे करोडपती झालेले आहेत त्यांची मक्तेदारी थांबली पाहिजे.

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अतिशय चांगले मुद्दे मांडले. मी केवळ विरोधासाठी विरोध करीत नाही. काही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृहमंत्री महोदयांच्या नावाचा उल्लेख केला. निवडणुकीसाठी नवरा उभा असेल, बायको उभी असेल, भाऊ उभा असेल किंवा बहिण उभी असली तरी ते आपापल्या पक्षाची बाजू मांडत असतात. माननीय मुख्यमंत्री निवडणुकीमध्ये जे बोलले त्याचा संदर्भ माननीय गृहमंत्री महोदयांशी जोडणे योग्य होणार नाही, असे मला वाटते. पिंपरी-चिंचवड, पुणे, नांदेड किंवा इतर महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराने चाकू, भाला, तलवार काढून कोणाचाही खून केला असेल तर त्याला शिक्षा झाली पाहिजे. मुंबईमध्ये एका नगरसेवकाचा खून करण्यात आला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना किंवा अन्य कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराने गुन्हा केला असेल तर गृह खात्याने त्याची पर्वा करता कामा नये, अशी मी विनंती करतो. ज्यावेळी खैरलांजी प्रकरण घडले त्यावेळी खैरलांजीला जाण्यासाठी मी पोलीस संरक्षण मागितले होते. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मला पोलीस संरक्षण देण्यास सांगितले. परंतु मला पोलीस संरक्षण देण्यात आले नाही. तरीही मी खैरलांजीला गेलो होतो. महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. हजारो रुपयांचे वाटप झालेले आहे. एखादा गरीब माणूस किंवा चांगला कार्यकर्ता कधीच निवडून येऊ शकत नाही. कारण दारुवाले आणि शिक्षण संस्थावाले आपल्या मर्जीतील उमेदवार निवडून आणण्यासाठी पैसे खर्च करीत असतात आणि निवडणुकीस उभा असलेला उमेदवार त्यांच्या मर्जीतील नसेल तर त्या उमेदवाराला पाडण्यासाठी देखील पैसे खर्च करीत असतात. म्हणजे दोन्ही बाजूने दारुवाल्यांचे आणि शिक्षण संस्थावाल्यांचे पैसे खर्च होत आहेत, याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. दुसरे असे की, श्रीमती काळमांडे नावाची दलित महिला काटोलमधून निवडणुकीस उभी राहिली होती. त्यावेळी मी पिंपळगावमध्ये गेलो होते.

. . . 3G 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे .........

वहां पर 2-4 बच्चे लोग दारु पीकर आ गए और उसके भाषण के अन्दर दखल देने की कोशिश करने लगे. वहां पर 2-3 हजार लोगों की सभा थी फिर भी पुलिस वहां पर उपस्थित नहीं थी. मैंने कहा कि पुलिस हो तो उसको बुलाओ. वहां पर पुलिस थी ही नहीं. तब मैंने माइक अपने हाथ में लिया और कहा कि मैंने बहुत से दारु पीने वाले देखे हैं, मैं खुद तलवार चलाता हूॅं और सभा में कोई गड़बड़ी बर्दाश्त नहीं कर सकता हूॅं. इस प्रकार से दम देने पर वे लोग भाग गए. चाहे नगरपरिषद के चुनाव हों, चाहे ग्राम पंचायत के चुनाव हों, गांव में चुनाव होने पर दारु बहुत ज्यादा चलती है. मैं गृह खाते से विनंती करता हूॅं कि जहां पर भी सभा होती है, वहां पर पुलिस का इन्तजाम होना बहुत जरुरी है. इन हालात के ऊपर मैं आपके सामने एक शेर पढ़ना चाहता हूॅं :

"जिन्हें हम हार समझे थे, गला अपना सजाने को,
वही अब नाग बन बैठे हमें ही काट खाने को."

सभापति महोदय, पुलिस विभाग के अधिकारी और कर्मचारी लोगों से पैसे खाते हैं, उनसे हफ्ता वसूल करते हैं. ऐसे लोगों को सजा देनी चाहिए, इतना कहते हुए मैं अपने दो शब्द पूरे करता हूॅं. धन्यवाद.

. . . . . . .

भाषण पूर्ण. नंतर श्री भास्कर जाधव यांचे मराठी भाषण.

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( रायगड -रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये महानगरपालिका,जिल्हापरिषद,पंचायत समिती मध्ये झालेल्या निवडणूकीसंदर्भातील जास्तीत जास्त विषय आहे. या सर्वांचा आशय जर पाहिला तर आपल्याला हे दिसून येईल या सभागृहाचे ज्येष्ठ नेते आदरणीय दादा साहेब सरपोतदार यांनी स्पष्टपणे कबूल केले आणि सांगितले की, हा संपूर्ण प्रस्ताव या राज्याच्या कायद्याच्या आणि सुव्यवस्थेशी संबंधित असला तरी देखील हा प्रस्ताव आणण्यापाठीमागचा आमचा हेतू हा या राज्याचे गृहमंत्री आणि तासगावच्या घटनेसंदर्भात होता.

या प्रस्तावाच्या निमित्ताने महाराष्ट्राला न्याय मिळावा व कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून राज्य अग्रक्रमावर राहिले पाहिजे याकरिता या राज्याचे गृहमंत्री प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत त्यांना आपण नागरिक म्हणून मदत करावी, हा सद्हेतू तर बाजूलाच राहिला असे म्हटले तरी ते वावगे होणार नाही. गेली वर्ष सहा महिने मी पाहत आहे की, या राज्याच्या आदरणीय गृहमंत्र्यांना सर्व जण चारही बाजूने घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत. गृहमंत्र्यांनी या राज्यामध्ये दारुबंदी,मटका,जुगार बंदी असे अनेक कायदे केले, हातभट्टी चालू देणार नाही, अशी कणखर भूमिका घेतली. म्हणून त्यांच्या विरोधात हे षडयंत्र रचले जाऊ शकते, मी समजू शकतो. माननीय गृहमंत्र्यांनी "डान्सबार बंदीचा " कणखर निर्णय घेतला त्यामुळे वाममार्गाने येणारे लाखो करोडो रुपये बंद झाले, तो पैसा पुन्हा मिळावा म्हणून लाभधारकांनी हे षडयंत्र रचले असेल हे मी समजू शकतो.

खैरलांजी प्रकरणाचा आणि आबांचा काय संबंध ? आबांनी अनेक कणखर आणि कठोर भूमिका व निर्णय घेतले तसेच, खैरलांजी प्रकरणांतर्गत एकाच वेळी 135 लोकांना गुन्हेगारी करार देण्याची माननीय गृहमंत्र्यांनी धाडस दाखविले.

आबांनी शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून सावकारांच्या विरोधात कठोर भूमिका व निर्णय घेतले त्यामुळे काही लोकांना ढोपरापासून ते कोपरापर्यंत सोलण्याची वेळ आली.

मुंबईतील गँगवार आपण गेली अनेक वर्ष पाहत आहोत, आबांमुळे गँगवारमधील काही लोकांचे कंबरडे मोडले अशा प्रकारे एक ना अनेक निर्णय केवळ बोलण्यातूनच नव्हे तर कृतीतून

3H-2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

या राज्याच्या कणखर गृहमंत्र्यांनी करुन दाखविले. माननीय गृहमंत्र्यांच्या विरोधात अनेक प्रयत्न झाले परंतु या राज्याचे गृहमंत्री खंबीरपणे पाय घट्ट रोवून उभे राहिले. एवढे सगळे करुनही गृहमंत्री काही आपल्या तावडीत वा कचाटयात सापडत नाही, अडचणीत येत नाहीत. आपण सर्व थरापर्यंत प्रयत्न करुन सुध्दा गृहमंत्र्यांच्या चारित्र्यावर एकही डाग वा शिंतोडा नाही हे कळल्यानंतर कुठेतरी घडलेल्या तासगावच्या छोटयाशा प्रकरणाचे भांडवल करुन त्यांच्याविरुध्द षडयंत्र रचण्याचा प्रयत्न केला जात आहे. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, कोणतीही चौकशी लावा सी.आय.डी.,सी.बी.आय. किंवा विरोधी पक्षाच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन करा मी त्या कमिटीलाही सामोरे जावयास तयार आहे, अशा प्रकारे वक्तव्य करणारे प्रामाणिकपणे प्रयत्न करणारे आपले गृहमंत्री आहेत त्यांना कठघ-यामध्ये उभे करुन त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न केवळ राजकीय स्वार्थाकरिता केला जात आहे. सभापती महोदय, आपण म्हणतो की, राजकारणात चांगली माणसे येत नाहीत आणि राजकारणी माणसे प्रामाणिकपणे काम करावयाला तयार नाहीत, आपण ही देखील व्यथा मांडतो की, राजकारणात पारदर्शी कारभार होत नाही आणि असे असतांना एक माणूस या राज्याकरिता प्रामाणिकपणे काम करीत आहे आणि त्याच्याविरोधात अशा प्रकारचे षडयंत्र रचण्यात येते.

ंयानंतर श्री.सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ कु. खर्चे नंतर --- 17:50

श्री. भास्कर जाधव ....

अशा माणसाच्या पाठीमागे त्याच्या पक्षातीलच नव्हे तर सारा महाराष्ट्र उभा राहणार आहे की नाही हा माझ्या समोर प्रश्न आहे. खरे तर आपण सर्वांनीच अशा मागणसाच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे. समाजामध्ये अशी माणसे सहजी सापडत नाहीत. असे असले तरीही अशा माणसाला मोठ्या प्रमाणात टीका सहन करावी लागते, त्याच्यावर अनेक आरोप केले जातात. परंतु राज्याच्या गृहमंत्र्यांनी, नामदार श्री.आर.आर.पाटील यांनी यामुळे दु:खी होण्याचे कारण नाही. कारण आजपर्यंतचा हिंदुस्थानचा इतिहास आपण पाहिला, महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या भूमिचा इतिहास पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, ज्यांनी ज्यांनी आजवर अशा प्रकारे चांगले काम केले आहे, चांगले काम करण्याचा प्रयत्न केला आहे त्या सगळ्यांनाच अशा प्रसंगांतून जावे लागले आहे. त्या सगळ्यांना लोकांच्या टीकेचे, आरोपांचे धाव सहन करावे लागले आहेत. थोडक्यात सांगावयाचे तर या भूमित अशा प्रकारे सुधारणांचे काम करणाऱ्या, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाला जीवंतपणे दगड मारले जातात आणि तो गेल्यानंतर त्याच्या पश्चात त्याचे दगडी पुतळे उभे केले जातात. तेव्हा नामदार आर.आर.आबांनी खंबीर रहावे. आजपर्यंत ते आपल्या मताशी ठाम राहिले आहेत तसेच त्यांनी ठाम रहावे. आपल्या विरोधकांनी त्यांचेवर नानाप्रकारे टीका करण्याचा प्रयत्न केला. त्यांचेवर आरोप केले. पण कोठेच आपण त्यांच्या दबावाखाली आला नाहीत. आज पर्यंत माननीय गृहमंत्र्यांनी या राज्यातील पोलिसांचे मनोबल वाढविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत मी फार काही सांगणार नाही. परंतु एवढेच सांगेन की, निवडणुकीच्या कालावधीमध्ये फार मोठे गुन्हे त्या त्या प्रभागांमध्ये दाखल झ ााले. अनेक आरोप देखील त्या संबंधात त्यांचेवर झाले. मी त्याबाबतची थोडक्यात आकडेवारी सांगेन की, महापालिका निवडणुकीच्या काळामध्ये एकंदर 664 गुन्हे दाखल झाले. हे गुन्हे कोणत्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या विरोधात झाले ? त्यात इंदिरा काँग्रेस पक्षाच्या 95, राष्ट्रवादी काँग्रेसच्या 74, शिवसेनेच्या 69, भाजपाच्या 32 आणि आरपीआयच्या 15 कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. ज्या पक्षांची या राज्यात सत्ता आहे, त्या पक्षाचे गृहमंत्री असताना देखील सगळ्यात जास्त गुन्हे हे आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर दाखल करण्याचे धाडस या गृहमंत्र्यांनी केलेले आहे. त्यानंतरच्या निवडणुकीमध्ये एकूण 125 गुन्हे दाखल झाले त्यामध्येही हीच परिस्थिती होती. त्या काळात इंदिरा काँग्रेसच्या 8, राष्ट्रवादी काँग्रेसया 21, शिवसेनेच्या 14 आणि भाजपाच्या

...... 3 आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

10 कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यानंतर नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधील आकडेवारीची माहिती देण्याचा अधिकार हा त्यांचाच असल्याने त्याबद्दल मी आता काही सांगत नाही, त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये ते ही माहिती देतीलच. परंतु मला या ठिकाणी हे आवर्जून सांगावयाचे आहे की, आपल्याकडे सत्ता असतानाही त्या सत्तेचा लाभ आपल्या पक्षाला मिळवून देण्याचा कारभार त्यांनी कधी केलेला नाही.

सभापती महोदय, वाशी येथील एका दरोड्याच्या प्रकरणामध्ये एका पोलीस अधिकाऱ्याचा, श्री.बाबासाहेब आढाव यांचा खून झाला, त्याबद्दल येथे सर्वांनीच आपली व्यथा व्यक्त केली आहे. आपले कर्तव्य करीत असताना पोलीस प्रसंगी आपला जीव धोक्यात टाकीत असतो त्याचे हे एक उदाहरण आहे. बेकायदा काम करणाऱ्यांना पोलिसांची भीती वाटली पाहिजे, त्यांच्यावर पोलिसांची जरब असली पाहिजे. पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे असे आपण म्हणतो आणि त्यासाठी प्रसंगी पोलीस देखील प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. प्रसंगी आपले प्राण पणाला लावतात. असे असताना पोलिसांकडून काही छोट्या चुका झाल्या तर त्या वरून एकूणच पोलीस दलाचे मनोबल कमी होईल अशा प्रकारे आपण टीका करतो तेव्हा त्याबाबतही आपण विचार केला पाहिजे. वाशी येथे दरोडा पडतो आहे हे पाहून एका जागरूक नागरिकाने पोलीस ठाण्यामध्ये फोन करून त्याची माहिती दिली तेव्हा तेथील पोलीस अधिकारी श्री.आढाव हे शस्त्र न घेताच तेथे धावले आणि दरोडेखोरांना आडवे गेले. सभापती महोदय, असे कोणतेही प्रसंग आले तर कोणाही पुढाऱ्याला, नेत्याला सांगितले जात नाही तर त्यावेळी पोलिसांचीच आठवण सर्वसामान्यांना होत असते आणि अशा वेळी पोलीस देखील धावून जातात अशा पोलिसांच्या पाठीमागे आपण खंबीरपणे उभे राहिले पाहिजे असे मला वाटते. दरोडे घालण्यासाठी आलेले लोक कशा पद्धतीने आले होते ? तर ते सुटाबुटामध्ये आले होते. अशा प्रकारे दरोडेखोर देखील येऊ शकतात आणि त्यामुळेच पोलिसांनी काही संशय आला आणि म्हणून त्यांनी कोणा सुटाबुटातील माणसाला हटकले तर आपणही त्याबाबत लगेच अकांततांडव करतो. ...

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

( यानंतर श्री. गागरे ...... 3जे 1 ...

अग्रुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

हे आपण समजून घेतले पाहिजे. शासन चांगले काम करीत असेल तर राज्यातील सर्व पक्षाच्या लोकांनी शासनाला सहकार्य केले पाहिजे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणूकीत 1 फेब्रूवारी रोजी एक सभा झाली. विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री.रामदास कदम त्या सभेला गेले होते. शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उध्दव ठाकरे हे सुध्दा त्या सभेस गेले होते. राज्याच्या विरोधी पक्ष नेत्याने भाषण काय केले असेल ? ते म्हणाले आम्हाला फक्त सत्ता द्या, मी गृहमंत्री झालो तर तुडवून टाकीन, फोडून टाकीन, दुसरे नेते म्हणाले की आम्हाला आठ दिवस सत्ता द्या, मी कसे राज्य चालवतो ते दाखवितो.

सभापती महोदय, एका बाजूला आपण म्हणतो की, कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे. परंतु राजकारण करत असताना अनेक चांगल्या प्रकारचे निर्णय घेतले जात आहेत, पूर्वी पोलिसांच्या रेकॉर्डवर वारंवार कलमे बदलली जात असत. आता ही कलमे बदलली जाऊ नयेत याकरीता शासनाने चांगली उपाययोजना केलेली आहे, आपण चांगल्या दृष्टीकोनातून याकडे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. आता एखाद्या व्यक्तीने टेलीफोनवरुनही पोलीस स्टेशनला तक्रार केली तर, ती तक्रार घेण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. शासनाने वाचनालये काढली आहेत, महाविद्यालयात रॅगिंगचे प्रकार होऊ नयेत शासनाने कडक कायदा केला आहे. डान्सबारवर बंदी आणण्याचे काम शासनाने केले आहे.

भारतामध्ये पहिल्यांदा आंध्र प्रदेशला आयएसओ दर्जा मिळाला होता, यानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या कार्यकाळात आयएसओ 9000 हे मानांकनपत्र व पुरस्कार महाराष्ट्र राज्यास मिळाला आहे. चांगल्या बाबींचाही आपण विचार केला पाहिजे. मानसन्मान राखला पाहिजे. सध्या पोलिसांची संख्या कमी आहे. गुन्हयाचे प्रमाण वाढत आहे, असे बोलले जाते. गुन्हयांचा तपास योग्य व वेळेवर व्हावा म्हणून मध्यप्रदेशच्या धर्तीवर पोलीस खात्यातील नाईक पदांना पी.एस.आय.चे अधिकार देण्याचे काम शासनाने केलेले आहे, ते करण्याची आवश्यकता होती. अशा प्रकारचे अनेक चांगले निर्णय राज्य सरकारने घेतले असताना शासनाच्या मागे आपण सर्वांनी उभे राहणे आवश्यक आहे.

.....2

15-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3J-2

PNG/ MPP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

सभापती महोदय, पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील कलमे बदलली जाऊ नयेत, याकरीता चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. मुंबईतील पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. नोंदविताना डिजीटल पेन आता वापरण्यात येणार आहे. कलमे बदलली जाऊ नयेत म्हणून 40 फुलस्केप पेपर लिहू शकेल असे डिटीजल पेन आता पोलीस स्टेशनमध्ये वापरले जाणार आहे, हा स्वागतार्ह निर्णय आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे समाजाचे हिताचे रक्षण करण्याचे काम चांगल्या प्रकारे करीत आहेत, हे यावरुन दिसून येते.

राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी श्री.आर.आर.पाटील यांच्या व्यतिरिक्त कोणीही धाडस केलेले नाही. मटकेवाले, दारुवाले व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांना निवडून देऊ नका हे सांगण्याचे धाडस श्री.आर.आर.पाटील यांच्याशिवाय कोणी केले नाही, त्याच्याशिवाय ही धमक कोणामध्ये आहे. श्री.अरुणभाई गुजराथीसारखा चांगला माणूस निवडणुकीत पडतो आणि श्री.अरुण गवळीसारखा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला माणूस निवडून येतो, ही राजकारणामधील वस्तुस्थिती आहे. समाजामध्ये काही चांगल्या सुधारणा व्हाव्यात अशी श्री.आर.आर.पाटील यांची तळमळ आहे.

सभापती महोदय, सभागृहातील जुन्या व नव्या सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या ठरावाच्या माध्यमातून राज्यात घडलेल्या वाईट बाबीसोबत चांगल्या बाबीही नजरेसमोर आणल्या पाहिजेत व त्यातून काहीतरी नवीन सुधारणा करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

..... यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी आपले भाषण करीत असतांना माझ्या नावाचा उल्लेख केला असला तरी त्यांच्या भाषणाला ब्रेक लागू नये म्हणून मी त्यांना अडविले नाही. त्यांनी आपल्या भाषणामध्ये हा प्रस्ताव माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्या विरोधात आणला आहे अशाप्रकारचा उल्लेख केला. आणि तशाप्रकारे मी बोललो असे त्यांनी याठिकाणी दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु मी तसे बोललो नाही. मी स्पष्टपणे म्हटले आहे की, या राज्यामध्ये गेल्या पाच-सहा महिन्याच्या काळात झालेल्या नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हापरिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या दरम्यान लोकप्रतिनिधी व निवडणुकीला उभे राहिलेल्या उमेदवारांच्या हत्यांच्या संदर्भात ही चर्चा आहे. आज जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या संदर्भात चर्चा करावयाची नव्हती. परंतु हा प्रस्ताव आल्यामुळे नाईलाजास्तव आम्हाला तो विषय घ्यावा लागला. त्यामुळे माननीय आबांच्या विरोधात आमचा हा प्रस्ताव नसून राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या विरोधात हा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव व्यक्तिविरोधी नसल्यामुळे आपल्या आवेशपूर्ण भाषणामध्ये जर तसे वाक्य बोलले गेले असल्यामुळे ते दुरुस्त होण्याची आवश्यकता आहे असे मला म्हणावयाचे आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय श्री. दादासाहेब सरपोतदार यांनी याठिकाणी जे सांगितले तसे मी बोललो नाही. माझ्या भाषणामध्ये जर चुकीच्या पध्दतीने तशाप्रकारचे शब्द आले असतील तर आपण ते भाषण तपासून पहावे, आणि ते काढून टाकण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्यांचे भाषण म्हणजे सभागृहातील एखाद्या चांगल्या माननीय सदस्यांना निरोप देण्याचे भाषण असल्यासारखे वाटले. या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी चर्चा सुरु करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडविण्यास कारणीभूत ठरणारी अशाप्रकारची परिस्थिती या राज्यामध्ये कां निर्माण झाली आहे? आणि त्याबाबत कोणती उपाय योजना करण्यात आली आहे? यासंबंधी थोडा विचार करण्याची आवश्यकता आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या गाभ्यामध्ये काय दडले आहे, त्या संदर्भामध्ये मी याठिकाणी थोडक्यात सांगणार आहे. आतंकवादाचा जन्म अन्याय आणि नैराश्यामधून होतो.  देशामधील 100 जिल्हयांमध्ये नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढल्या आहेत. इतर जिल्हयांमध्ये जातीच्या माध्यमातून जनतेच्या मनातील असंतोष वर यायला लागला आहे हे केंद्र सरकारने कबूल केले आहे. हे प्रकार कां होऊ लागले आहेत? सन्माननीय गृहमंत्र्यांच्या जिल्हयामध्ये 30 च्या आसपास सुपारी देऊन खून करण्यात आले. त्याठिकाणी सर्रासपणे मारामाऱ्या सुरु आहेत. माझ्या सारख्या कार्यकर्त्यांला हे असे कां होत आहे याबाबत चिंता वाटत आहे? या लोकांना गुन्हा करणारी माणसे कशी काय मिळतात? याचा अर्थ स्पष्ट आहे की, कमी पैश्यामध्ये जीव गमाविणारी माणसे गुंडांच्या नायकाला मिळू लागली आहेत. ज्या दिवशी जीव गमाविणारी माणसे मिळणार नाहीत त्या दिवशी हे सर्व प्रकार बंद होतील. या गोष्टींचा संदर्भ प्राण्यांशी द्यावयाचा झाला तर मी एकच सांगेन की, दोन वर्षे बिहार राज्यामध्ये मगर पालन संस्थेच्या चेअरमनना मगरींच्या पालन पोषण खर्चाचे पैसे मिळाले नाहीत. सहा महिन्यानंतर त्यामधील एका मगरीने दुसऱ्या मगरीची मांडी खाल्ली. दुसरी गोष्ट अशी की, एखाद्या नदीचे पात्र ज्यावेळी वाहत असते त्यावेळी त्या पात्रामध्ये किडे, अळया यांचा प्रादुर्भाव होत नाही. परंतु जर कां त्या नदीचे वाहणारे पाणी थांबले तर त्याचे डबके तयार होते. त्या तयार झालेल्या डबक्यामध्ये किडे आणि अळया तयार होतात. तसे या देशाच्या विकासाचे झाले आहे. या देशाच्या विकासाचे डबके तयार झाले असून त्यामुळे मारामाऱ्या होत आहेत, एक माणूस दुसऱ्या माणसाला मारावयास लागला आहे. आज जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये  विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे हात तोडण्याचे प्रकार झाले, कार्यकर्त्यांना मारण्याचे प्रकार घडले. त्यामुळे राज्यातील परिस्थिती स्फोटक बनली आहे. तेव्हा या परिस्थितीवर आपण नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आणि जर या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

बिघडलेल्या परिस्थितीवर आपण नियंत्रण आणणार नसाल तर या महाराष्ट्रातील जनता आपल्याला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. आणि तोपर्यंत या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या झालेल्या डबक्यातील मारामाऱ्या आपण थांबवू शकणार नाही. माझ्या जिल्हयातील भोकरदन या गावामध्ये स्नेहलता भिसे नावाच्या भाजपच्या महिला तालुका अध्यक्षांच्या घरामध्ये रात्री दोन वाजता माणसे शिरुन त्यांनी अध्यक्षांना मारहाण केली. अशाप्रकारे जिल्हा परिषदेच्या खडुवा मतदारसंघामध्ये तीन माणसे मारली जातात. तसेच, जिल्हा परिषदेच्या येरळा मतदारसंघातील उमेदवाराचा पराभव झ ााल्यामुळे त्या उमेदवाराची दोन मुले गावामध्ये शिव्या देत सुटतात. राज्यामध्ये ज्या ज्याठिकाणी निवडणुकीमध्ये उमेदवारांचे पराभव झाले आहेत त्याठिकाणी गुन्हे घडल्याचे सांगितले गेले.

(यानंर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (पुढे सुरु.....

कडेगावमध्ये गाई-म्हशींवर तलवारीने वार करण्यात आले. गृहमंत्र्यांच्या जिल्ह्यामध्येच असा प्रकार होत असेल तर बाकीच्या जिल्ह्यांमध्ये असे प्रकार होणे सहज शक्य आहे. मला सांगावयाचे आहे की, दारुची दुकाने 200 मिटरच्या आत नसावीत, असा दंडक आहे. पण आज 200 फुटावर एक दारुचे दुकान आहे अशी परिस्थिती आहे. असे झाले तर सगळया महिला, लहान मुले बाजारासाठी येतात, त्या ठिकाणी दारुची दुकाने दिल्यानंतर हाताला काय लागणार ? लातूर जिल्ह्यामध्ये भूई समुद्र नावाचे गाव आहे. त्या गावामध्ये 27 जानेवारीला एका शेतकऱ्याचा खून झाला. या प्रकरणी लोकांनी रस्ता रोको आंदोलन केले. तरीही त्याची कोणी दखल घ्यायला तयार नाही. आपण चांगले बोलता, त्यापेक्षाही प्रशासनावर किती पकड हेही तिकेच महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील सगळी जनता अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचे कारण सरकार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितल्याप्रमाणे "सब सरकार का ही है. सरकार को छोड दूसरे किसी का यह नही है. यह सरकार का जिम्मा है." अशी सरकारची परिस्थिती तयार झाली. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, या सगळ्या गोष्टी गंभीरपणाने सरकारने घेणे गरजेचे आहे. परिस्थिती स्फोटक झालेली आहे, थोडे तेल पडले की पेट घेणारी आहे. तसे होऊ द्यायचे नसेल तर सगळया गोष्टींचा कठोरपणाने विचार केला पाहिजे. मला विनंती करावयाची आहे की, बाकीच्या जिल्ह्यांपेक्षा सन्माननीय गृहमंत्री महोदयांच्याच जिल्ह्यामध्ये एवढे खून कसे काय होत आहेत ? या गोष्टीचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.जाधवसाहेब यांनी सांगितल्याप्रमाणे गृहमंत्री महोदय हे चांगले आहेत,स्वच्छ आहेत, याबद्दल दुमत नाही. स्वच्छ आणि पकड यामध्ये फरक असू शकतो. प्रशासनावर पकड ठेवणे गरजेचे आहे, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

---

यानंतर हिंदीतील भाषण.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद कमरुझ जामा(महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित ):सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष की तरफ से यहां कूनन और व्यवस्था के संबंध में जो प्रस्ताव चर्चा के लिए रखा गया है, उस पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं. सम्माननीय सदस्य श्री गड़करी जी ने कानून और व्यवस्था के संबंध में बहुत प्रभावपूर्ण तरीके से अपनी बात रखने का प्रयास किया है. लेकिन मुझे लगता है कि उन्होंने ज्यादातर समय राजनीतिक बात करने में ही व्यतीत किया, कानून और व्यवस्था पर उन्होंने ज्यादा बात नहीं कही. उन्होंने चुनाव के समय की बात कही. पिछले दिनों तीन-चार चुनाव हुए. नगरपालिकाओं, जिलापरिषदों एवं पंचायत समितियों के चुनाव हुए. इन चुनावों में जो राजनीतिक घटनाएं हुई थीं, उनके संबंध में उन्होंने अपनी बात रखी है. कांग्रेस के पदाधिकारियों ने क्या कहा, एनसीपी के पदाधिकारियों ने क्या कहा, वह बात उन्होंने बतायी. वैसे तो इस चर्चा पर वह बताने की आवश्यकता नहीं थी. हम राजनीतिक पार्टियों में काम करने वाले लोग है. जनता की नज़र में हम राजनीतिक लोगों की छवि खराब है. अब चूंकि जनता के सामने विकल्प नहीं है इसलिए वे भी मजबूर है. लेकिन यह बात सही है कि जनता की नज़र में हमारी ख्याति अच्छी नहीं है. हम राजनीतिज्ञ कैसे काम करते हैं, चुनाव में कैसे पैसे बांटे जाते हैं, कैसे दारु पिलायी जाती है, कैसे घोड़ा बाजार होता है तथा और भी अन्य क्या-क्या चीज़े होती है, वह सब को पता है. सभी राजनीतिक पार्टियां में यह सब चलता है. यह सब सत्ता पाने के लिए ही होता है. इसलिए इस बात को ध्यान में रखते हुए मुझे लगता है कि, और मैं यह बताना चाहता हूं कि अगर हम हमारे राज्य में होने वाले क्राईम और दूसरे राज्य और देशों में होने वाले क्राईम की संख्या को तुलनात्मक दृष्टि से देखें तो मुझे लगता है कि महाराष्ट्र राज्य की स्थिति अच्छी है. बहुत सारे प्रगतिशील देश है, जहां का क्राईम रेट हमारे राज्य से ज्यादा है. अमेरिका में चिकागो और डेटरोइट में लोग शाम को बाहर निकलने से भी डरते हैं. वहां रेड कार्ड जारी किया जाता है. लोगों से कहा जाता है कि अकेले बाहर न जाए. अगर बाहर जाना हो तो अपनी रिस्क पर जाए. मेरे कहने का तात्पर्य यह है कि तुलनात्मक दृष्टि से देखा जाए तो हमारे महाराष्ट्र में कानून और व्यवस्था की स्थिति अच्छी है. महाराष्ट्र सरकार ने इस दिशा में अच्छा काम किया है. महाराष्ट्र में कानून और व्यवस्था की स्थिति में सुधार हुआ है. लेकिन मैं यह भी कहना चाहूंगा कि सरकार को इंटेलीजंस मजबूत करने के बारे में भी विचार

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद कमरुझ जामा.............

करना चाहिए.पुलिस दल को अत्याधुनिक बनाने पर विचार करना चाहिए. ऐसी बात नहीं बोलनी चाहिए जिससे पुलिस का मनोबल गिरे. पुलिस को अपना कार्य करने के लिए पूर्ण स्वतंत्रता मिलनी चाहिए. दूसरी बात मैं यह कहना चाहूंगा कि जितने भी अपराधी है, उन सब को किसी न किसी पार्टी का पोलिटिकल पैट्रोनेज होता है. यह हकीकत है. इसलिए मेरा यह सुझाव है कि पुलिस बल को अटॉनॉमी दी जाए, उनको अधिकार दिए जाए. पुलिस के काम में पारदर्शकता भी आनी चाहिए. इसके साथ ही साथ उनकी जिम्मेदारी भी निश्चित की जानी चाहिए. कानून और व्यवस्था की दयनीय स्थिति के लिए शासन को जिम्मेदार ठहराना चाहिए, न किसी एक व्यक्ति को. किसी एक व्यक्ति को जिम्मेदार ठहराना उचित नहीं होगा क्योंकि उससे पुलिस दल का मनोबल गिर सकता है. समाज में व्यवस्था बनाए रखने की जिम्मेदारी सरकार पर होती है, किसी एक व्यक्ति पर नहीं. इसलिए यहां पर मनोबल बढ़ाने की बात की जानी चाहिए. अगर पुलिस अपने कर्तव्य के प्रति उदासीन है तो पुलिस पर जरुर कार्रवाई की जाए.

सभापति महोदय, पिछले दिनों महानगरपालिका एवं जिला परिषदों के चुनाव हुए. इन चुनावों के दौरान महाराष्ट्र के चुनाव आयुक्त श्री नंदलाल ने कुछ बयान दिए. यह बात सब को मालूम है कि नंदलाल बहुत कड़क है. लेकिन मैं यह बताना चाहता हूं कि उनके द्वारा लिए गए कई निर्णय कोर्ट ने रद्द किए हैं. मैं तासगांव के मामले के बारे में ही यह बताना चाहता हूं कि श्री नंदलाल ने उम्मीदवारों द्वारा अर्ज वापस लेने के मामले में हुई गड़बड़ी को सही मानते हुए वहां का चुनाव रद्द करने का फैसला लिया और जब दूसरे दिन दुबारा चुनाव हुआ तो उस दिन भी सारे उम्मीदवारों ने अर्ज वापस ले लिए थे. कोई यह न समझे कि मैं यहां माननीय गृह मंत्री जी की तरफदारी कर रहा हूं. मैं वास्तविकता बयान कर रहा हूं और नंदलाल जी का फैसला गलत था या सही था, उसके बारे में बोल रहा हूं.

सभापति महोदय, मैं अंत में यह कहना चाहूंगा कि कानून और व्यवस्था की स्थिति बिगड़ जाती है कि तो उसके लिए किसी एक व्यक्ति को जिम्मेदार ठहराना उचित नहीं होगा. महाराष्ट्र में कई जगह कानून और व्यवस्था की स्थिति में सुधार हो रहा है. कई बार परिस्थिति को देखते हुए गृह मंत्री जी और पुलिस को अप्रिय निर्णय लेने पड़ते हैं. लेकिन उसकी प्रतिक्रिया बाहर होनी चाहिए, न कि सदन में. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

.......

असंशोधित प्रत / प्रकाशनार्थ नहीं

RDB/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माजी विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी अनेक विषय चर्चिले गेले. विशेषत: सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे तसेच सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी आबांचे कार्य कसे अतिशय उत्तमरीतीने चालले आहे याबद्दल सांगितले. फुले, आंबेडकर, शाहू आणि आबा अशा पध्दतीचे त्यांचे म्हणणे होते. फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार जगविण्याचा प्रयत्न आबा करीत आहेत असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे होते.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबरोबर आबांना जोडू नका.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी याबाबत खुलासा केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गेल्या वर्षभरामध्ये म्हणजे 1 जानेवारी ते 30 नोव्हेंबर या कालावधीत एकट्या मुंबई शहरामध्ये 28160 गुन्हयांची नोंद झालेली आहे. यापैकी फक्त 14,795 गुन्ह्यांची आपण उकल करु शकलो. अजून 14000 गुन्हे प्रलंबित आहेत. कट रचणे, दरोडे, चो-या अशा गुन्ह्यांचा अजून सुगावा लागलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये ही भयमुक्त मुंबई आहे असे आपण म्हणायचे काय ? गेल्या वर्षी मारामा-यांचे 3400 गुन्हे दाखल झाले. त्यापैकी 3137 गुन्ह्याचा तपास लागला. जबरी चो-या, खंडणी, खून या गुन्ह्यांचा तपास अद्याप लागलेला नाही. याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांकडे काही वेगळी माहिती असेल तर ती त्यांनी सदनाला सांगावी. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी ॲट्रासिटीचे आणि दलित समाजावरचे गुन्हे कमी झाल्याचे सांगितले. या संदर्भात माझ्याकडे असलेली आकडेवारी मी सदनाला सादर करु इच्छितो. सन 2004मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे 689 गुन्हे दाखल झालेले आहेत. 2005 सालामध्ये हे गुन्ह्याचे प्रमाण 884 इतके होते. ऑक्टोबर 2006 पर्यन्त अशा प्रकारचे 742 गुन्हे दाखल झालेले आहेत. अनुसूचित जमातीवरील ॲट्रॉसिटीचे दाखल झालेले गुन्हे 2033 आहेत. या गुन्ह्यामध्ये हत्या, बलात्कार यासारखे मोठे गुन्हे आहेत. 2005मध्ये अनुसूचित जमातीवर केलेल्या अत्याचारांचे 230 गुन्हे नोंदलेले आहेत. ऑक्टोबर 2006 पर्यन्त अशा प्रकारच्या 201 गुन्हयांची नोंद झालेली आहे. तेव्हा सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी गुन्ह्यामध्ये घट झालेली आहे असे जे सांगितले ते चुकीचे आहे. दलितांवरील अट्रॉसिटीचे गुन्हे कमी न होता वाढतच आहेत हे आपणास खैरलांजी सारख्या घटनावरुन दिसून येते.

सभापती महोदय, मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गुन्ह्याचा एक नवीन ट्रेण्ड सुरु झालेला आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीची प्रकरणे वारंवार उघडकीस येत आहेत. सात-आठ महिन्यापूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये जात असलेला 2 कोटीचा चरस जप्त करण्यात आला होता. जानेवारीमध्ये टेक्सासला जात असलेले 2 कोटीचे हेरॉईन जप्त करण्यात आले होते. पुणे-पणजी बस मधून पोलिसांनी 15 कोटीचे अंमली पदार्थ जप्त केले होते. पुणे जिल्ह्यामध्ये सिंहगडाच्या पायथ्याशी जी रेव्ह पार्टी झाली त्या पार्टीत अमली पदार्थांचा वापर करण्यात आला. या रेव्ह पार्टीमध्ये शामिया

..2..

(डॉ. दीपक सावंत...)

स्टेज नावाची महिला कॅलिफोर्निया ड्राप्स नावाचे अंमली पदार्थ घेऊन येणार होती. हे सर्व पोलिसांना माहीत होते. तरी देखील गुन्हेगारांना पोलिसांनी पकडले नाही. त्या रेव्ह पार्टीवर रेड टाकण्याचे पोलिसांनी नाटक केले. त्या पार्टीत श्रीमंतांची आणि बड्या धेंडांची मुले सामील झालेली होती. विशेष म्हणजे या पार्टीमध्ये उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आदी राज्यातून एसएमएस करुन आणि इंटरनेटवरुन ई-मेल करुन मुला-मुलींना बोलावलेले होते. आज आपल्या देशातील तरुणाईला अशा प्रकारे संपविण्याचे काम होत आहे ही अतिशय चिंतेची बाब आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरामध्ये अंमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणावर होते हा देखील अतिशय चिंतेचा विषय आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

कायदा व सुव्यवस्थेमध्येच हे येते. मधल्या 10 वर्षाच्या काळात अशा प्रकारच्या फार मोठ्या घटना झालेल्या आहेत. त्यावेळी श्री.राकेश मारिया यांनी उत्तम प्रकारे नियंत्रण मिळविले होते. यानंतर पालकांची भूमिका त्यापेक्षा वेगळी असल्याचे दिसून येते. एक रात्र कोठडीत ठेवल्यानंतर पालकांनी वशिले लावायचा प्रयत्न करुन, पोलिसांवर दबाव आणून आपापल्या मुलांना पोलीस कोठडीतून बाहेर काढायला सुरुवात केली. पालकच जर अशा प्रकारे वागणार असतील तर आणखी काय होणार? पुण्यामध्ये विशेषत: जी परप्रांतीय मुले उच्च शिक्षण घेण्यासाठी येतात, त्यांच्यामार्फत अशा प्रकारचा व्यवसाय केला जातो, ड्रग्ज घेतले जातात. यापूर्वी पेज-थ्री पार्टीचा उल्लेख झाला. अशा पेज-थ्री पार्ट्यांमध्ये ड्रग्ज घेतले जातात, व्यवसाय केला जातो. पोलिसांनी ॲसिड टेस्ट म्हणून अशा प्रकारच्या एखाद्या पेज-थ्री पार्टीवर छापा घालून तेथील ड्रग्ज पकडण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नव्याने नियुक्त झालेले मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.धनंजय जाधव यांनी सांगितले की, 400 निलंबित पोलिसांना पुन्हा सेवेत घेणार आहोत. कोणत्या बेसीसवर त्यांना सेवेत घेतले जाणार असा प्रश्न विचारला असता त्यांनी खुलासा केला की, असा प्रघात पूर्वीही होता आणि आता पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे 400 निलंबित पोलिसांना सेवेत घेण्यात येणार आहे. ज्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे गुन्हे असतील, प्रकरणात अडकले असतील त्यांना पुन्हा सेवेत घेणे कितपत योग्य आहे? जे स्वच्छ असतील त्यांना जरुर सेवेत घ्यावे. परंतु सेवेत घेत असताना जरुर त्यांचा विचार करावा. दुसरे महत्वाचे गुन्हे वाढत आहेत ते म्हणजे सायबर क्राईम्स. सायबर क्राईम्सचा शोध लावण्यासाठी तंत्रशुध्द यंत्रणा आणि त्यादृष्टीने आवश्यक असे ज्ञान प्राप्त केलेल्या अधिकाऱ्यांची फौज उपलब्ध नाही. त्यामुळे असे गुन्हे डिटेक्ट करु शकत नाही. सायबर क्राईम्स शोधण्यासाठी 533 पोलीस आणि अधिकाऱ्यांची टीम तयार केली आहे. अशा प्रकारचे गुन्हे घडणारी मुंबई, नवी मुंबई, सिंधुदुर्ग, नागपूर, नाशिक आणि सोलापूर ही मुख्य ठिकाणे आहेत. अशा प्रकारच्या सायबर क्राईम्स क्षेत्रामध्ये एंट्री करुन त्यावर नियंत्रण मिळवायचे असेल तर पोलीस अधिकाऱ्यांना संगणकीय ज्ञान, ई-मेलचे शिक्षण देणे, इंटरनेट कसे वापरायचे, पोर्ट्रेट कसे दाखवायचे यादृष्टीने शिक्षण देणे आवश्यक आहे. यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव आहे ही गोष्ट गृहमंत्र्यांनी मान्य केली पाहिजे. सायबर क्राईम्सवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

नियंत्रण मिळवायचे असेल तर 533 अधिकाऱ्यांची टीम उभी करुन चालणार नाही, काही हजार पोलीस नेमावे लागतील. तरच या क्षेत्रावर नियंत्रण मिळविता येईल. यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये काय झाले याचा उल्लेख केला. शिवसेनेचे मुंबई महापालिकेवर निवडून आलेले नगरसेवक कै.कमलाकर जामसंडेकर यांचा खून करण्यात आला, दुसरे सांताक्रूझ येथील नगरसेवक श्री.मोहन लोकेगावकर यांच्यावर ॲट्रॉसिटी कायद्याखाली जाणीवपूर्वक खटला दाखल करण्यात आला अशी अनेक प्रकरणे आहेत. आजच लक्षवेधी सूचनेवर उत्तर देत असताना मंत्रीमहोदयांनी सांगितले की, हा सगळया पक्षांनी मिळून केलेला कट होता. हा जर कट केलेला असेल तर कोणत्या पक्षाने केला याचे उत्तर आम्हाला मंत्रीमहोदयांकडून मिळणे अपेक्षित आहे. कै.कमलाकर जामसंडेकर यांची त्यांच्याच घरात घुसून निर्घृण हत्या करण्यात आली. पॉईंट ब्लॅकने त्याने शूट करण्यात आले. शूट करणारे त्यांच्या परिचयाचे होते. शूट करणारी व्यक्ती त्यांच्यासमोरच बसली होती. त्यांच्या कपाळावर गोळया घालण्यात आल्या. शूट करणारी व्यक्ती जर कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित असेल तर त्या पक्षाचे नाव उघड का केले जात नाही? केवळ थातुरमातूर कोणाला तरी उभे करुन आमची दिशाभूल करणार असाल तर ती दुर्दैवाची गोष्ट आहे. लोकप्रतिनिधींचा निवडून आल्यानंतर दोनच दिवसांनी अशा प्रकारे खून झाल्यास अशी घटना राज्याला आणि गृहखात्याला लांच्छनास्पद आहे एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

--------------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल.ऐनापूरे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी साहेबांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे त्या मुद्यांचे मी रिपिटेशन करणार नाही. मी केवळ कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात काही मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, पूर्वीच्या काळातही गुन्हे घडत होते, आताही गुन्हे घडत आहेत आणि नंतर सुध्दा गुन्हे घडत राहणार आहेत परंतु प्रश्न फक्त एवढाच आहे की, गुन्हयांची संख्या कमी होण्याची आवश्यकता आहे. अगोदरची समाजव्यवस्था आणि आताची समाजव्यवस्था यामध्ये बदल झालेला आहे. गुन्हे वाढले की, कमी झाले हा प्रश्न सगळयात महत्वाचा आहे. आता महानगर पालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुका झालेल्या आहेत. या निवडणूकांमध्ये उमेदवारांवर प्राणघातक हल्ले झालेले आहेत. या हल्ल्यांच्या संदर्भात पेपरमध्ये जे काही छापून आले ते सर्वच्या सर्व सत्य होते असेही म्हणता येणार नाही. तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी या घटनांच्या संदर्भात जे काही चित्र रंगविले आहे ते सगळेच्या सगळे बरोबर आहेत असेही म्हणता येणार नाही. निवडणुकीच्या काळात वाद होत असतात परंतु निवडणूकांचा निकाल लागल्यानंतर हे वाद संपुष्टात येत असतात. सत्तेचे फेविकॉल फार मजबूत असते ते कशानेही तुटत नाही हेच यावरुन दिसून येते. या चर्चेच्या निमित्ताने मी तीन मुद्यांच्या संदर्भात माझे विचार मांडणार आहे. सामाजिक नितीमत्तेचे सिध्दान्त पूर्वीपासून चालत आलेले आहेत. आताच्या विज्ञानाच्या युगात त्याचे नॉर्म्स बदलले आहेत. सामाजिक नीतिमत्तेचे स्वरुप बदलत आहे. हे जे बदललेले सिद्धान्त आहेत त्याची माहिती आम्हा राजकारण्यांना चांगली माहिती आहे. पूर्वी सारखे गुन्हे आता घडत नाहीत तर गुन्हयामध्ये आता आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेतला जात आहे. शहरात आणि खेडयात सुध्दा गुन्हे आधुनिक पध्दतीने घडतात. खेडयातील गुन्हेगार तसेच शहरातील हायफाय सोसायटीमध्ये गुन्हे करणारे गुन्हेगार आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन गुन्हे करीत आहेत. गुन्हेगारांना घरात घुसावयाचे असेल तर ते पूर्वीसारखे भिंती फोडून किंवा करवतीने गज कापून गुन्हे करीत नाहीत, तर गॅस कटर वापरुन गज किंवा पाईप कट करुन गुन्हे करीत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा आता गुन्हेगार सुध्दा घेऊ लागले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन गुन्हे कसे घडतात याची माहिती पोलिसांना नाही का ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल.अैनापूरे........

पोलिसांना सेवेत लागल्यावर प्रशिक्षण दिले जाते परंतु नंतर हे प्रशिक्षण दिले जात नाही. पोलिसांना प्रशिक्षण देऊन त्यांना निरंतर अपडेट केले पाहिजे. पोलीस खात्याला आधुनिक, सामाजिक मानसशास्त्राचे ज्ञान मिळाले तरच गुन्हेगारी कमी होऊ शकेल. प्राचीन काळातही गुन्हे घडत होते आताही गुन्हे घडत आहेत आणि पुढील काळातही गुन्हे घडत राहणार आहेत परंतु या गुन्हयांना कोठे तरी आळा बसणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, तासगावमध्ये अर्ज मागे घेण्याच्या मुद्यावरुन जी घटना घडलेली आहे त्याची मला कल्पना आहे कारण मी त्या ठिकाणचाच असल्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात मला चांगली माहिती आहे. ही जी माहिती आहे ती मी आपल्याला सांगणार आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे.........

खरे म्हणजे त्या व्यक्तीच्या घरातील माणसे ज्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीत अशा व्यक्तींवर विश्वास ठेवून कोणी राजकारण करीत असेल तर ते बरोबर नाही. तासगाव जिल्ह्यातील एक उमेदवार श्री सुभाष माळी यांनी भाजपचे प्रवक्ते श्री.प्रकाश जावडेकर यांना माननीय उपमुख्यमंत्र्यां विरुध्द स्टेटमेंट दिले. दुसऱ्या दिवशी माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे जाऊन त्यांना म्हणाले, "तुमच्यासारखा देव माणूस नाही, तुमच्या विरुध्द तक्रार करताना माझी जीभ का झडली नाही." जी माणसे विश्वासार्ह नाहीत त्यांना घेऊन किती राजकारण करायचे याबाबत त्यांनी विचार केला पाहिजे. सभापती महोदय, ज्यांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल संशय नाही असा माणूस गृहमंत्री झाला म्हणून विरोधी पक्षांनी सुध्दा त्यांचे कौतुक केले होते. माननीय गृहमंत्र्यांची गृह खात्यावर पकड आहे की नाही हे मागील काही घटना पाहिल्यावर सर्वांच्या लक्षात आले असेलच. गुन्हेगारांना गुन्हा करताना दहशत वाटावी असा दरारा त्यांनी निर्माण केलेला आहे.

श्री.नितीन गडकरी ( बसून ) : गृहमंत्री चांगले काम करतात, परंतु त्यांचे सहकारी त्यांना चांगले काम करु देत नाहीत....

श्री.जी.एल अैनापुरे : संबंध सिस्टीम बदलायची असेल तर त्यासाठी एक माणूस पुरेसा नसतो, त्याच्या बरोबर काही माणसे उभी रहावी लागतात. माननीय गृहमंत्री निर्णय घेताना कधीही विचलित झालेले नाहीत. कोणत्याही परिस्थितीला ते खंबीरपणे सामोरे गेलेले आहेत. कोणत्याही परिस्थितीत विचलित न होता ठामपणे उभे रहायचे असा त्यांचा लौकिक आहे. या व्यक्तीच्या नावे संस्था नाहीत,कोणतेही कारखाने नाहीत वा शिक्षण संस्था नाहीत.

सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य नाना बोरस्ते यांचा मला रात्रौ 11.30 वाजता फोन आला. त्यांनी मला सांगितले की, "मला टी.व्ही. वर आंबाचा चेहरा पडलेला दिसला. उद्या ते तासगाव येथे येत आहेत. तेथील प्रकरणामुळे ते भावनेच्या भरात राजीनामा देतील, तेव्हा तू त्यांच्या सोबत रहा. मी त्यांना सांगितले की, "आबा खंबीर आहेत. आपल्या उद्देशावर ते ठाम आहेत. मी त्यांना पूर्वीपासून ओळखतो." एका चांगल्या व्यक्तीकडे गृहखाते दिल्यापासून आजपर्यंत त्यांनी ते अतिशय समर्थपणे सांभाळलेले आहे. कोणत्याही प्रश्नाला बेधडकपणे उत्तर देणारा गृहमंत्री

..2..

श्री.जी.एल.अैनापुरे.........

महाराष्ट्राला लाभलेला आहे. मी त्यांच्या निरोप समारंभाचे भाषण करीत नाही की त्यांचे कौतुक करीत नाही. परंतु आज महाराष्ट्राला अशा माणसाची गरज आहे. पोलीस स्टेशनला फोन लावा आणि माझे काम करा असे सांगण्याचे धाडस कोणीही करीत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था फार बिघडलेली आहे असे सांगण्यात आले, परंतु तशी परिस्थिती नाही. काही पोलीस अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण पोलीस खाते बदनाम होते. त्यांच्यात सुधारणा केली पाहिजे. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे पोलिसांना चांगले ट्रेनिंग दिले तर बरे होईल.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे....

माननीय श्री.म्हेत्रेसाहेबांबद्दल मी बोलणार आहे. त्यांच्यावरही एक संकट आले होते. आपण त्यांचा राजीनामा मागितला होता. परंतु त्यावेळी त्यांनी अतिशय धैर्याने तोंड दिले होते. माननीय गृहमंत्र्यांची व माननीय गृह राज्यमंत्र्यांची जोडी व्यवस्थित चालू आहे. आज रोजी गृह विभागाची इमेज हळूहळू बदलत चाललेली आहे. सभापती महोदय, मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. ज्यावेळी तासगांवचे इलेक्शन रद्द झाल्याची बातमी आली त्यावेळी मी इस्लामपूर स्टॅण्डवर उभा होता. त्याठिकाणी एक मुलगा "आबांना दणका" अशाप्रकारे ओरडत पेपर वाचा असे बोलत पळत होता. त्या स्टॅण्डवर एक बाई बसलेली होती, त्यावेळी ती त्याला ओरडली की, अरे हरामखोरा असे काय बोलतोस ? अशी ती बाई बोलली. माझे हे शब्द कामकाजातून काढावयाचे असतील तर ते काढावेत.

**तालिका सभापती** : "हरामखोरा" हा शब्दप्रयोग कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, अशाप्रकारे एखाद्या बाईला राजकारण माहीत नसताना, त्या बाईला कुठल्याही पक्षाचे नाव माहिती नसताना, त्या बाईला ग्रामपंचायत काय असते हेही माहीत नसताना अशाप्रकारच्या कॉमन माणसाची आबांबद्दलची भावना आहे. त्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की, आपण आबांना प्रोत्साहन द्यावे. अशी माणसे पक्षापलिकडे जाऊनही मोठी होतात. त्यामुळे त्यांच्याच हातात गृह विभागाची सुत्रे असली पाहिजेत, असे मला वाटते. टीका करणे, चुका निदर्शनास आणणे हा विरोधी पक्षाचा हक्कच आहे. तो आपण चांगल्या पध्दतीने बजावत आहात, त्याबद्दल मी आपले अभिनंदनही करतो. परंतु अशाप्रकारे आपण माननीय पतंगराव कदम व माननीय आबा यांच्यामध्ये लावून देत आहात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर हेत्वारोप होत आहेत. पतंगराव आणि आबा यांच्यामध्ये हे लावून देण्याचा प्रयत्न केला म्हणजे काय ?

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, माननीय श्री.पतंगराव कदम, माननीय श्री.जयंत पाटील व माननीय श्री.आर.आर.पाटील हे सांगली जिल्हयातील चांगले नेते आहेत. ते आपापल्या क्षेत्रात चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. त्या तिघांची एकजूट झाली तर चांगलीच गोष्ट आहे,

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे....

त्यामुळे आमचा जिल्हा आणखी सुधारेल. त्यामुळे या ठिकाणी मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण सर्वांनी माननीय आबांना पाठिंबा द्यावा, त्यांना आपण इनकरेज करावे, एवढीच माझी विनंती आहे.

धन्यवाद !

------

(..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी विनंती केली आहे की, त्यांना आजच उत्तर द्यावयाचे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपल्या सर्वांना समारोपाच्या कार्यक्रमाला जावयाचे असल्याने उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे व माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर उद्या घ्यावे.

**तालिका सभापती** : उद्या सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजता भरणार आहे. तसेच या विषयीचा निर्णयही माननीय सभापती महोदयांना विचारावा लागेल. त्यामुळे उर्वरित सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, संध्याकाळी 7.00 वाजता समारोपाचा कार्यक्रम असून आपण आजचे कामकाज उद्या घ्यावे, अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभापती** : अजून फक्त तीनच वक्ते बोलणार आहेत. त्यामुळे आपण त्यांचे म्हणणे थोडक्यात ऐकून घेऊ. आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

यानंतर श्री.रोझेकर....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत नियम 260 अन्वये जी चर्चा सुरु आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, प्रामुख्याने मी सिंधुदूर्ग जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलणार आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था बिघडविण्यास त्या जिल्हयाचे जिल्हा पोलीस अधीक्षकच जबाबदार आहेत. मालवण पोटनिवडणुकीपासून आतापर्यन्त किती गुन्हे घडले, याची आकडेवारी एकदा मंत्रीमहोदयांनी सभागृहाला सादर केली पाहिजे. रमेश गोवेकर या कार्यकर्त्याचा अद्याप शोध लागलेला नाही. या जिल्हयामध्ये दरवर्षी आंगणेवाडीची जत्रा भरते, राज्यातील हजारो भाविक श्रद्धेने या जत्रेला येत असतात. मुंबई महानगरपालिकेचे नव्याने निवडून आलेले शिवसेनेचे नगरसेवक जत्रेला येतील, गोंधळ घालतील म्हणून बंदीचा कायदा आणून या जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांनी यावर्षीच्या जत्रेला गालबोट लावले आहे. अशा प्रकारचे गैरकृत्य या पोलीस अधीक्षकांनी केले आहे. एवढेच नव्हे तर तेथील सामान्य जनतेला आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना पोलीस अधीक्षक वेठीस धरीत आहेत. पालकमंत्र्यांच्या सांगण्यावरुन अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांवर पोलीस अधीक्षक गुन्हे दाखल करीत आहेत. राष्ट्रवादी पक्षाच्या जिल्हाध्यक्षांना मारहाण झाल्यानंतर तेथे जमलेल्या जमावाने पोलिसांना दगड मारल्यामुळे त्यांच्यावर पोलिसांनी भारतीय दंडविधान कलम 307 अन्वये गुन्हा दाखल केला. परंतु, उमेश कोरगांवकर याच्यावर भारतीय दंडविधान कलम 307 अन्वये गुन्हा दाखल केलेला नाही. पोलीस अधीक्षकांचा त्रास केवळ कार्यकर्त्यांना आणि जनतेलाच आहे असे नाही तर तेथील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना देखील आहे. याच जाचाला कंटाळून तेथील पोलीस उपअधीक्षक, श्री.विवेक जाधव यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. तसेच, 10 पोलीस कर्मचा-यांना पोलीस अधीक्षकांनी सक्तिने स्वेच्छानिवृत्ती घेण्याची जबरदस्ती केलेली आहे. याच जिल्हयात राजन पुजारे याने पत्नीची हत्या केली, हा आरोपी अद्याप फरार आहे, पोलिसांना मिळालेला नाही. संतोष विरुजकर याने आपल्या बायकोची हत्या केली, तोही फरार आहे. मनोज गावकर यांने लहान मुलगी, रोशन गावकरचा खून केला व बेपत्ता झाला आहे. नरसिंग रजपुत हा देखील फरार आहे. अशा प्रकारे या जिल्हयात घडलेल्या अनेक गुन्हयातील आरोपी फरार आहेत. या आरोपींना शोधण्यासाठी पोलीस अधीक्षकांकडे वेळ नाही पण अन्य पक्षांच्या कार्यकर्त्यांना त्रास देण्यासाठी त्यांच्याकडे वेळ आहे. या

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...........

जिल्हयातील सर्व कर्मचारी व अधिकारी पोलीस अधीक्षकांच्या जाचाला कंटाळलेले आहेत. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांकडे यासंदर्भात तक्रार केल्यानंतर कोकण विभागाचे पोलीस महानिरिक्षक, श्री.सत्यपाल सिंह यांच्याकडे पोलीस अधीक्षकांची चौकशी ते सोपवितात. हे पोलीस महानिरिक्षक, पोलीस अधीक्षकांचे समर्थन करतात. कर्नल सावंतांच्या वाढदिवसानिमित्त कृषि विद्यापीठामध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये हेच सत्यपालसिंह असे वक्तव्य करतात की, "नेते भ्रष्टाचार करु लागले तर जनतेने कोणाचा आदर्श घ्यावा." जर माननीय उपमुख्यमंत्री महोदयांची आपल्या खात्यावर पकड असेल तर हे नेते कोण आहेत याचा जाब त्यांनी सत्यपालसिंह यांना विचारावा. अशा प्रकारचे हे अधिकारी या जिल्हयातून जावेत म्हणून सर्वांनी प्रयत्न केलेले आहेत. माननीय उपमुख्यमत्री महोदय मात्र या अधिका-यांची पाठ थोपटतात. हेच पोलीस अधीक्षक या जिल्हयात दारुबंदी केल्याबाबतचा आव आणतात.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ...........

कणकवली पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर मटकयाचे अड्डे सुरु आहेत. पोलीस मटक्याचे अड्डे बंद करण्याचा आव आणतात. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर मटक्याचे अड्डे आणि अवैध दारुची विक्री होते. शिवसेनेचा आमदार म्हणून मी अनेक वेळा तेथील एस.पीं.ना आवाहन केले की, तुम्ही दारुचे आणि मटक्याचे अड्डे बंद करण्याचा आव आणता. परंतु ज्यावेळी शिवसैनिक येतील आणि पोलिसांना दारुचे व मटक्याचे अड्डे दाखवितील त्यावेळी पोलिस अधिकारी दारु व मटक्याचे अड्डे चालविणा-यांवर कारवाई करतील काय ? परंतु तेथील एस.पी. या आव्हानाकडे लक्ष न देता प्रसिद्धीच्या माध्यमातून स्वत:ची पाठ थापटून घेत आहेत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील बुलढाणा पॅटर्न प्रमाणे या एस.पी.ची बदली करणार आहेत की नाही ? याचे माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे. श्री.रमेश गोवेकर मालवण निवडणुकीच्या वेळी बेपत्ता झालेले आहेत. श्री.रमेश गोवेकर यांचा शोध घेण्यासाठी हायकोर्टाने पोलिसांना चार महिन्यांची मुदत दिली होती. माननीय गृहमंत्र्यांनी हा गुन्हा सी.बी.आय.कडे वर्ग केलेला आहे. हायकोर्टाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली काय ? श्री.रमेश गोवेकर यांचा शोध अद्याप का लागला नाही ? याबाबतची माहिती त्याच्या आईला कळविण्यात यावी. श्री.रमेश गोवेकर यांना बेपत्ता होऊन आज एक वर्ष पूर्ण झालेले आहे. त्याची आई आपल्या मुलाची वाट बघत आहे. त्याची आई अंथरुणावर पडलेली आहे. श्री.रमेश गोवेकर यांचा शोध घेण्यास पोलिसांना अपयश आलेले आहे. श्री.रमेश गोवेकर यांच्याबाबत आणि एस.पी.ची बदली करण्याबाबत माननीय गृहमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लोकशाहीची क्रुर थट्टा कोठे झाली असेल तर ती गोंदिया नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये झालेली आहे. गोंदिया नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांमध्ये ख-या अर्थाने शर्यत लागलेली होती. 19 मतांसाठी 500 रुपयांपासून बोली सुरु झाली, ती 23 हजारांवर थांबली. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार एक गठ्ठा मते घेऊन विजयी झाले. या नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये टी.व्ही., मोटरसायकल आणि पैशांचे वाटप झालेले आहे. ही लोकशाही आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. कायदा व सुव्यवस्था कोठे आहे ? हा खरा प्रश्न आहे. प्रत्येक निवडणुकीमध्ये अशा प्रकारे होणारा भ्रष्टाचार थांबेल काय ? हा खरा प्रश्न आहे. गोंदिया उड्डाण पुलावर एकतर्फी वाहतूक होत असते. त्या पुलावर पोलिसांचे नियंत्रण आहे. गोंदिया उड्डाण पुलावर यावर्षी दहा दुर्घटना घडल्या. त्यामध्ये 11 लोक मृत्यूमुखी पडले. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. सभापती महोदय, कोठे आहेत पोलीस ? वाहतूक व्यवस्थेवर पोलिसांचे नियंत्रण आहे काय ? कोठे आहे कायदा व सुव्यवस्था ? गोंदिया जिल्हयातील गोरेगांव तालुक्यामध्ये एका मुलाचा दुर्दैवी अपघात झाला. या दुर्घटनेमुळे पोलिसांची कमाई सुरु झाली. त्या मुलाला मदत करण्याऐवजी पोलिसांनी त्या ट्रकच्या मालकाला शोधण्यामध्ये वेळ घालविला. पोलिसांनी त्या ट्रक चालविणा-याकडे 25 हजार रुपयांची मागणी केली आणि असे सांगितले की, ट्रक मालक पोलीस स्टेशनमध्ये आला पाहिजे. मी स्वत: पोलीस सब-इन्स्पेक्टरला फोन केला आणि सांगितले की, महाराष्ट्र हे कायद्याचे राज्य आहे. तुम्ही कायद्याप्रमाणे कारवाई करा. परंतु पोलीस अधिका-यांनी तसे केले नाही. पैसे घेतल्याशिवाय त्याला सोडले नाही. मी त्या मुलाला सांगितले की, पोलिसांना पैसे देऊ नको.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.खर्चे .....

JPK/ KGS/ KTG/ 18:50

श्री.मानकर.....

त्याच्या परिवाराला मदत करा, पोलीस ही जबाबदारी घ्यावयाला का तयार नाहीत, पैसे घेतल्याशिवाय पोलीस कोणाला सोडावयाला तयार नाही, सभापती महोदय, मी जास्त बोलत नाही मुद्देसूदच बोलतो, आमच्या गोंदिया,गडचिरोली भागामध्ये नक्षलवाद आहे, गावातील दुकाने बंद असतात, पोलीस काय करतात ? कुठली व्यवस्था करतात ? गावातील सामान्य,गोरगरीब,आदिवासी माणूस नक्षलवादाच्या बडग्याखाली दबत आहे, कुठे आहे आपली कायदा व सुव्यवस्था ? रात्रभर सिमीचे कार्यकर्ते माझ्या गावामध्ये येतात, रात्रौ 10 ते 11 च्या सुमारास येतात, कोणते प्रशिक्षण देतात, घेतात आणि काय करतात, कुणास ठाऊक ? पोलिसांचा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा कंट्रोल नाही.

सभापती महोदय, मी वर्तमानपत्रात वाचलेले आहे की, आजच्या अर्थव्यवस्थेला असलेला सर्वात मोठा धोका हा नकली नोटांच्या छपाईपासून आहे, यावर आतापर्यंत राज्यातील पोलिसांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. नकली नोट छापणा-या टोळयांना अटक केलेली नाही. बँकेच्या अधिका-यांनी सांगितले की, आमच्या बँकेमध्ये नकली नोटा आलेल्या आहेत. नकली नोटांची छपाई या राज्यात होत आहे, हे दुर्दैव आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय शिक्षणमंत्री उपस्थित आहेत, मी त्यांना एक पत्र दिलेले आहे. गोरेगाव येथील एका सामाजिक संस्थेच्या इमारतीचा 40 लाखांमध्ये लिलाव झालेला आहे, असे मी वर्तमानपत्रात वाचलेले आहे. यासंदर्भात सदर ठिकाणचे संचालक व अधिकारी असमर्थ ठरलेले आहेत, अशा पदाधिका-यांवर कारवाई केली गेली पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, आपण आम्हाला शेवटी संधी देता आणि बोलूही देत नाही, आपण याबाबतीत सर्वांच्या बाबतीत समान न्याय दिला पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय मानकर साहेब, येथे कोणाला किती वेळ बोलण्यासाठी दिला हे जर वाचून दाखविले तर सर्वात जास्त बोलावयाची संधी भाजप या पक्षालाच दिलेली आहे.

श्री.केशवराव मानकर : ठीक आहे, सभापती महोदय, यापुढेही आम्हाला बोलण्याची पुरेपूर संधी देण्यात यावी, अशी मी विनंती करतो आणि म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या या प्रस्तावाला मी माझा पाठिंबा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-------

3U - 2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या या प्रस्तावास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभागृहामध्ये आतापर्यंत जणू काही आबांचा निरोप समारंभच चालू आहे की काय असे मला वाटत होते. आबा कितीही चांगले असले तरी या महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था निश्चितपणे वाईट आहे, हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये देखील याबाबत दोन मुद्दे मांडले होते. आबांना देखील आम्ही विचारले होते की, " आबा हे राज्य कुणाचे ? तुमचे, आमचे की धनदांडग्यांचे, गुन्हेगारांचे ? अशा पध्दतीने या महाराष्ट्रामध्ये काम चालले आहे, गुन्हेगारी वाढत चालली आहे, सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे. सामान्य माणसांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण झाला पाहिजे. आपण आय.एस.ओ.यांच्याशी गप्पा मारतो टेलिफोनवरुनदेखील पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली जाते, असे आपण म्हणतो परंतु ग्रामीण भागामध्ये सामान्य माणूस तक्रार नोंदविण्यास गेल्यानंतर दोन दोन तास उभ राहून सुध्दा त्याची तक्रार रितसर नोंदविली जात नाही. राजकारण्यांच्या गुन्हेगारीबद्दल तासगावंपासून ते पिंपरी - चिंचवड अशा अनेक ठिकाणच्या चर्चा सभागृहामध्ये घडून येतात. राजकारण्यांचे गुन्हेगारीकरण थांबले पाहिजे. ख-या अर्थाने महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आणावयाचा असेल तर कायदा व सुव्यवस्थेचा बडगा हा प्रत्येक गुन्हेगाराला दाखविला गेला पाहिजे मग तो राजकीय क्षेत्रातील असो वा अन्य क्षेत्रातील असो.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

कोणाचाही मुलाहिजा ठेवता कामा नये अशा प्रकारची व्यवस्था सर्वत्र निर्माण झाली पाहिजे तर खऱ्या अर्थाने शाहू-फुले-आंबेडकरांना अभिप्रेत असलेला महाराष्ट्र उभा राहू शकेल असे मला वाटते. पण अशी परिस्थिती या महाराष्ट्रात कोठे असल्याचे दिसत नाही. सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या संदर्भात मी या ठिकाणी केवळ तीनच विषय येथे मांडणार आहे.

सभापती महोदय, भिवंडी पोलीस ठाण्याच्या बाबतीत तेथील सामान्य माणसाची आणि एकूणच महाराष्ट्रातील जनतेची एक वेगळी भावना निर्माण झाली आहे. सरकारची इच्छाशक्ती नसल्यामुळेच तेथे अजूनही पोलीस ठाणे उभे रहात नाही अशी भावना सगळ्यांची झालेली आहे. या संबंधात वक्फ बोर्डाचे कारण सांगितले जाते. पण ते तितकेसे बरोबर नाही. तेव्हा सरकारने या विषयी पूर्णपणे लक्ष घालून हे पोलीस स्टेशन बांधावे जेणे करून तेथील जनतेमध्ये जी भीतीची भावना निर्माण झालेली आहे, धर्माची तेढ वाढविण्याची प्रवृत्ती डोके वर काढण्याचा प्रयत्न करीत आहे त्यांच्या विरोधात त्यामुळे सामान्य माणसाला दिलासा मिळू शकेल आणि तेथे हे सरकार पोलीस स्टेशन बांधूच शकत नाही अशी जी भावना निर्माण झाली आहे तिलाही छेद दिला जाईल.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्या संबंधात मला येथे सांगावयाचे आहे. आज या तलासरी तालुक्यामध्ये लाल बावटयाचे राज्य निर्माण झालेले आहे. तेथे कोणत्याही प्रकारे कायद्याचे राज्य आहे अशी परिस्थिती राहिलेली नाही. निवडणुकीच्या काळामध्ये तर त्या लोकांनी तेथे कायद्याचे राज्य नसून लाल बावट्याचे राज्य असल्यासारखे वातावरण निर्माण केलेले होते. निवडणूक झाल्यानंतर तेथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या घरावर केवळ दगडफेकच केली असे नाही तर निवडणूकीतील उमेदवाराच्या, कार्यकर्त्यांच्या घरांना आगी लावल्या गेल्या. परंतु त्यासंबंधात पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करूनही कोठल्याही प्रकारे कारवाई केली गेली नाही. संपूर्ण तलासरी तालुका हा लाल बावट्याच्या लोकांना आंदण दिला आहे किंवा काय असे वाटू लागले आहे. त्यांच्या गुंडशाहीमुळे प्रसंगी पोलीस निरीक्षक देखील तेथून पळून जातो हे मी स्वत: पाहिलेले आहे. यावरूनच तेथील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती किती आणि कशा पद्धतीने ढासळली आहे हे आपल्या लक्षात येईल. तरी याबाबत सरकारने लक्ष घालून कारवाई करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

सभापती महोदय, रेवदंडा येथे मी स्वत: भेट दिली आहे. तेथे मच्छिमार बांधवांचे आंदोलन पोलिसांनी दडपून टाकले आहे. तेथील मच्छिमार बांधवांची एकच मागणी होती की, तेथे कोळशाची जेट्‌टी उभारली गेली तर त्यामुळे तेथील मच्छिमारी धोक्यात येईल आणि सारे मच्छिमार उद्‌ध्वस्त होतील. म्हणूनच त्यांनी त्या जेट्टीच्या विरोधात आंदोलन केले. पण पोलिसांनी हे आंदोलन दडपून टाकले. त्यासाठी मच्छिमारांच्या घरामध्ये जाऊन त्यांना दमबाजी केली आणि त्यावरच न थांबता मच्छिमारांनी केलेल्या आंदोलनावर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. त्या लाठीमारातून मच्छिमार बांधवांबरोबर महिला मच्छिमार देखील सुटल्या नाहीत आणि त्यामुळे त्यांतील अनेकांना हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागेले. अनेकांचे हात-पाय फ्रॅक्चर झाले आहेत. हे सारे मी स्वत: रेवदंड्याला जाऊन पाहिलेले आहे. पण याबाबत तेथे कोठलीही कारवाई झालेली नाही हे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये सागरी भाग मोठ्या प्रमाणात आहे. या सागरी किनार-पट्टीला संरक्षण मिळाले नाही तर काय होते हे आतापर्यंत आपल्या लक्षात आलेले आहे. मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले वा होतात त्यासाठी लागणारे सारे रॉ मटेरिअल हे ठाणे आणि कोकणातील या सागरी किनाऱ्यावरच उतरविले जाते. या किनारपट्टीवरून पूर्वी स्मगलिंग होत होते आता तेथे स्फोटके उतरविली जातात आणि देशद्रोही माणसे त्यांचा उपयोग करतात. म्हणून तेथे सागरी आयुक्तालय निर्माण केले जावे अशी एक कल्पना पुढे आली होती, ती प्रत्यक्षात उतरविली गेली पाहिजे, नव्हे ते अत्यावश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटचा एकच मुद्दा मी आता मांडणार आहे. नागपूर अधिवेशनामध्ये या संबंधात पुराव्यासकट मी सांगितले होते. मुरूड जंजिरा भागामध्ये असे अनेक लोक वास्तव्य करीत आहेत की, त्यांच्याकडे रेशनकार्ड नाहीत, त्यांची कोठेही नोंद नाही. असे जवळपास 101 बांगला देशी लोक तेथे रहात आहेत. हे तेथील तहसिलदाराने देखील मान्य केले आहे. परंतु त्या विरोधात कोठलीही कारवाई केली गेलेली नाही.

सभापती महोदय, अशा प्रकारे सागरी किनारपट्टीच्या भागामध्ये देशद्रोही घटना घडत असतील तर ते या राज्याची आणि पर्यायाने देशाच्या कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे, वाईट आहे. सिमीच्या बाबतीत सांगावयाचे तर सिमीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे जरूर दाखल

........ 3व्ही 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

केले गेले परंतु त्यानंतर त्याबाबत सरकारने कोठल्याही प्रकारे पुढे कारवाई केलेली नाही. असे होत राहिले तर पुढे हेच लोक निरनिराळ्या वस्त्यांमध्ये जाऊन तेथील तरूणांना भडकावितात आणि त्यातून दंगली होतात. तेव्हा याची देखील दखल माननीय गृहमंत्र्यांनी घेऊन त्याबाबत खुलासा करावा एवढे बोलून मी माझे मनोगत संपवितो.

****

( यानंतर श्री. गागरे ....3डब्ल्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या प्रस्तावावरील उत्तर उद्या शुक्रवार रोजी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या आधी माननीय गृहमंत्री देतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे, सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार दिनांक 16.3.2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 07.01 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 16.3.207 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यत स्थगित झाली)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही